शनिवार । १५ फेब्रुवारी १९७५
एक रुपया

माणूस

# दोन कविता

सुरेश माटे

## तो मोर्चा एक

तो पहा, समोरून मोर्चा येतोय,
प्रत्येकी एक एक वस्ताऱ्याचं इंजीन लावलेला
तुमच्या गोटचा कापून त्याचं शिल्प कोरणार आहेत ते.
कितीही पळालात तरी फक्त दिवस वाढतील
पण तुमची सुटका नक्कीच नाहीय.

असे चक्रावू नका,
त्यांच्यातला माणूस आज खराखुरा जागा झालाय
झिजत आलेल्या बोडख्या पावलांना आवाज फुटलाय
त्यांच्या लेंडवळ्यातूनही प्रकाश निघालाय
अस्पृश्य स्मशानाच्या मातीतून वाफा निघाल्याहेत
त्यांच्या मेंदूतल्या नऊ पिढ्यांच्या अवमानांच्या गर्भांची
आज ॲटोमॅटिक ॲबॉर्शन्स झालीत
ते लालभडक रक्त धरतीच्या भोगाला जुमानणारं नाहीय
तुमच्या समस्त उत्पादक योनींच्या संग्रहालयाला
जाळून खाक करणारा अग्नी उजवलाय तिथे,
समस्त तुम्ही – ' सावधान ' नि **' सज्ज रहा, '**
**' सज्ज रहा. '**
याला जबाबदार केवळ तुम्हीच आहात,
अरे,
DIAL 22000 BEFORE YOU DIG
अशा एखाद्या साध्या स्थिर विनंतीची मिरासदेखील
राखली नाहीय–तुम्ही त्यांच्यासाठी.

त्यामुळे तुमचा आवाज आता
जानव्याच्या सुतात घाम झिरपल्यासारखा झिरपला जातोय,
" तो मोर्चा ना, दलित पँथरचा आहे. " ◻



# कलकत्ता दोन

महानगर
" CALCUTTA 72 ! " राजभवनाजवळच्या
पोष्टरसमोर अॅप्रॉक्सिमेटली चारापुढे
तीन झीरोंचा मिळून मोर्चा
" इन्कलाब
जिंदाबाद "
बेकारीच्या साम्राज्याचे भुकेले रखवालदार
आज मात्र शामच्या पाव–रोटीचे मालिक झालेयत,
पावशेराचेही.
और जोरसे–पुढाऱ्यांची हुकूमदारी
" इन्कलाब
जिंदाबाद "
धुरासारखी प्रचंड गर्जना धुमसतेय. त्या गजरात
माडीवरच्या.कॉल-गर्लला फोनची घंटी ऐकू जात नाहीय
ट्रॅम्स, बसेस, दुकाने–ट्रॅफिक गटार तुंबल्यासारखे
" बॅकवर्ड कंट्री " शेव्हरलेटमधला गोरा साहेब
शेजारच्या स्टेनोला तेवढ्यात चिकटतोय
कावळ्यालादेखील पहायला एक डोळा कमी पडतोय
भगवान शंकरा देऊन टाक तुझा तिसरा डोळा
एव्हरीथिंग मस्ट् बी यूटीलाइज्ड इन नाऊ-ए-डेज !

पुढाऱ्याच्या गाभणी मनोकामनेला पिलं होतायत.
त्यातलंच एक जन्मतांच बोंबलतेय,
" स्ट्रॅंड हॉटेलावरही समाजवाद आलाच पाहिजे "
साठ लाख वस्तीला थिएटरसारखे संडास
कसे कमी पडत नाहीत ?

वाढलेली दाढी चिवडीत चार मिनारचा कवी
त्यातनंच जागा होतोय,
जोहार जोहार
त्याच्या बाप नसलेल्या आय–मायच्या झोपड्या
टाहो फोडतायत
तिसऱ्या मजल्यावरील तीस वर्षांची बॉब कुमारिका
खाली गमतीनं बघतेय
समोरची ६० वर्षांची पुरुष–काठी तिच्या
घसरलेल्या पदरात घुसतेय
" इन्कलाब
जिंदाबाद "
आजच्या कालीमातेला तरणेबांड नरबळी हवेत.
तुम्ही तयार आहात का ?

नवसाला पावतील सडका
नाहीच पावल्या तर हावरा–ब्रीजवरून जीव द्या
गंगेला पवित्र करा,
" जयगंगे भागीरथी "
" देन फॅमिली प्लॅनींग वील बी सक्सेसफुल ! "
महारोगी लुतभरू कुत्र्यासारखा झिडकारला जातोय
म्हतोय, " ये कलकत्ता गरीब ढूँढे खाना....और अमीर
ढूँढे ...भूख "
चीफ मिनिष्टरना संतती नाहीय
अनाथ आश्रमाला देणगी देऊनही ते सडेच आहेत.

" आजके जवानोंमें प्रोटिनकी कमी हैं "
व्हिटॅमिनेट टॅब्लेटचा बडा टायवाला सेल्समन
मोर्चातही स्वत:शीच बडबडतोय
लाखो रुपयांच्या एअर-कंडिशंड बंगलेवाल्यांनो
या लुकड्याजवानांसाठी इंपोर्टेड टॉनिकच्या
पाणपोया उघडा
अमेरिके तूं गहू दे, मिल्क पावडर दे, मेडिसीन दे,
काहीही दे,
पी. एल्. ४८० जिंदाबाद
त्यांच्या बदलात अमेरिके तूं इथल्या
रांडवाड्यांचे फोटो काढते आहेस–निर्लज्ज आम्ही
गप्प आहोत;
' जिन्हे नाज़ है हिंदपर वो कहाँ है ?....कहाँ ??
...कहाँ है ???
प्राय मिनिस्टरना तार ठोका,
' अरे देवळातूनही जुगार पेटलाय इथे
दिल्लीवरला अग्नीशामक बंद हवाय
पंड्याना डेफिनेट डबल न्यूमोनिया करणारा '
" इन्कलाब
जिंदाबाद "
माणसांचा समुद्र खवळलाय
संप, हरताळ, टाळेबंदी
—ही आहे न्यू टेलीव्हाइज्ड वेव्ह.

थक्क इंग्रजी माणूस चाटपणे विचारतोय,
" नेताजीचे वंशज हेच का बंगाली ?
हाच का आजचा कलकत्ता ? "
' नेताजी आलेच परत तर त्यांना तरी देता
येईल का उत्तर ???" ☐

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १५ फेब्रुवारी | अंक : अडतिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# भ्रष्टाचार....दोन भूमिका

**सप्रेम नमस्कार....**

□ दि. १८ जानेवारी १९७५ च्या आपल्या अंकात प्रारंभीच श्री. ए. के. मुंबई यांचे जे पत्र 'भ्रष्टाचार, जयप्रकाशांचे आंदोलन आणि साहित्य संमेलन' या शीर्षकाखाली छापलेले आहे, त्यास अनुसरून पुढील काही विचार प्रकट करीत आहे.

या पैकी 'साहित्य संमेलनाविषयी' मला काहीच म्हणावयाचे नाही. त्यांनी मांडलेल्या पुढील मुद्यावरच माझे विचार सांगतो.

१. भ्रष्टाचाराच्या परिणामांची ज्या तीव्रतेने आपण दखल घेतो त्या प्रमाणात भ्रष्टाचाराच्या मुळाशी जाऊन 'चुकते कोठे' हे पाहाण्याचा प्रयत्न होत नाही. 'माणसाची नीतिमत्ताच आजकाल बिघडली आहे' या शब्दात हे मूळ सुचविले जाते, हे चुकीचे आहे. कारण भ्रष्टाचार वाढतो आहे हेच आपण नितिमत्ता बिघडली यातून सुचवीत असतो. या दोहोंचा कार्यकारणसंबंध नाही. दोन्ही विधानांचा अर्थ एकच आहे !

वस्तुस्थिती उलट आहे. भ्रष्टाचार (लाचलुचपत, लायसेन्स-परमिट भानगडी इ. इ.) हा नीतिभ्रष्टतेचा एक परिणाम आहे. गुंडगिरी, दादागिरी, खूनमारामाऱ्या, चोरी, दरोडे, बलात्कार, फसवेगिरी, ठगेगिरी, खोटेपणा असे इतर अनेक परिणाम असतात. नीतिभ्रष्टता हे कारण असून भ्रष्टाचार हा एक परिणाम आहे. बीज आणि फळ ही एकच म्हणणे तर्कदुष्ट होय. पाया आणि इमारत ही एकच कशी ?

याच संबंधी श्री. ए. डी. गोरवाला आपल्या Opinion या साप्ताहिकाच्या १४-१-७५ च्या अग्रलेखात म्हणतात,

" At the root of all that has gone wrongwith this Country since Independence is just one thing, dishonesty on the part of those governing, the lack of integrity of the ruler. This dishonesty, this lack of integrity of the rular, has been not just physical, but also intellectual. Many a wrong decision has been taken, many a right decision avoided or postponed, because of one or the other or both. Many a problem has been dealt with in a half baked manner because of the second. The personal integrity of the ruler, the key to good government according to the ancients, has been lost to us throughout this period, except perhaps for a brief year under Lal Bahadur Shastri. Now if that key can be found again, it will not be long before it will open the lock of the moral sense of the citizenry, the second requisite for good government according to the ancients. Then, within a reasonable time we may hope corruption will be greatly reduced, and so too the cry against if, that is so persistent now and almost deafens us at times. "

श्री. गोरवाला हे स्वतः एक नाणावलेले अर्थशास्त्रज्ञ व प्रशासक म्हणून प्रसिद्ध आहेत. सद्यःकालीन भ्रष्टाचाराची कारणे ते अप्रामाणिकपणात दाखवितात, आर्थिक दुरवस्थेत दाखवीत नाहीत.

२. श्री. ए. के. पुढे म्हणतात, 'भ्रष्टाचाराचे उगमस्थान शोधण्यासाठी आजच्या आर्थिक व्यवहाराकडे वळावे लागते...थोडक्यात म्हणजे भ्रष्टाचाराचे मूळ शोधायचे तर आपल्या आर्थिक मागासलेपणाचे मूळ शोधायला हवे.'

हे चार-पाच परिच्छेद म्हणजे तर विपर्यासाची सीमाच म्हणावी लागेल. झाडाचे मूळ शोधण्याकरिता झाडाच्या शेंड्यावर शोध करण्याचा हा प्रकार आहे. हा युक्तिवाद ग्राह्य धरला तर ज्या देशात भांडवल गुंतवणूक व उत्पादन प्रचंड प्रमाणावर असते तेथे भ्रष्टाचार नसतो असेच म्हणावे लागेल; इतकेच काय पण श्रीमंत माणसे भ्रष्ट नसतात दरिद्रीच भ्रष्ट असतात, असाही विचित्र निष्कर्ष निघेल. अमेरिकेतील 'वॉटरगेट' प्रकरण, जपानमधील 'तनाका प्रकरण' ही प्रकरणे संपन्न देशातील आहेत. जपानमध्ये तर उत्पादनवाढ वार्षिक २०% पर्यंत म्हणजे अभूतपूर्व अशी होत आहे. यावरून भ्रष्टाचाराचे मूळ आर्थिक मागासलेपणात नसते हे उघड आहे.

३. श्री. ए. के. यांचा पुढील मुद्दा भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी परिणामकारक आर्थिक उपाययोजना या विषयी आहे.

आर्थिक मागासलेपणा आणि आर्थिक उपाय योजना या विषयी थोडी माहिती सांगतो. यावरून असे दिसून येईल की, जशी जशी आर्थिक गुंतवणूक वाढत चालली आहे, तसतसे उत्पादनवाढीचे प्रमाण घटत चालले आहे. कारण उघड आहे : गुंतवणुकीतील पैसा

भ्रष्टाचारात गडप होतो; अकार्यक्षमता वाढत चालली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| पहिली योजना | १९५१–५६ | गुंतवणूक | १९६० कोटी रुपये |
| दुसरी योजना | १९५६–६१ | ,, | ४६०० कोटी रुपये |
| तिसरी योजना | १९६१–६६ | ,, | ८५७६·५ ,, |
| तीन वार्षिक ,, | १९६६–६९ | ,, | ६८०४ ,, |
| चौथी योजना | १९६९–७४ | ,, | २४८८२ ,, |
| | | | एकूण ४६,८२२.५ कोटी रुपये |

पहिल्या योजनेच्या पांच वर्षांच्या काळात राष्ट्रीय उत्पन्नात शेकडा १८·४ टक्के इतकी वाढ झाली व दरडोई उत्पन्न २४७·५ रुपया-वरून २६७·८ रुपये इतके झाले. दुसऱ्या योजनेच्या काळात २५% वाढीचे उद्दिष्ट होते ते २०% इतकेच झाले व दरडोई उत्पन्न रु. २६७·८ वरून रु. २९३·७ पर्यंत वाढले. तिसऱ्या योजनेत उद्दिष्ट २५% होते ते १७% च साध्य झाले, वास्तव राष्ट्रीय उत्पन्न १४·७ टक्क्यांनीच वाढले. चौथ्या योजनेचा सर्व हिशेब अद्याप व्हावयाचा आहे. पण त्यातही वाढीचे प्रमाण वार्षिक ३–३॥ टक्क्याहून अधिक नाही.

यावरून असे दिसून येईल की भारताची आर्थिक परिस्थिती पाहाता भांडवलाची गुंतवणूक फारच तोकडी आहे, असे म्हणता येणार नाही. तुलनेने इतर देशांनीही भरघोस सहाय्य केले आहे. अनेक देशात (यात काही मागास देशही येतात) राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर वार्षिक दहा टक्क्यावर नेला आहे. इराणने गेल्या काही वर्षातच हा दर २१% पर्यंत वाढविला आहे. याचा उघड अर्थ असा की, भारताच्या विकासाची गती वाढू शकली असती. पण भ्रष्टाचार व नेत्यांचा अप्रामाणिकपणा यामुळे ही गती प्राय: कुंठीत झाली आहे. श्री. गुलजारीलाल नंदा हे नियोजनमंत्री असताना (श्री. नंदा यांचा भारतीय नियोजनाशी संबंध १९५० ते १९६२ पर्यंत होता.) त्यांनी एकदा उद्‌गार काढले होते की, आपल्या योजनेचा बव्हंशी पैसा लाचलुचपत आणि इतर अप्रामाणिक खाबूगिरी यात जातो. यावेळी इंदिरा गांधी या कॉंग्रेसपक्षाच्या अध्यक्षस्थानी होत्या (१९५९); त्यांनी नंदांना या उद्‌गारांबद्दल धमकाविले होते.

प्रा. गुनार मिर्दाल यांनी या भ्रष्टाचाराचे एक प्रमुख कारण म्हणजे 'Soft State' असे सांगितले आहे. शासकीय पातळीवर कोणताही व कितीही भ्रष्टाचार झाला तरी त्याकडे दुर्लक्ष करणे, फारच दबाव आला तर एकादे Commission नेमणे, त्याचा अहवाल शक्यतो गुलदस्तात ठेवणे व दबाव फारच वाढल्यास संबंधित व्यक्तीला काही काल बाजूस ठेवणे. बस्स. भ्रष्टाचार सिद्ध होऊनही काहीही शिक्षा नाही. पं. नेहरूंनी या नीतीचा प्रारंभ श्री. व्ही. के. कृष्ण मेनन यांच्या जीप प्रकरणापासून केला. त्यानंतर अनेक प्रकरणे गाजली. प्रतापसिंग कैरों, बक्षी गुलाम महंमद, कृष्णम्माचारी, के. डी. मालवीय इ० इ० या सर्वांवरील आरोप सिद्ध होऊनही शिक्षा काही नाही. पं. नेहरूंची ढाल या सर्वांपुढे ठेवलेली. मंत्रीपातळीवरील भ्रष्टाचाराची माहिती सविस्तरपणे श्री. नूराणी यांच्या 'Ministers' misconduct' या पुस्तकात आलेली आहे. या विषयी श्रीमती इंदिरा गांधींनी तोच कित्ता चालू ठेवला आहे. श्री. गोरवाला उपर्युल्लिखित अग्रलेखात म्हणतात,

"He (Pandit Nehru) thought nothing at all of the fact that two high tribunals had held T. T. Krishnammachari guilty of lying on oath to them, and gaily recalled him to office. You similarly neglected the proved dereliction of K. D. Malaviya, and have made him your trusted minister." (प्रस्तुत अग्रलेखाचे शीर्षक आहे "Mrs. Gandhi aggrieved")

गेल्या निवडणुकीत पैशाचा पूर आणि 'गरिबी हटाव' ही घोषणा (+ बांगला युद्धातील यश) यांच्या साहाय्याने भरघोस यश मिळविल्यानंतर कॉंग्रेस पक्षाला, विशेषत: श्रीमती इंदिराबाईंना, 'निर्वीर्यमुर्वीतलम्' असे झाले व न्यायविभागासारखे अंकुश बोथट करण्यात आले, संसदेत पाशवी बहुमत होतेच. अशा अनियंत्रित सत्तेमुळे भ्रष्टाचाराला ऊत आला व त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे आर्थिक आघाडीवरील अपयश.

(१) गरीब गरीब असतात, श्रीमंत गरीब नसतात, याचा विसर पडला.

(२) गरिबांना राहाण्यासाठी साधा आसरा, झोपड्यासुद्धा चालतात. २५–३० मजली गगनचुंबी इमारती त्यांच्याकरिता नसतात. बॅंकबे रीक्लेमेशन त्यांच्याकरिता नसते, हे लक्षात राहिले नाही.

(३) कोट्यवधी रुपये खर्च करून विधानसभेकरिता इमारती, कृषिभवन, रेल्भवन, विज्ञानभवन, मंत्र्यांची निवासस्थाने, जिल्हा परिषदेच्या प्रचंड इमारती यांनी गरिबी हटत नाही. कामच करावयाचे झाल्यास सैन्याच्या बराकीत राहूनही युद्ध जिंकता येते. साधनांचा बडिवार वाढला की साध्याचा विचका होतो.

(४) भारतासारख्या दरिद्री देशात अल्प खर्चिक सायकल, स्कूटर, मो. सायकल, ट्रक्स्, बसगाड्या यांनी हवे तितके काम होऊ शकते. खासगी कार्स, मंत्र्यांच्या, अधिकाऱ्यांच्या मोटारी या गरिबी वाढवितात, हे लक्षात आले नाही.

ही यादी आणखीही वाढविता येईल. श्री. गोरवाला यांनी अप्रामाणिक निर्णय म्हटले आहे, ते वरील यादीवरून लक्षात येतील. भांडवल कमी आहे ही तक्रार अर्धवट खरी आहे. उपलब्ध भांडवलाचा काटेकोर व प्रामाणिक उपयोग केला गेला असता तर आज असे म्हणण्याची पाळीच आली नसती. नुकताच अमेरिकेहून धान्य आयातीचा जो करार करण्यात आला, त्यात अमेरिकेने दोन अटी घातल्या होत्या. त्यांचा भारत सरकारने निषेध केला. या अटी अशा–१ : धान्य भारतीयांच्याकरिता, म्हणजे भारतातच वापरले पाहिजे, इतरत्र जाऊ देऊ नये; २ : धान्य देशातील अत्यंत गरिबापर्यंत पोचले पाहिजे. या अटी घालण्याचे कारण म्हणजे पूर्वानुभव. भारत शासनाने ही वस्तुस्थिती नाकारली नाही. फक्त निषेध नोंदविला.

यावरून लक्षात येईल की, जयप्रकाशजींनी सर्वंकष क्रांती असे उद्दिष्ट डोळ्यापुढे कां ठेवले आहे. एकादे मंत्रिमंडळ काढून टाकणे, किंवा विधानसभा बरखास्त करणे हा या कॅन्सरवर उपाय नव्हे. सर्व समाज ढवळून निघाला पाहिजे. समाजाची नैतिक शक्ती व दबाव

ही इतकी तीव्र झाली पाहिजे की, भ्रष्टाचारी हात तात्काळ उखडून टाकले जातील.

श्री. गोरवाला यांनी याच लेखात पुढे म्हटले आहे :

Then within a resonable time we may hope corruption will be greatly reduced, and so too the cry against it, that is so persistant now and almost deafens us at times. The result may well be a healthier society, certainly a happior one. "

श्री. ए. के. यांनी जयप्रकाशजींनी आर्थिक कार्यक्रम पुढे न ठेवल्याबद्दल शंका दर्शविली आहे. या सर्वंकष क्रांतीत आर्थिक कार्यक्रमाचे स्थान दुय्यमच असले पाहिजे. म्हणूनच जयप्रकाशजींनी सर्वांचे सहकार्य अपेक्षिले आहे. सत्ताधारी कॉंग्रेसमधील चंद्रशेखर यांच्यासारखेही त्यांना निषिद्ध वाटत नाहीत. नीतिसंपन्न समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर आर्थिक उद्धार अवघड नाही.

**श्याम शिरूरकर, पुणे**

◻ अठरा जानेवारीच्या 'माणूस'च्या अंकातील श्री. ए. के. यांच्या पत्राच्या संदर्भात लिहीत आहे.

इचलकरंजी साहित्य संमेलनाने भ्रष्टाचारविरोधी आणि बिहार चळवळीस पाठिंबा देणारा ठराव पास न केल्याबद्दल श्री. ए. के. फारच व्यथित झालेले दिसतात. पण हे न झाल्यामुळे फारसं बिघडलं नाही. भ्रष्टाचाराचा मक्ता काही फक्त कॉंग्रेसनेच घेतलेला नाही. कारण ज्यांच्यावर सत्तेचा दुरुपयोग केल्याबद्दल कलकत्ता हायकोर्टाने ताशेरे झाडले आहेत असे श्री. महामायाप्रसाद सिन्हा या चळवळीचे एक नेते. चळवळीसाठी गोळा केलेल्या २५ लाख रु. पैकी १८ लाखांचा पत्ता नाही अशी कबुली खुद्द जे. पीं. नीच दिली आहे. गोएंकाशेटजींचा या चळवळीला आर्थिक पाठिंबा आहे हे तर आता उघडे गुपीत आहे. इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीमध्ये काही महिन्यापूर्वी आलेल्या माहितीनुसार बिहारमधील Students Action Committee च्या नेत्यापैकी दोघा नेत्यावर खून व बलात्कार या आरोपाखाली खटले चालू आहेत. ज्यांना भांडवलशाहीच्या चौकटीत भ्रष्टाचार हटवायचा आहे त्यांनी क्रांतीच्या पोकळ गप्पा माराव्या. त्यांचे सर्व प्रयत्न (भ्रष्टाचार नाहीसा करण्यासाठी) निष्फळ ठरणार हे उघड आहे. कारण भ्रष्टाचार हा भांडवलशाही व्यवस्थेचा परिणाम आहे. भ्रष्टाचार नाहीसा करणे म्हणजेच भांडवलशाही नाहीशी करून समाजवाद आणणे आणि समाजवादी माणूस घडवणे. एवढी अपेक्षा आपल्या साहित्यिकांकडून करणे जरा धाडसाचेच होईल नाही का ?

२५-१-७५ **उल्हास जोगळेकर, मुंबई**

◻ 'दामखिडला आम्ही काय करीत आहोत' हा आबा करमरकरांचा लेख वाचला. आबा करमरकर उत्पादनवाढीचा व दारिद्र्य दूर करण्याचा महान प्रयोग करीत आहेत. त्यांच्या अनुभवातून जे दिसते ते हे की दरिद्री माणसाच्या सर्वच प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे. नुसता पैसा गरिबी हटवू शकणार नाही.

पुणे बँक ग्राहक संघाचा हाच अनुभव आहे. आबानी उत्पादनवाढीसाठी लागणाऱ्या भांडवला अभावी सावकार जी पिळवणूक करतात ती बँकेचे कर्ज उभारून थांबविण्याचा प्रयोग केला. तसेच मालाच्या वितरणामध्ये जे दलाल व सावकार आहेत व जे गबर होतात त्या ऐवजी प्रत्यक्ष विकणारा ह्यास भांडवल उपलब्ध करून भांडवला अभावी त्याची जी पिळवणूक होते ती थांबवून त्याचे दारिद्र्य दूर करण्याचा पुण्यात प्रयोग केला. हजारो लोकांना बँकांची कर्जे उपलब्ध करून दिली. कर्ज मिळवून देताना अनेक हेलपाटे घालणारे त्यांना ज्या सूचना दिल्या त्या पाळण्याचे आश्वासन देणारे छोटे व्यावसायिक कर्ज हातात पडल्यानंतर तोंड दाखवावयास तयार नाहीत. कर्जाचे हप्ते नियमित फेडीनासे झाले. सांगितलेली शिस्त पाळली नाही व अनेक थकबाकीदार झाले आहेत. कर्जाची रक्कम व्यवसायासाठी न वापरता खासगी व धार्मिक कार्यासाठी वापरली आहे. काहींनी व्यसनातही पैसे खर्च केले असतील. ६८ टक्के लोक कर्जाचे हप्ते फेडीत नाहीत असे पाहाणीनंतर आढळून आले.

तेव्हा आबा म्हणतात तसे माणूस बदलला पाहिजे. त्यांना व्यवसायाचे संपूर्ण शिक्षण दिले पाहिजे व सुरुवातीची काही वर्षे त्यांचा व्यवहार तज्ज्ञ लोकांच्या देखरेखीखाली चालला पाहिजे. त्या धंद्याचे जमाखर्च व अर्थशास्त्र त्यांना समजले पाहिजे व त्याच्यासाठी खरेदी-विक्री करणारी एखादी संघटना उभी केली पाहिजे. कर्जे बुडविण्यासाठी असतात ही एक दुष्ट प्रवृत्ती सागमान वाढत आहे. त्याला आळा घातला पाहिजे व अशा दुष्टप्रवृत्तीचा राजकीय-सामाजिक पुढाऱ्यांनी निषेध केला पाहिजे व अशांना माणुसकीच्या बुद्धीने सुद्धा दया दाखवता कामा नये.

राष्ट्रीय बँका गरिबांना भांडवल उपलब्ध करून देण्यास तयार असताना त्याचा फायदा गरीब उठवीत नाहीत. ते अन्य कारणासाठी रक्कम खर्च करतात ते अल्पसंतुष्ट असतात. ते उद्याची काही काळजी करीत नाहीत व दारिद्र्याच्या चिखलातून वर येण्यासाठी जी जिद्द व शिस्त पाळावी लागते त्याचा अभाव सर्वत्र दिसतो.

माणूस ह्यासाठी कसा तयार करावयाचा हा पुणे बँक ग्राहक संघापुढेही प्रश्न आहे. त्यासाठी सार्वत्रिक वातावरण निर्माण करण्याची गरज आहे व असे निर्माण करणारी व त्याचे प्रात्यक्षिक दाखवू शकतील अशा तरुण माणसांची आज फार मोठी गरज आहे. आम्हास जो अनुभव आला तोच आबा करमरकरांना आला ह्याचा अर्थ सर्व महाराष्ट्रभर असेच वातावरण आहे. प्रयत्न करीत राहू पण निराशा पदरी येऊ नये एवढीच इच्छा.

७-२-७५ **ह. म. गद्रे**

अध्यक्ष पुणे बँक ग्राहक संघ



# शहाद्याच्या तरुण कार्यकर्त्यांचे जयप्रकाशांना अनावृत पत्र

**प्रिय जयप्रकाश,**

भारतीय जनतेने आज तुम्हाला आपला नेता मानले आहे. स्वातंत्र्य-चळवळीतून तावून सुलाखून निघालेले तुमचे नेतृत्व तकलादू नाही हे ती जाणते. आंदोलने, चळवळी आणि संघर्ष यातून उजळलेली तुमची प्रतिमा भ्रामक नाही असा विश्वास या देशातील जनतेने तुम्हाला दिला आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीशी टक्कर घेताना आपला हा नेता भांबावला नव्हता हे ती ओळखते. पारतंत्र्याच्या जहरी विळख्यातून या जनतेला मुक्त केले पाहिजे हे स्वप्न उराशी बांधून, त्या प्रीत्यर्थ अविरत तितिक्षेची शिकस्त करणाऱ्या ह्या नेत्याला जनतेने उंचावून धरले आहे यालाही काही इतिहास आहे. साम्राज्यशाहीच्या प्रत्यक्ष जुलमी वर्चस्वाची धूळधाण करणाऱ्या तेजस्वी लढ्यात तुम्ही भाग घेतलात म्हणूनच केवळ नव्हे तर स्वतंत्रतेने विजयश्रीची माळ या देशाच्या गळ्यात टाकल्यावरही आपण जनतेच्या मागण्यांची दखल घेत राहिलात या करिताच आज ती तुमच्याकडे स्फूर्तीस्थान म्हणून पाहात आहे. आपण केलेला वैचारिक प्रवास पण ती विसरलेली नाही. आजपर्यंत आपण आपले विचार अनेक मूशीत ओतलेत. प्रत्येकवेळी तुम्हाला असे वाटले की ही मूस आता विचारांना मूर्त करील. पण तुम्हीच असे म्हटले की या प्रवासाचा अनुभव जरी लाखमोलाचा असला तरी भ्रमनिरासाचा दारुण अनुभव तितकाच विरस करणारा व वेदना देणारा ठरला आहे. परंतु या भ्रमनिरासाने तुम्ही हताश झाला नाहीत, कारण मान उंचावून नवे शोध घेणे हा तुमचा स्वभाव आहे. अपयशाने चिडून जाणे किंवा क्षणिक यशाने भारावून कर्तव्यच्युत होणे ही तुमची वृत्तीच नाही. नारे लगावून जनतेची फरफट करण्याचा अविचारी उन्मतपणा तुमचे जवळ नाही. आखलेल्या योजना अर्ध्यावर फेकून न देण्याची जिद्द तुमच्याजवळ आहे. आणि म्हणूनच आज ही भारतीय जनता तुमच्यावर भाळली आहे. ब्रिटिशांचे साम्राज्य गेले पण हे आंधळ्यांचे अंधारे साम्राज्य कधी संपणार की नाही या संभ्रमावस्थेत चाचपडणाऱ्या जनतेला प्रकाशाची आशा तुम्ही लावली आहे.

गुजराथ मधला असंतोषाचा दिशाहीन गदारोळ थंडावतो तोच बिहारमधला खदखदणारा असंतोष उफाळून वर उठला. ह्या उफाळून उन्मळणाऱ्या आक्रोशी असंतोषाला आकार देण्याचे तुम्ही ठरवलेत. एक प्रचंड जबाबदारी, एक अवाढव्य ओझे वागवण्याचे जेव्हा तुम्ही ठरवलेत तेव्हा सगळ्यांनाच धक्का बसला. पण कुणाच्या रागालोभाची पर्वा करण्याची उसंत तुम्ही घेतली नाही. जनता-आंदोलनाचे नवे पर्व सुरू झाल्याचे तुम्ही घोषित केलेत. बिहार मधला विद्यार्थी तरुण तुमच्या मागे धावला. अनेक वर्षांचे असह्य असमाधान अधिरे होऊन जिथे तिथे पेटू लागले. शासकीय दमनयंत्रणेने मुळावर घाव घालून चळवळ ठेचून टाकण्याचे पवित्रे घेतले. लाठी हल्ले, गोळीबार आणि अत्याचार यामुळे अशांती माजली. वाटले प्रकाश आता झडपा बंद करून घेईल. पण उलट घडले. सत्ताधीशांनी आखून घातले त्यापेक्षा भयानक असे हिंसेचे थैमान तुम्ही पाहिले होते. हिंसा–अहिंसेच्या तात्त्विक खिचडीत हात चिवडीत बसण्याचा नाकर्ता अपुरुषार्थ तुम्ही केव्हाच ओलांडला होतात. म्हणून विहारच्या आंदोलनात होणाऱ्या हिंसेचे कारण पुढे करून पाठ दाखवण्याचा नपुसकपणा तुम्ही केला नाही. एका पाठोपाठ एक आवेशपूर्ण कल्पनांची देखणी आरास तुम्ही उभी केलीत. चालू समाज व्यवस्थेचा संताप आलेल्या तरुणाने ती उलथवून टाकण्यासाठी तुमच्या खांद्याला खांदा लावण्याचे ठरवले. कारण तुमच्यावर त्याचा विश्वास आहे. आपल्या खांद्याचा आधार गंभीर परिस्थिती निर्माण होताच काढून घेण्याचा घातकी आततार्इपणा तुम्ही करणार नाही अशी निष्ठा बिहार मधल्या तरुणाने ठेवली आहे.

बिहारमधले आंदोलन देशभरची चळवळ म्हणून जोपर्यंत उठावत नाही तोपर्यंत सर्वंकष क्रांतीची भारतीय जनतेची गरज पुरी होणार नाही ही दूरदृष्टी तुम्हाला देशभर फिरवू लागली. मग तुम्ही राजस्थान, उत्तरप्रदेश, गुजराथ करत इथे उतरला. तरी महाराष्ट्रात मराठ्यांच्या भूमीत, वारल्यांच्या वस्तीत, कामगारांच्या मुंबईत, आणि महाराष्ट्रात तुम्ही काय पाहिले ? भीक मागणारी माणसे, अनकरणासाठी हापापलेल्यांची गर्दी. गुजराथ, बिहार, महाष्ट्रातही आणावा म्हणून उत्सुक असणारी वरदळ. तुम्हाला सगळेच भेटले. विद्यार्थी क्रांतीची कंकणे बांधल्याचा पुकार करणाऱ्या तरुण संघटनांचे नेते. राजकारणाचा काला कालवून मस्ती जिरलेले म्हातारे. बिहारच्या आंदोलनाने उधळलेला धुराळा नाकातोंडात गेल्याने हैराण झालेले, आपणही काही केले पाहिजे असे प्रामाणिकपणे वाटणारे. क्रांतीची प्रबळ जिज्ञासा जागृत झालेले, बिहारचा ओसंडून वाहणारा लढाऊ उत्साह इथेही तुडुंब भरावा म्हणून उतावीळ झालेले. तुम्हाला अनेक भेटले. खोट्या निष्ठेचे. आणि खऱ्या निष्ठेचे. परिस्थिती असह्य झालेले आणि आमूलाग्र बदल चाहणारे. क्रांतीची स्पष्टता नसलेले आणि सर्वंकर्ष परिवर्तनाला सज्ज टाकलेले. पण सर्वांनी तुमच्याकडे भीक मागितली. देवाला वर मागतात तशी. कुणाजवळ काही कार्यक्रमच नव्हता. का होता, परंतु त्यांनी तो मांडलाच नाही ? कारण काय असेल. ते असो पण कार्यक्रम तुम्ही दिला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. तो आग्रह चुकीचा होता. असेही नव्हे. किंबहुना सर्वंकष क्रांतीचा आग्रह धरणाऱ्याकडे तो केलेला असल्याने योग्यच होता.

भ्रष्टाचार, बेकारी, महागाई, तोकडे उत्पादन, व भयानक दारिद्र्य यांनी देशातल्या समाजाला ग्रासले आहे. या महाभूतांनी जनता भाजून गेली आहे. या महाभूतांचा पराकाष्ठेचा पराभव व्हावा ही जनतेची मागणी आहे. तुम्ही तीच मागणी जेव्हा उच्चरवाने उद्गारता तेव्हा तिला वजन येते. या महाभूतांची पिछेहाट कशात आहे याचेही भान तुम्ही बोलून दाखवता. समाजव्यवस्थेच्या अंगाअंगात शिरून धुडगूस घालणारी ही महाभूते जनसागराच्या पृष्ठभागावर लाटांचा कल्लोळ माजवून मरणारी नाहीत, असे तुम्हीच कधी कधी म्हणता. तळातले ज्वालामुखी जोपर्यंत रसरसून जागे होत नाहीत तोवर पृष्ठभागावरच्या

लाटा उठतील आणि वाहून जातील. म्हणून खोलात हालचाली व्हाव्या लागतील. वरवर दिसणारे, व्यवस्थेच्या दिमतीला दिलेले आकार व पडदे फाडून काय होणार ? चिमण व गफूर जाऊन काय साधणार ? ते गेले तरी ही व्यवस्था टिकवणारे इतर चिमण व गफूर काय कमी आहेत ? म्हणून तुम्ही म्हणता की, 'जनता–सरकार' आले पाहिजे. पण प्रश्न हा आहे की, हे 'जनता–सरकार' त्यात जनता जोपर्यंत येत नाही तोपर्यंत शक्य आहे काय ? आणि अशी जनता बिहारमध्ये किती उठली ? तुम्हाला मनस्वी नेते मानणारे जनतेपर्यंत पोचले काय ? महाभूतांनी ज्या शरिरांची विकलावस्था करून त्यांना जेरीस आणले आहे अशी शरिरे कुठे आहेत ? या शरीराच्या कातडीला तुमच्या आंदोलनाने कितीसा स्पर्श केला आहे ? तसा तो व्हावा, त्याखेरीज गत्यंतर नाही असे तुम्हीच लिहिलेल्या एका अनावृत पत्रात आहे. कष्टकरी समुदायाच्या संघटना बांधल्याखेरीज या देशाला तरणोपाय नाही हे तुमच्या त्याचवेळी लक्षात आले होते. पण तुमच्याशी सलगी करणाऱ्या सदस्यांना हे माहीत आहे काय ? नाही. तुम्ही त्यांना ते समजावले पाहिजे. आडपडदा न ठेवता सांगितले पाहिजे. कारण बिहार आंदोलनाने दिपलेल्या डोळ्यांना जनसंघर्षांचा प्रखरप्रकाशी झोत मानवणार आहे का, हे सुरुवात करतानाच तपासले पाहिजे.

जनआंदोलनाच्या लाटेवर स्वार होऊन जनतेच्या असंतोषाचे प्रवक्ते होणाऱ्या तुमच्यासारख्या प्रभावी नेत्यासमोर कष्टकऱ्यांचे संघटित संघर्ष–मर्यादित का होईना पण हेतुपुरस्सरपणे पुढे घेऊन जाणारे आम्ही, काही सूचना ठेवू इच्छितो.

महाराष्ट्रातील आणि साऱ्या देशातील जनतेला छळणारी आणि पिळणारी व्यवस्था नेस्तनाबूत करायची असेल तर कष्टकरी जनतेला निश्चित कार्यक्रमावर संघटित करून तीव्र व व्याप्त लढा दिला पाहिजे. हा लढा अर्थातच ही व्यवस्था टिकवू पाहणाऱ्या प्रत्येक शक्तीविरोधी असला पाहिजे. व्यवस्थेचे कणे मोडीत जागे हा निर्धार ह्या लढ्याच्या मार्गातील प्रत्येक बिंदूवर दिसावयाला हवा. ताबडतोबीने असे कार्यक्रम असले पाहिजेत.

१ : बेकारांना काम किंवा बेकारभत्ता व कामगार वेतन–गोठवणूक–बंदी.

२ : सर्व उत्पादन–शक्तीचा पुरेपूर उपयोग.

३ : लागवडीखाली आणण्यासारख्या सर्व पडित जमिनीवर भूमिहीनांचा हक्क.

४ : किमान वेतनाचे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रखर आंदोलन.

५ : कामगार विरोधी कायद्याचे तुरंत उच्चाटन.

६ : बंद उद्योगांवर कामगारांचा अधिकार.

७ : प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्याचीच सर्व जमिनीवर मालकी.

८ : साठेबाजी व भ्रष्टाचाराविरुद्ध ग्रामीण व शहरी भागात एकदम चढाई.

९ : गेल्या शंभर वर्षांत हडप केलेल्या आदिवासी व इतर सर्व मागास जातीच्या जमिनींचे परतीकरण.

१० : खेड्या-पाड्यातील दलितावर होणाऱ्या आर्थिक व सामाजिक अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघटित मोहीम.

११ : सावकारशाहीच्या जोखडात अडकलेल्यांची कर्जमुक्ती.

१२ : रोजंदारीने खपणाऱ्या कामगारांना कायद्याचे संरक्षण.

१३ : चळवळीत पकडलेल्या राजबंद्यांची तत्काळ मुक्तता.

१४ : शाळा–कॉलेजमधील शिक्षकांची वेतनवाढीसाठी संयुक्त चळवळ.

१५ : पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेतानाच नोकरीची शाश्वती.

**वरील गोष्टी प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने तरुणांची जागती ताकद पथकांमधून एकवटण्याची गरज आहे.**

कारखान्यांतून काम करणारा तरुण, शेतावर राबणारा ग्रामीण तरुण आणि असहायपणे भटकणारा बेकार तरुण जमवला पाहिजे. शाळा–कॉलेज–विद्यापीठातून छानछोकीसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाची सजावट करणारा तरुण या क्रांतीच्या चळवळीत टिकणार नाहीच. पण युवाशक्तीचा बडेजाव माजवणाऱ्या पुढारी गडगडाटाचा आवाजी देखणेपणाही वरच्या गोष्टींचे नाव काढताच काळवंडून जाण्याचा दाट संभव आहे. म्हणून चळवळीत चिकाटीने टिकून राहून समर्पणाला सिद्ध होईल असा तरुणच शोधला पाहिजे. अशा जिद्दी तरुणांची एकवटलेली पथके चळवळीत उत्सवमूर्ती म्हणून शिरलेल्यांचे बुरखे फाडतील. साठेबाज व भ्रष्टाचारी यांना शहरात व खेड्यात जगणे मुश्कील करतील. भ्रष्ट राजकारणी नेत्यांना व मंत्र्यांना एकही सभा घेऊ देणार नाहीत. अकार्यक्षम–उर्मट–उत्तरे देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना जनतेपुढे उभे करण्यात येईल. विलासी वाहनातून, ऐशारामी हॉटेलातून, ऐसपैस बंगल्यामधून त्यांना खेचून काढून केलेल्या काळ्या कृत्यांचा जाब विचारतील. साठेबाजांचा माल रस्त्यावर आणून कृत्रिम टंचाई संपुष्टात आणतील. जिथे अन्याय घडेल तिथे ही पथके हजर होऊन न्याय प्रस्थापित करतील. अत्याचार करू धजणाऱ्यांना कुणी शासकीय यंत्रणा शासन करील या भ्रमात न राहता ही पथके त्यांना शासन करतील. सूडबुद्धीने पकडलेल्या राजकीय कार्यकर्त्यांची ताबडतोब चौकशी व्हावी याकरिता पोलीसकचेऱ्या, कोर्ट व जेल यावर निषेध–निदर्शने करतील. विनाकारण धरपकड केल्यास त्यांची मुक्तता केल्याखेरीज ही पथके कोर्ट–कचेऱ्या यापुढून हालणार नाहीत. राजकीय कार्यकर्त्यावर घालण्यात येणाऱ्या क्रिमिनल केसेस मागे घेतल्या जाव्यात म्हणून अशा केसेस सरकारतर्फे चालवणाऱ्या वकिलांना घेराव घालतील. शहरातून आणि ग्रामीण भागातून दलितांवर व अल्पसंख्याकांवर अत्याचार करणाऱ्यांना ही पथके जाहीर माफी मागावयाला लावतील. पुन्हा अत्याचार करणाऱ्यास खेचून काढून त्याची धिंड काढतील. जातीभेदाचे गलिच्छ राजकारण खेळणारे व अस्पृश्यता टिकवणारे ह्या पथकांच्या संघटित दबावाखाली निपचीत होतील आणि हे सगळे धीराने, शिस्तीने, जाणिवेने, शांततेने केले जाईल. तथापी व्यवस्थाच सुळावर चढवायला निघालेल्या या पथकांना विरोधी शक्ती चिरडण्याचे डावपेच टाकतील तेव्हा चिरडल्या जाणाऱ्या पथकाच्या मदतीला सगळे क्रांतिकारक धावून येतील. चळवळ दडपणुकीचा तीव्रतर निषेध सगळ्या लोकशाही शक्ती करतील. सर्वंकष क्रांतीच्या वेडाने बेभान झालेली तरुणांची पथके सुसूत्रपणे जेव्हा हालचाली करतील तेव्हा निश्चेष्ट पडलेले जनतेचे समुदाय एकाएकी जागे झाल्याखेरीज राहाणार नाहीत. अशा हालचालींना प्रारंभ करण्याची हाक तुम्ही महाराष्ट्रातल्या तरुणांना घालावी अशी आमची इच्छा आहे. कष्टकऱ्यांच्या घोषणांचे उद्गाते म्हणून जेव्हा तुमचे उंचावलेले बाहु तरुणांना इशारे करतील तेव्हाच महाराष्ट्र उचंबळून उठेल, अन्यथा नाही.

**कार्यकर्ते, ग्राम स्वराज्य समिती**

श्रमिक संघटना

शहादे (धुळे)

□

# कम्युनिस्ट

## सत्तेत भागीदारीचा मार्ग

वा. दा. रानडे

विजयवाडा येथे नुकत्याच पार पडलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या दहाव्या अधिवेशनातील ठराव आणि त्यावरील चर्चा वाचली म्हणजे पहिला ठसा मनावर उमटतो तो हा की कम्युनिस्टांचा मुख्य लढा काँग्रेस राजवटीविरुद्ध राहाणार नसून जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाविरुद्ध राहाणार आहे. 'प्रति क्रांतिकारक आणि फॅसिस्ट आंदोलन' अशी विशेषणे या आंदोलनास कम्युनिस्ट ठरावात लावली आहेत. काँग्रेस नेतेही जयप्रकाशांच्या आंदोलनाविरुद्ध हीच भाषा वापरीत असतात.

जयप्रकाशांच्या आंदोलनाचे हे चुकीचे विश्लेषण आहे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील १९३० चा स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट १९४२ चा लढा यांच्यासंबंधी कम्युनिस्टांनी चुकीच्या भूमिका घेतल्या तशीच चूक जयप्रकाशांच्या आंदोलनाबाबत त्यांच्या हातून होत आहे. जयप्रकाशांच्या आंदोलनाला जनसंघासारख्या उजव्या पक्षांनी पाठिंबा दिला असला तरी आंदोलन जनसंघाच्या प्रभावाखाली चाललेले नाही. जनसंघ व इतर काही विरोधी पक्ष आपले राजकीय उद्देश साधण्यासाठी या आंदोलनाला पाठिंबा देत आहेत हे खरे. जयप्रकाशांनाही त्याची कल्पना आहे. पण समाजवादी पक्षाचा आंदोलनाला पाठिंबा आहे. मार्क्सवादी पक्षाला जनसंघाबरोबर सहकार्य करणे पसंत नसले तरी तेवढ्या कारणावरून कम्युनिस्टाप्रमाणे आंदोलनाला विरोध करण्याची भूमिका त्यांनी घेतलेली नाही. या आंदोलनाची भूमिका, कार्यपद्धती, कार्यक्रम यात काही उणीवा वाटत असतील तर डाव्या पक्षांनी त्यात सहभागी होऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आंदोलनाला विरोध करण्याची कम्युनिस्टांची भूमिका केवळ चुकीचीच नव्हे, तर डाव्यांच्या चळवळीची व जनआंदोलनाची हानी करणारी वाहे. यामुळे कम्युनिस्टच जनतेपासून अलग पडणार आहेत.

कम्युनिस्ट पक्षाचे धोरण त्याला जनतेपासून दूर नेणारे असेल तर त्याची सभासद संख्या कशी वाढत आहे? पक्षाची सभासद संख्या साडेतीन लाखापर्यंत गेली असून यापैकी निम्मी वाढ १९७१ मधील कोचीन अधिवेशनानंतर म्हणजे गेल्या तीन चार वर्षात झाली आहे. सभासदत्वाच्या दृष्टीने देशात आपला पक्ष दुसऱ्या क्रमांकाचा आहे असे पक्षाचे एक नेते योगेंद्र शर्मा यांनी संघटनात्मक अहवालावर बोलताना सांगितले. पक्षाचे बळ वाढवायचे तर त्याची सभासदसंख्या वाढायला हवी हे खरे. पण केवळ सभासद संख्येवरून पक्षाचे बळ अजमावणे चुकीचे होईल. जन आंदोलने लढविण्याची पक्षाची ताकद किती वाढली हीच त्याच्या सामर्थ्याची खरी कसोटी मानली पाहिजे. ही कसोटी लावता पक्षाचे बळ वाढले असे म्हणता येणार नाही.

कम्युनिस्ट पक्षाचा भर सरकारविरुद्ध लढ्यापेक्षा सत्तेत सहभागी होण्याच्या राजकारणावर आहे असे परिषदेत पास झालेल्या राजकीय ठरावावरून दिसते. केरळ धर्तीच्या आघाडीची सरकारे इतर राज्यात आणि केंद्रात स्थापन करण्याच्या दृष्टीने पक्षाने कार्य करावे अशी भूमिका त्यात मांडली आहे. केरळमध्ये कम्युनिस्ट, त्यांच्या बाजूचे काही छोटे डावे पक्ष, काँग्रेस आणि मुस्लीमलीग यांच्या संयुक्त आघाडीचे सरकार आहे. स्थिरतेच्या दृष्टीने केरळमध्ये सर्वात अधिक काल अधिकारावर राहिलेले हे सरकार आहे हे खरे. पण स्थिरतेपलीकडे त्याने विशेष काय साधले? इतर राज्यातील काँग्रेस सरकारपेक्षा त्याने आपल्या कारभाराची काही वेगळी व चांगली प्रतिमा निर्माण केली आहे असे म्हणता येणार नाही. सत्तेवर टिकून राहाण्यासाठी मुख्यमंत्री मेनन यांना आपल्या भूमिकेस मुरड घालून काँग्रेस आणि मुस्लीमलीग यांच्याशी मिळते घ्यावे लागले. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे केरळ विद्यापीठ कायद्याचे. गेल्या एप्रिलमध्ये हा कायदा पास झाला. गैरकारभार असलेली खासगी महाविद्यालये सरकारने नेमलेल्या मंडळाने दोन वर्षे आपल्या ताब्यात घ्यावीत अशी तरतूद त्यात होती. संबंधित महाविद्यालय अल्पसंख्य जमातीने चालविलेले असेल तर त्या जमातीचे प्रतिनिधी मंडळावर असतील अशीही तरतूद त्यात होती. पण मुस्लीम लीगच्या दडपणाने गैरकारभार असले की महाविद्यालये ताब्यात घेण्यासंबंधीचे कलम कायद्यातून वगळण्याचे सरकारने ठरविले आहे. कायद्यातून हे कलम वगळा नाहीतर आम्ही सत्तारूढ आघाडीतून बाहेर पडतो. अशी धमकी लीग नेत्यांनी दिली होती, लीग बाहेर पडल्यावर सत्तारूढ आघाडीचे बहुमत संपुष्टात येऊन मंत्रीमंडळ गडगडण्याचा धोका होता. तेव्हा सत्ता टिकविण्यासाठी लीगची मागणी सरकारने मान्य केली. केरळ धर्तीची सरकारे इतरत्र अधिकारावर आल्याने लोकांच्या परिस्थितीत विशेष फरक पडेल असे नाही. एकच महत्त्वाचा फरक म्हणजे सत्तेवर येण्याची संधी कम्युनिस्टांना मिळणार आहे.

केरळच्या धर्तीची सरकारे इतरत्र अधिकारावर यावीत असे कम्युनिस्टांना कितीही वाटत असले तरी काँग्रेस नेते या गोष्टीस कितपत तयार होतील याची शंका आहे. निवडणुका जिंकण्यासाठी ज्या राज्यात काँग्रेसला कम्युनिस्टांची मदत घेण्याची आवश्यकता वाटेल तेथे काँग्रेस त्यांच्याशी निवडणूक समझोता करील आणि निर्णायक बहुमत त्यांच्या पाठिंब्याशिवाय होत नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यास संयुक्त आघाडी करून काँग्रेस त्यांना मंत्रिमंडळातही सहभागी करून घेईल. पण केंद्रात ही संधि काँग्रेस कम्युनिस्टांना देईल असे वाटत नाही. काँग्रेसमधल्याच एका गटाचा कम्युनिस्टांशी फार जवळीक करण्यास विरोध आहे. काँग्रेसमधील मध्यममार्गी गटाशी सहकार्य वाढविण्याचे कम्युनिस्टांनी ठरविले आहे. मध्यममार्गी गटाचे नेते उजव्या गटांविरुद्ध खंबीर भूमिका आता घेऊ लागले आहेत म्हणून त्यांच्याशी सहकार्याची भूमिका आपण घेतल्याचे कम्युनिस्टांचे समर्थन आहे. पण ते पटणारे नाही. खंबीर भूमिकेची भाषा बोलली जात आहे, काही उपाय योजल्याचा देखावाही केला जात आहे, पण काँग्रेसवरील बड्या उद्योगपतींची व बड्या शेतकऱ्यांची पकड थोडीही कमी झालेली नाही. इंदिरा गांधींचे नेतृत्व याबाबतीत अपुरे पडले असून जुन्या काँग्रेसमधलेच सारे दोष इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील नव्या काँग्रेसमध्येही आले आहेत. अशा परिस्थितीत डाव्यांची चळवळ पुढे न्यावयाची तर सर्व डाव्यांनी कडव्या काँग्रेस विरोधाचीच भूमिका घेतली पाहिजे. काँग्रेसशी सहकार्य करणे म्हणजे प्रत्यक्षात बड्या उद्योगपतींचेच हात बळकट करणे होय. ती चूक कम्युनिस्टांच्या हातून होत आहे.

कम्युनिस्ट अधिवेशनास उपस्थित असलेल्या १८०० प्रतिनिधीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मध्यमवर्गीय होते. कामगार वर्गाचे प्रतिनिधि फक्त १० टक्के आणि शेतमजुरांचे प्रतिनिधि २३ टक्के होते. पक्षाच्या अधिकारपत्रे समितीनेच आपल्या अहवालात ही माहिती दिलेली आहे. कामगार वर्गाच्या नेतृत्वाचा दावा करणाऱ्या या पक्षाचे धोरण बहुसंख्य मध्यमवर्गीय प्रतिनिधीच मुख्यतः ठरवितात असे यावरून दिसते. ☐

# सोलकढी

## □ विश्वनागरिक गॅरी डेव्हिस

देशाटन केल्याने मनुजाला फार चातुर्य येते, असे एका सुभाषितात सांगितले आहे. ही गोष्ट मला मान्य आहे. कारण देशाटन केलेली फार चातुर्यवान मनुजे मी पाहिली आहेत. परंतु त्यांनी ज्या कहाण्या सांगितल्या आणि पूर्वाई-अपूर्वाईच्या मराठी प्रवासवर्णनातून ज्या हकीगती मी वाचल्या त्यांच्यावरून खुद्द देशाटन करण्यासाठीसुद्धा फार चातुर्य असावे लागते, अशी माझी पक्की समजूत होऊन राहिली आहे. रणाविण स्वातंत्र्य जसे मिळत नाही तसे चातुर्याविना परवाना आणि परदेशचलन मिळत नाही. आणि माझ्याकडे याप्रकारचे चातुर्य पहिल्यापासूनच जरा कमी आहे. याकरिता देशाटन करून चातुर्याची जमवाजमव करणेसुद्धा मला मुष्किल होऊन बसले आहे. बरे, त्या गॅरी डेव्हिससारखा तात्त्विक कोडगेपणाही माझ्यापाशी नाही.

गॅरी डेव्हिस हा मूळचा अमेरिकन. पण त्याने स्वतःला विश्वनागरिक मानले आहे. बावीस वर्षापूर्वी गॅरी डेव्हिसने अमेरिकन नागरिकत्वाचा त्याग केला आणि विश्वनागरिकत्वाच्या मोहिमेला प्रारंभ केला. 'कोठेही जा–पायाखाली तृणावृता भू दिसते; कोठेही जा–डोइवरते दिसते नीलांबर ते' अशी केशवसुतांच्या नव्या शिपायासारखी गॅरी डेव्हिसचीही श्रद्धा. त्यामुळे माणसाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या, त्याच्या मुक्त संचाराला अटकाव करणाऱ्या कृत्रिम निर्बंधांना स्वतः जुमानायचे नाही आणि अशा न जुमानणाऱ्यांची एक संघटना उभारायची, असे गॅरी डेव्हिसने ठरविले. गॅरी डेव्हिस नुकताच स्वित्झर्लंडमध्ये गेला होता. त्याच्याकडे स्वतःच तयार केलेला विश्वनागरिकाचा परवाना होता. स्वित्झर्लंड निसर्गरमणीयवगैरे असले तरी तेथे राज्य इतर पाचपंचवीस देशात असते तसेच आहे. त्यामुळे गॅरी डेव्हिसने योग्य, उचित आणि स्वाभाविक परवान्याशिवाय देशात घुसप्रवेश केला आहे असे मानून पोलिसांनी त्याला तुरुंगात टाकले. त्याने वरिष्ठ न्यायालयाकडे दाद मागितली, ती फेटाळून लावण्यात आली. यापूर्वी ब्रिटन आणि फ्रान्समध्ये त्याची अशीच होलपट झाली होती. पण गॅरी डेव्हिस टरक्यानाना थोडाच आहे. तो तर बारा देशाचं पाणी प्यायला निघालेला आहे.

या गॅरी डेव्हिसचे मला कौतुक आहे. तीन लाख सभासद असलेल्या त्याच्या विश्वनागरिकसंघटनेचा मीसुद्धा एक सभासद होऊ इच्छितो. या संघटनेच्या सभासदांना आगाऊ चातुर्याशिवाय देशाटन करता येते हा केवढा मोठा दिलासा आहे. माझी खाजगी अटकळ अशी आहे की मुळात विश्वनागरिक गॅरी डेव्हिसजवळ देशाटन करायला लागणाऱ्या चातुर्याचा माझ्यासारखाच खडखडाट होता; तेव्हा त्याने स्वतःला विश्वनागरिक म्हणवून एका फटक्यात परवाना आणि परदेशचलन यांना लोळवून टाकले. आता त्याच्या ठायी अकस्मात हा असा चातुर्याचा खळखळाट कसा उसळला, हे कोण सांगणार. त्यामुळे झाले असे की तो गॅरी डेव्हिस विश्वनागरिक झाला; आणि अनंतराव भारतीय नागरिकच राहिला.

## □ वानखेडे स्टेडियम आणि मी

मुंबईत खेळला जाणारा कसोटी क्रिकेट सामना हा एक महामहोत्सव असतो. पाच–सहा दिवस मुंबईकर भानावरच नसतात. पाऊण लाख मुंबईकर स्टेडियमच्या आतून आणि उरलेले पाऊणशे लाख स्टेडियमच्या बाहेरून सामना पाहात असतात. या क्रिकेटक्रीडा कैफाने काहीजण चेकाळतात; काहीजण गुदमरतात; काहीजण मात्र या दोन टोकांच्या अवस्थांच्या मधला एक सुरेख समतोल साधून अद्भुत सुखात घुटमळत राहतात. त्यांना कुर्निसात.

यंदा तर जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात होऊ घातलेल्या भारत–वेस्ट इंडीजमधल्या पाचव्या कसोटी क्रिकेट सामन्यासाठी मुंबईकर अगोदरपासूनच व्याकुळ झाला होता. कारण दोन–दोन सामने जिंकून बरोबरी झाल्यामुळे हा पाचवा सामना मालिकेतला निर्णायक महत्त्वाचा सामना होता. जरूर तर तो सहा दिवस खेळला जाणार होता. असा नामी सामना खेळायला भारतात मुंबईखेरीज अन्य पवित्र भूमी नाही, अशी मुंबईकरांची प्रामाणिक समजूत होती. आता ब्रेबोर्न स्टेडियम की वानखेडे स्टेडियम, हा केवळ तपशिलाचा प्रश्न होता.

अर्थात स्टेडियमबद्दलचा वाद आपण नेहमीच्या सराईत कलात्मकतेने रंगवलाच. ब्रेबोर्न स्टेडियमवर होणाऱ्या सामन्यांचे उत्पन्न संचालक 'बॉम्बे क्रिकेट असोसिएशन'ने भोगायचे की व्यवस्थापक 'क्रिकेट क्लब ऑफ इंडिया'ने भोगायचे, हा वादाचा विषय. पुढे विषयाबरोबरच व्यक्तीसुद्धा कडवट झाल्या. 'बॉम्बे क्रिकेट असोसिएशन'ने नवा स्टेडियम उभारायचे ठरवले. त्यावेळी वेस्ट इंडिज संघ इथे यायला चौदापंधरा महिन्यांचाच काय तो अवधी होता. पण मंडळी धूमधडाकून कामाला लागली आणि त्यांनी त्या मर्यादित अवधीत स्टेडियमचे प्राचंड्य उभे केले. ऐतिहासिक ब्रेबोर्न स्टेडियम उघडा पडला.

या अटीतटीच्या वादात मला एक बाजू घ्यावीच लागली. तेव्हा मी ब्रेबोर्न स्टेडियमची बाजू घेतली. या स्टेडियममध्ये बसून मी किती नेत्रविस्फारक आणि चित्तथरारक क्रिकेट पाहिले होते. मुंबईत तरी दुसऱ्या कोणत्या स्टेडियममधून क्रिकेट पाहायची कल्पना मनास येत नव्हती. कारण वानखेडे, चंदगडकरप्रभृती घंघाटी मंडळी स्टेडियमसारखे काहीतरी कधीकाळी बांधू शकतील असे मला खरोखरच वाटले नव्हते. शिवाय अनेक तातडीच्या योजना आक्रोश करीत असताना, एक आयता स्टेडियम ओस पाडून दुसरा नवा कोरा घडवण्याचा खटाटोप माझ्या साम्यसुखी मनाला मोठाच क्लेशकारक होत होता. म्हणून वानखेडे स्टेडियमचे एकूणच भले होऊ नये, असे मला वाटू लागले. असे वाटू लागल्यावर मला त्या स्टेडियमचे दोष पृथकपृथकपणे तसेच सर्वंकषपणेसुद्धा ध्यानात येऊ लागले. या बाबतीत वर्तमानपत्रातून सतत येत राहिलेल्या बातम्यांची, वृत्तांतांची आणि साक्षेपी समाज सेवापरायण वाचकांनी लिहिलेल्या जबाब-

दार पत्रांची मला खूपच मदत झाली, हे अगत्यपूर्वक नमूद करून ठेवतो. ब्रेबोर्न स्टेडियमपेक्षा वानखेडे स्टेडियम सर्वच दृष्टींनी लहान आहे; तेथे कमी प्रेक्षकांची सोय आहे; बैठका कमालीच्या गैरसोयीच्या आहेत. (त्यामुळे सामना संपल्यावर सत्तर–ऐंशी हजार पाठ–कणे नादुरुस्त होतील); प्रवेशद्वारे कमी आणि प्रवेशमार्ग निरुंद असल्यामुळे चेंगराचेंगरी अटळ आहे; तिचे लोण रस्त्यापर्यंत व रेल्वेमार्गापर्यंत जाऊ शकेल; साकळलेल्या उतावीळ गर्दीमुळे शिस्तीचे सगळे लिखित–अलिखित कायदे भोवंडून जातील–हे मौलिक ज्ञान वृत्तपत्रांमुळे मला झालेले होते. स्वत: जाऊन वानखेडे स्टेडियम प्रत्यक्ष पाहायची गरज मला भासली नाही. अफवांवर विश्वास ठेवण्याइतका उमदेपणा माझ्या स्वभावात खचितच आहे. त्यामुळे ताकाची तहान दुधाने भागवावी त्याप्रमाणे वानखेडे स्टेडियममध्ये जाऊन सामना पाहण्यापेक्षा तो टीव्हीवर पाहायचे मी ठरवून टाकले होते. (माझ्यासारखी हिकमत इतरही अनेकांना सुचली होती हे नंतर माझ्या लक्षात आले) इतक्यात मला अकस्मात तिकिट मिळून गेले. त्यावेळी वातावरण असे होते की, माझ्या तिकिटाच्या बदल्यात लोकसभेचे सोयिस्कर मतदारसंघातले कॉंग्रेसचे तिकिट मी सहज मिळवू शकलो असतो. पण आता मला क्रिकेटप्रेमाचा घुंघुणा फुटला होता. अहो, पोतेभर बासमती तांदूळ कोणी देता तरी त्याला हे तिकिट मी दिले नसते आणि या बाबतीत मी सत्तर हजारांतलाच एक होतो.

त्याच डमडमडौलात, सामन्याच्या पहिल्या दिवशी, ठीक साडेनऊ वाजता, सर्वसिद्ध होत्साता मी वानखेडे स्टेडियमच्या परिसरात येऊन थडकलो. खेळ साडेदहा वाजता सुरू होणार होता. पण बरोबर आपल्याच राखीव बैठकीवर खेळ सुरू होण्यापूर्वी बूड ठेवायचे म्हणजे अर्धा पाऊण तास लागणारच, असा हिशेब, ब्रेबोर्न स्टेडियमच्या प्रदीर्घ अनुभवावरून मी केला होता. पण अजबअंडेच झाले. सगळे स्टेडियमप्रवेशोत्तर आणि बैठकग्रहणपूर्व विधी उरकून मी स्थिरस्थावर झालो तेव्हा पुरते पावणेदहासुद्धा झाले नव्हते. पुढल्या सहा दिवसात लागेल तेव्हा सहज लघवी करायची जी चैन मी यथेच्छ अनुभवली ती ब्रेबोर्न स्टेडियमवर माझ्या वाट्याला केव्हाही आली नव्हती. ब्रेबोर्न स्टेडियमवर जे नेत्रविस्फारक आणि चित्तथरारक क्रिकेट मी पाहिले ते लघवीतुंबकही होते अशी पक्की याद मला आहे. किंबहुना, क्रिकेटच्या खेळाची खरी बहार त्या टम्म शरीरावस्थेखेरीज कळूच शकणार नाही, अशी खूणगाठ मी बांधली होती. वानखेडे स्टेडियममध्ये मला क्रिकेटची खरी बहार कळू शकली नाही, हे मान्यच करायला हवे. वानखेडे स्टेडियममध्ये जसा आपल्या पायांनी मी आलो तसा आपल्या पायांनी स्टेडियमबाहेर पडलो. सगळा स्टेडियम रीतसर रिकामा व्हायला पुष्कळ वेळ लागेल असे भाकित करणारे एक पत्र 'टाईम्स ऑफ इंडिया'त आले होते. 'टाईम्स ऑफ इंडिया'त पत्र येऊनसुद्धा तसे झाले नाही याचा सारेजण अचंबा करून राहिले आहेत.

एका गोष्टीपुरते मात्र वानखेडे आणि ब्रेबोर्न या दोन स्टेडियामध्ये ('स्टेडियम'चे अनेकवचन 'स्टेडिया' होते हे ज्ञान मला असणे ही आमच्या त्या उपाध्येमास्तरांची कृपा.) पक्के साम्य आहे. ती गोष्ट अशी की, एखाद्या उसळत्या क्रीडारसिकाला–रसिकेला चाहेल तेव्हा क्रीडांगणावर उतरायची अप्रतिम व्यवस्था या दोन्ही स्टेडियामध्ये निर्मात्यांनी मुद्दाम करून ठेवली आहे तिने / त्याने तारांचे, पोलिसांचे आणि संयमाचे कुंपण ओलांडले की ती / तो थेट खेळपट्टीवर पोचणार, अशी ही सुरेख सोय आहे. वानखेडे स्टेडियमवाल्यांचा अशी सोय न ठेवायचा विचार होता. त्यासाठी बैठककक्षालगत, सीमारेषेपलीकडे, त्यांनी पोलिसांचे जय्यत निळे कडे टाकले होते. तरीही सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, चहापानाची वेळ होत असताना, वेस्ट इंडिज कर्णधार क्लाईव्ह लॉईडने द्विशतक पुरे केल्यावर त्याचे अभिनंदन करण्यासाठी दोन बाजूंनी दोन पोरे क्रीडांगणावर उतरली. त्यातले एक पोलिसांच्या माऱ्यातून सटकले. दुसऱ्या पोराला मात्र, तो अभिनंदनाचे सत्कर्म उरकून परतत असताना, पोलिसांनी निर्दयपणे झोडले. तेव्हा सत्तर हजार प्रेक्षकांनी एकमुखाने पोलिसांचा धिक्कार केला. पण तेवढ्याने त्यांचे समाधान होईना. अखेर सगळीकडे हुल्लडबाजी सुरू झाली. त्यात बाके, खुर्च्या, जाहिरातींची जाळपोळ झाली; संरक्षक कुंपणाची नासधूस झाली; मनचाही रगडारगड झाली; दगडफेक झाली; क्रीडांगणावर प्रेक्षकांची थयथय झाली; पुढच्या खेळाची शक्यता नष्ट झाली. मुंबईकर प्रेक्षकांनी एकदा एखादी गोष्ट करायचे मनावर घेतले म्हणजे ती ते यथासांग परिपूर्ण करतात. बरे, स्टेडियममध्ये निषेध कसा व्यक्त करायचा असतो ते मागे बिल लॉरीच्या ऑस्ट्रेलियन संघाविरुद्धच्या ब्रेबोर्न स्टेडियममधल्या कसोटी सामन्यातल्या व्यंकटराघवन-प्रकरणाने शिकवले होतेच. त्यामुळे यावेळी सारे कसे सराईतपणे उरकण्यात आले. मग प्रेक्षकपराक्रमाची विश्लेषक मीमांसा सुरू झाली. कोणी म्हणाले : या निमित्ताने, चेंगट नाईक–सरकारवरचा राग लोकांनी काढला; कोणी म्हणाले : संधी सापडेल तेव्हा वानखेडे स्टेडियमला अपशकुन करायचा काही सीसीआयवाल्या मंडळीचा डावच होता;




कोणी म्हणाले : या उद्रेकामागे जयप्रकाशांची प्रेरणा असली पाहिजे; कोणी म्हणाले : यात परकीय हस्तक्षेप नसेलच असे नाही; कोणी म्हणाले प्रेक्षकांना करमणुकीचा नवा प्रकार सापडला आहे; कोणी म्हणाले : वेस्ट इंडिजने रचलेला धावांचा डोंगर पक्षपाती प्रेक्षकांना सलत राहिला आणि त्यांनी सामनाच बंद पाडायची कोशिश केली.

तेवढे मात्र सुदैवाने झाले नाही. कारण कनवाळू प्रेक्षक धुळवड करायला क्रीडांगणावर उतरले तेव्हा खेळपट्टी तयार करणाऱ्यांनी, इतर काही समजुतदार लोकांच्या मदतीने खेळपट्टीचे रक्षण केले. म्हणून सामना लगेच दुसऱ्या दिवशीसुद्धा पुढे चालू झाला. आम्ही दुसऱ्या दिवशी स्टेडियममध्ये येतो तो आदल्या दिवशीच्या विद्रूप प्रकाराचा मागमूस कोठे दिसत नव्हता. फक्त पोलिसांचे अत्युत्साही निळे कडे उठवले गेले होते. त्यानंतर एक रिवाज मात्र पडून गेला : अभिनंदनासाठी क्रीडांगणावर अवतरलेल्या प्रेक्षकाला दुखवायची पोलिस अधिकाऱ्यांना हिंमत होत नव्हती. मग आम्ही काय सोडतो थोडेच. सगळ्यांचे यथोचित अभिनंदन होऊ लागले. शेवटच्या दिवशी ब्रिजेश पटेलच्या वाट्याला तर साधे अभिनंदन न येता अभिचुंबन वाट्याला आले. ब्रिजेश पटेलच्या झुंजार खेळावर लट्टू होऊन, त्याने अर्धशतक पुरे करताच, एक युवती (दुरून ती लावण्यवतीसुद्धा भासली.) क्रीडांगणावर धावली आणि तिने आपले अधीर व कोमल बाहू ब्रिजेशच्या गळ्यात घालून त्याच्या वाम तथा दक्षिण कपोलाचे चुकचुकीत आणि चोख चुंबन घेतले. (मागे ब्रेबोर्न स्टेडियमवर अब्बास अली बेगचे असेच चुंबन कुणीसे घेतले होते. दोन स्टेडियममधले ते आणखी एक साम्य) त्यावेळी स्टेडियममधल्या चाळीस हजार सातशे एकाहत्तर जाणत्या पुरुष प्रेक्षकांना आपण ब्रिजेश पटेलचे डावे-उजवे गाल व्हावे असे वाटले. जाणत्या स्त्रियांना काय वाटले ते मलासुद्धा सांगता येणे अवघडच आहे.

(खेळ संपल्यावर आम्ही त्या चुंबनेल मुलीचा शोध घेतला. पत्रकार म्हणून ते आमचे कर्तव्यच नव्हते काय? तिला विचारूनच अहवालातला डाव्या उजव्या गालाचा तपशील सजवला आहे. बाकीच्या सर्व अहवालात 'चुंबन घेतले' असा नुसता शुष्क आणि शामळू उल्लेख आहे. कर्तव्यभावनेनेच आम्ही पुढे तिला तिचा घरचा-दारचा पत्ता, टेलिफोननंबर, चष्म्याचा नंबर, तसेच ती साबण कोणता वापरते, तिला वांग्याची भाजी आवडते का, काश्मीर प्रश्नाबद्दल तिचे काय मत आहे, जागतिक मंदीची लाट परतवायचे उपाय कोणते, माओ आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यात कोणते साम्यभेद आहेत, दोन हजार सालातले मराठी नाटक कसे असेल, इत्यादी काही फुटकळ प्रश्न विचारले. तिने त्यांची खुलासेवार उत्तरे दिली. त्यांचा योग्य ठिकाणी उपयोग करायचे आश्वासन प्रिय वाचकांना पुरेसे होईल ना?)

या निर्णायक सामन्यात भारताचा यथास्थित पराभव झाला. सामन्याची, माधव मनोहरांच्या नाट्यपरीक्षणाइतकी प्रदीर्घ, वर्णने वाचून प्रिय वाचक शिणले असतील याची कदर आम्हाला आहे. आम्ही फक्त एकाच गोष्टीचा, न राहवून, उल्लेख करतो. भारताच्या पहिल्या डावात सुनील गावसकरने फलंदाजीचा जो ऐटबाज विलास दाखवला तसे काही मी क्वचितच पाहिले होते. गावस्करपुढे लॉईड-कालीचरणसुद्धा भुसभुशीत वाटले यात काय ते समजा. वानखेडे स्टेडियम आणि सुनील गावस्करचा तो खेळ यांची माझ्या स्मृतीत आता पक्की सांगड बसली आहे. वानखेडे स्टेडियमला झालेला तो एक शुभशकुन आहे, असे मी मानतो.

ज्या स्टेडियमला असा शोभिवंत शुभशकुन झाला आहे त्याच्या भवितव्याबद्दल मी निर्धास्त आहे.

ज्या स्टेडियममध्ये दंगलीच्या दुसऱ्या दिवशी दंगलीचे काळेबेरे थोडेसुद्धा राहात नाही त्याच्या भवितव्याबद्दल मी निर्धास्त आहे.

ज्या स्टेडियममध्ये दंगलीच्या दुसऱ्या दिवशी दंगलीचे काळेबेरे थोडेसुद्धा राहात नाही त्याच्या भवितव्याबद्दल मी निर्धास्त आहे.

ज्या स्टेडियममध्ये खायची-प्यायची-लघवी करायची इतकी खाशी व्यवस्था आहे त्याच्या भवितव्याबद्दल मी निर्धास्त आहे.

—अनंतराव



UH 744



दुष्ट बातमी खरी ठरली. दक्षिण व्हिएतनाम सरकारनं एक हजार सैनिकांना हॉन डॅटवर हल्ला करण्यास पाठवलं. सैन्य ट्रीटॉन या छोटयाशा खेडयात येऊन पोहोचलं. फितुर झॅम या सैन्याला मार्गदर्शन करतो आहे. साऊ, कुएन, सू हॉन डॅट गावाबाहेरील गुहेतील व्यवस्थेच्या मागे लागल्या. बा रेन, टामचान, हाईथेप आणि त्यांचे क्रांतिकारक सहकारी गुहा लढवण्याचा, गावातून करण्याच्या लढयाचा आराखडा करण्यात मग्न झाले.

या स्वातंत्र्यसंग्रामातील सर्वात दुःखी स्त्री होती का झोई. झॅम सारख्या एका फितुर, दुष्ट, उलटया काळजाच्या मुलाला जन्म दिल्याचं तिचं दुःख कोण समजू शकणार ? झॅमसारख्याला आपला भाऊ म्हणायला लागावं याच्या वेदना का मायलाही होत्या. या मायलेकी स्वातंत्र्यलढयातील आपला वाटा उचलण्याची संधी शोधीत होत्या.

फितुर झॅमच्या क्रूर लीला पाहून-ऐकून ही दुर्भागी आई म्हणत होती, " झॅम, तुझं तळपट होईल रे. तुझा शेवट हालाहालानं होईल ! "

ट्रु डॉनच्या घरी गॅन आणि त्याच्या तुकडीतले दोघे जण ट्रॅंग आणि टोई अरण्यरक्षकांचे गणवेश चढवीत होते. गॅननं सेकंड लेफ्टनंटचा पोशाख केला होता आणि न विसरता डोक्यावर 'त्रिशूळ' छाप टोपी घातली होती. तिघांचे पोशाख व्यवस्थित झाल्यावर गॅन म्हणाला, 'ठीक आहे? रेडी?—शाबास बा फीला आता मुळीच संशय येणार नाही.'

टोई आणि ट्रॅंग दोघांनीही थामसन जातीची एकेक रायफल खांद्याला अडकवली. गॅननं कोल्ट-१२ जातीचं पिस्तूल काढलं. त्याचा सेफ्टी कॅच उघडून आतल्या गोळ्या मोजल्या, मग त्यानं ते आपल्या कमरेला लटकवून दिलं. टान त्यांचा वाटाड्या होता, त्यानं कसलंच शस्त्र बरोबर घेतलं नव्हतं. फक्त रुमालानं कमरेला एक मोठा जंबिया अडकवला होता.

'चलो' गॅननं फर्मावलं.

व्हान थान गावातून ते शेतं ओलांडून व्हाम दिएप गावापाशी आले. गावाच्या वेशीपाशीच आपल्या मित्रांना थांबवून टान एकटाच पुढे जाऊन सुगावा घेऊन आला. 'सगळं आलबेल आहे. चला जाऊ या.' तो कुजबुजला.

ते त्याच्या मागोमाग चालू लागले. नदीच्या कडेकडेनं जाताना त्यांना बा फीच्या अंगणातला मांडव दुरून दिसला. समुद्राला भरती आली होती म्हणून नदीतही खूप पाणी होतं. त्याच्या खळखळाटाचा एकमेव ध्वनी त्या रात्रीच्या काळोखात भरून राहिला होता. दूरवर पाण्यात एक खांब उभा होता. त्यावरच्या हिरव्या दिव्याचा प्रकाश नदीच्या पाण्याच्या लाटांवर हिंदकळत होता.

'आज जाळी लावलेली दिसत नाहीत.' टाननं हलक्या आवाजात म्हटलं, 'जाळी लावलेली असली तर तिथं तांबडा दिवा असतो.'

जसजसे ते जवळ आले तसतसा मांडव स्पष्ट दिसू लागला. मांडव बराच मोठा होता आणि नदी किनारी धक्का बांधून त्यावर उभारलेला होता. त्या पलीकडे घर होतं. त्यातून मंद प्रकाश झिरपत होता. कोळ्यांच्या वस्तीतून जाताना नेहमीच येणारा माशांचा आणि खाऱ्या पाण्याचा वास आसमंतात दरवळत होता.

'ते त्याचं घर' टाननं बोटानं दाखवलं.

'ठीक आहे, तू बाहेरच रहा. आम्ही आता आत घुसतो.' म्हणत झपाझप पावलं उचलीत गॅन आणि त्याचे सहकारी पुढे निघाले. कोणत्याही संकटाशी, अडचणीशी सरळ सरळ सामना करायची गॅनची सवयच होती. त्यामुळं क्षणाचाही विचार न करता त्यानं जाऊन दार ठोठावलं. टोई आणि ट्रॅंग त्याच्या पाठोपाठ होतेच. दार ठोठावल्याबरोबर गॅननं आपला कान दाराला लावला. आतून कुणीतरी बोलल्याचा आवाज ऐकू येत होता. पण तो बाहेर ऐकू येण्याइतका स्पष्ट नव्हता. त्यानं परत ठोठावलं तसा आतला आवाज एकदम थांबला. पाठोपाठ गॅननं दरवाजावर लाथ मारीत म्हटलं— 'बा फी आहेत का घरी?'

आतल्या बाजूला अद्याप शांतताच होती. पण थोड्या वेळानं आतून कुणीतरी मोठ्यानं विचारलं—'कोण आहे?'

'आपलीच माणसं आहेत. दार उघडा.' गॅननं उत्तर दिलं.

आतल्या बाजूनं कुणाच्या तरी पावलांचा आवाज आला. मग कडी काढली गेली आणि दाराच्या किलकिलत्या फटीतून एका स्त्रीचा चेहेरा बाहेर आला आणि त्याच्या पाठोपाठ कंदिल धरलेला एक हात बाहेर आला. कंदिलाच्या प्रकाशात स्त्रीचा चेहेरा गोल आणि मांसल दिसत होता. कंदिलाचा हात उंच करून ती स्त्रीही पाहुण्यांचे चेहेरे पाहाण्याचा प्रयत्न करीत होती. गॅननं तिला पूर्वी कधीच पाहिलं नसलं तरी ती बा फी ची बायको असावी असा त्यानं तर्क केला.

'बा फी घरी आहेत का, बाई?' त्यानं विचारलं.

'हो. या आत.'

गॅननं ओठावर बोट ठेवून त्या स्त्रीला मोठ्यानं बोलू नकोस अशी खूण केली. तिघेजण आत येताच गॅननं पाठीमागे लाथ मारून दरवाजा बंद केला.

डावीकडच्या खोलीच्या दाराचा पडदा हलला आणि एक टक्कल-वालं डोकं बाहेर आलं. हाच तो बा फी हे ओळखायला गॅनला वेळ लागला नाही. तुळतुळीत टक्कल, पन्नाशीच्या सुमारास वय, जाडा, बुटका. ह्या त्याला दिलेल्या वर्णनाबरहुकूमच ती व्यक्ती होती. झोपेतून उठवल्यासारखा त्याचा चेहेरा पेंगुळलेला दिसत होता. मान खाली वाकवून त्याला सलाम करीत गॅन म्हणाला, 'बा फी आपणच का?'

हात जोडीत बा फी बाहेर आला. 'होय साहेब. मीच बा फी' तो म्हणाला.

त्याच्या त्या आविर्भावानं गॅनचा थोडासा धीर चेपला.

'मला तुमच्याशी काही बोलायचंय्. प्रथम मी आपली ओळख

# हॉन डॅट

## भाग : चार

मूळ व्हिएतनामी लेखक : **ॲन्ह डक**

इंग्रजी भाषांतर : **रॉबर्ट सी. फ्रेंड**

मराठी भाषांतर : **लक्ष्मण लोंढे**

करून देतो. मला लेफ्टनंट झॅम साहेबांनी पाठवलंय्.' नंतर घराबाहेर कुठच्या तरी दिशेला हात दाखवीत गॅन म्हणाला, 'मुख्य कचेरीतून नुकताच मी येथे आलो.'

'असू दे, असू दे. या साहेब, आत या.' म्हणत दारावरचा पडदा दूर सारीत बा फीनं त्यांना खोलीत बोलावलं. खोली तशी मोठी होती. दरवाजापाशी एक फळ्यांचा पलंग होता. तो जुनाच वाटत होता. पलीकडे दुसरा पलंग होता. त्यावर मच्छरदाणी घातलेली होती. डोळे बारीक करून गॅननं एकवार खोली नीट पाहून घेतली. मग एकदम बा फी कडे मोहोरा वळवीत म्हणाला, 'तुमचं इथलं आयुष्य किती सुखाचं आहे! तुमच्या सारखी शांतता आणि सुखसोई आम्हा सैनिकांच्या वाटचाला कुठून येणार म्हणा! त्या गनिमांनी आजकाच कसलं थैमान मांडलय्.'

'त्यांचं काही बोलूच नका लेफ्टनंट साहेब. आज दुपारीच मला कुणकुण लागली की तुम्ही लोक इकडे येत अहात, आणि किती बरं वाटलं म्हणून सांगू? खरं म्हणायचं तर तुम्ही कधी येता याची आम्ही चातकासारखी वाट पहात होतो.'

मध्येच बायकोकडे वळून पहात त्यानं सांगितलं, 'अग ए, जा पाण्याचं आधण ठेव चुलीवर.'

नंतर पुन्हा गॅनकडे वळून पहात त्यानं विचारलं, 'आमच्या गावच्या आजूबाजूचा सगळा भाग तुम्ही काबीज केलाय का?'

'अर्थात'

'देव पावला. इतक्या झटपट तुम्ही हे काम कराल याची मला कल्पनाच आली नाही. तुमचा कामाचा वेग खरंच कौतुकास्पद आहे.'

मुठी वळवून, दात ओठ खात मग तो क्रांतिकारकांना शिव्या देऊ लागला. 'साहेब, ह्या अवकरमाश्या क्रांतिकारकांनी जणू इथं स्वतःचं राज्यच स्थापलंय्. मी त्या सगळ्यांना ओळखतो. एकेक करून मी झाडून सगळे तुम्हाला दाखवीन. त्यांच्यात काही बायाही आहेत. एकेकाला गोळी घालून ठार करा साहेब.'

'बा फी, कसं नेमकं ओळखलंत हो? अहो नेमक्या ह्याच कामासाठी मी तुमच्याकडे आलोय्.'

'साहेब मी आहे आपल्या सेवेला.' तो म्हणाला.

पाय उंच करून मग त्यानं फळीवरचा ट्रे काढला. मग ड्रॅगनचं तांबड्या रंगातलं चित्र असलेला भारी कपबशांचा सेट काढला. रुबिस सिगारेटची पाकिटं काढून त्यातल्या काही सिगारेट्स् त्यानं आदरानं आणि नम्रतेनं गॅनच्या हाती दिल्या. मग तो स्वैंपाकघरात गेला. गॅननं आंगठ्याच्या नखावर सिगारेटचं टोक ठोकलं इतक्यात बा फी ची बायको खोलीत आली, ती गॅनच्या इतकी जवळ आली की तिचा उष्ण श्वासोच्छास त्याच्या कानावर पडला. डोळे बंद करीत त्याच्या गळ्यात हात टाकण्याच्या आविर्भाव करीत तिनं विचारलं, 'साहेब, गरिबाकडे थांबणार ना थोडा वेळ?' आणि तिनं गॅनला डोळा मारला.

गॅन ह्या प्रकारानं आश्चर्यचकित झाला होता. पण आपलं आश्चर्य लपविण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, 'आता या क्षणी आम्हाला तसं खास काम काही नाही. वेळही आहे तसा.'

'साहेब थोडी घेणार ना?' तिनं तोंडाला हात लावीत विचारलं.

आता नाही तरी कसं म्हणणार असा चेहरा करीत गॅननं मान डोलावली. मग डोळ्यांच्या कोपऱ्यातून तिच्याकडे बघत खुशीच्या स्वरात त्यानं विचारलं– 'कोलमी, चिंबोऱ्या काही आहे की नाही? खायला आणा बुवा काहीतरी. जाम भूक लागल्येय.'

'काय करू साहेब, आजकाल कोलमी मिळत नाही. फक्त सुकी मासळी आहे. पण आता तुम्ही भूक लागल्येय म्हणता तर एखादं बदक कापत्ये, चालेल ना?'

त्याच्या उत्तराची वाट न पहाता ती स्वैंपाकघरात नवऱ्याच्या पाठीमागे धावली सुद्धा. 'जा लवकर दोन बदकं पकडा, साहेबांना भूक लागल्येय.' तिचा आवाज ऐकू आला.

'थांब हं, पकडतोच. हे पाणी उकळलंय्. साहेबांना पहिला चहा तर पाजू या' म्हणत बा फी उकळतं पाणी घेऊन बाहेर आला. त्यानं ते पाणी किटलीत ओतलं. थोडा वेळ थांबून, चहा मुरल्यावर कपातून चहा ओतला. प्रथम त्यानं अदबीनं साहेबांना चहा दिला व मग एक कप स्वतः घेऊन मोठ्या समाधानानं भुरके मारीत तो चहा पिऊ लागला.

चहा पिऊन झाल्यावर त्याने पँट खालच्या बाजूने दुमडली; शर्टाच्या बाह्या वर सरकावल्या. मग त्यानं जमिनीवरच्या बऱ्याचशा फळ्या काढल्या. खालच्या बाजूला त्याचं बदकांचं खुराडं होतं. फळ्या उघडताच आतून बदकांचा क्वॅक् क्वॅक आवाज ऐकू आला. गॅननं चहाचा कप बाजूला ठेवून डोकावून पाहिलं. बा फी खुराड्यात उतरून बदकांच्या मागे धावत होता. 'साहेबांना' खुश करण्यासाठी चाललेली बा फी ची धडपड पाहून गॅनला शिसारी आली. हरामखोर, भडवा स्वतःला विएतनामी कशाला म्हणवतो देव जाणे, त्याच्या मनात आलं.

बदकं जिवाच्या आकांतानं धावपळ करीत होती. इतक्यात बा फी ची बायको उघडलेल्या फळ्यापाशी आली. तिच्या हातात सुतळी होती. नवऱ्यानं बदक पकडून दिलं की ती त्याचे पाय बांधून त्याला जमिनीवर फेकीत होती. अशा रीतीने पुरेशी बदकं बाहेर काढल्यावर बा फी स्वतः बाहेर आला. त्याच्या सर्वांगाला माती लागली होती. घराच्या पाठीमागे जाऊन तो हातपाय धुवून स्वच्छ कपडे घालून पुन्हा खोलीत आला.

गॅननं त्याला म्हटलं– 'बा फी, जेवण तयार होईपर्यंत आपण आपलं महत्त्वाचं काम उरकून घेऊ या.'

'चालेल साहेब' त्यानं तयारी दर्शवली.

'आपल्या भागाचा नकाशा असेलच तुमच्यापाशी'

उत्तर देण्याऐवजी बा फी बाहेरच्या खोलीत गेला आणि बांबूचं नळकांडं घेऊन आला. जमिनीवर मांडी घालून बसत त्यानं नळकांड्याचं झाकण उघडलं. आणि सिगारेटच्या आकाराची एक कागदाची सुरनळी काढली. गॅननं स्वतः ती त्याच्या हातातून घेतली. आणि टेबलावर पसरली. टोई आणि ट्रॅगनी तिच्या चार कोपऱ्यावर चार कप ठेवले. वहीच्या दोन पानाएवढ्या आकाराच्या पातळ कागदावर मोजमापाशिवाय काढलेला पण सगळ्या बारीक सारीक गोष्टी दाखविणारा तो नकाशा होता. त्यानं घरं, बागा दाखविलेल्या होत्या. आणि डोंगर छोट्या छोट्या वर्तुळांनी दाखविलेले होते.

बा फीला एकदम कसलीशी भीती वाटली. त्यानं एकामागोमाग त्या तिघांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. आणि मग बंद दरवाजाकडं पाहिलं.

' घाबरू नका, बा फी शांत व्हा. आजूबाजूला आपलीच माणसं पसरलेली आहेत. कसलीही भीती न बाळगता तुम्ही बोला. उद्या आम्ही हॉन डॅटवर हल्ला करणार आहोत हे तुम्हाला माहीत आहेच.'

' हो मला माहीत आहे ' बा फी हलक्या आवाजात म्हणाला. त्यानं आपली विजार कमरेपाशी वर ओढली आणि घट्ट बांधली. मग सिगरेटनं जळून जळून काळी पडलेली आपली बोटं नकाशावर फिरवीत तो सांगू लागला– ' लेफ्टनंट साहेब ' ही तांबड्या खुणा केलेली घरं आहेत ना ती विएतकाँग क्रांतिकारकांची आहेत, नीट लक्षात ठेवा. '

' तांबड्या खुणावाली ना ? ' गॅननं परत विचारलं. हं आलं माझ्या लक्षात. '

बा फीनं नकाशावर पुढं बोट फिरवीत म्हटलं– ' ह्या जागी ते आपली शस्त्रं बनवीत असत. मी सरकारात कळवलं आणि विमानातून बॉम्बहल्ले करून सरकारनं हा सारा भाग जाळून भस्मसात केला. पण ते साले त्यांच्या सामानासकट नेमके कुठेतरी निसटले. आणि ही हॉन डॅट डोंगरातली गुहा. ह्या गुहेच्या बाबतीत नीट काळजी घ्या साहेब. मागच्यावेळी ह्या गुहेपाशीच त्यांनी आपले सगळे हल्ले परतवून लावले होते. आपले बरेच लोक गारद झाले. त्यामुळे यावेळी पहिली गोष्ट काय कराल तर त्याचा ह्या गुहेकडे जाण्याचा मार्गच तोडून टाका. '

त्या हेराच्या तोंडून हा सल्ला ऐकताच गॅनच्या अंगाचा तिळपापड झाला. ' सुव्वरके बच्चे, थांब, तुझा बरोबर समाचार घेतो. हरामखोर, दगलबाज ' तो मनात म्हणाला.

बा फीनं सगळ्या गोष्टी सांगून टाकल्यावर गॅननं नकाशा गुंडाळला. आणि आपल्या ताब्यात घेतला. मग त्याच्या खांद्यावर थोपटीत गॅन म्हणाला– ' बा फी शाब्बास, तुम्ही फारच फक्कड काम केलंत. इतकी बारीक सारीक माहिती दिलीत की काही बोलता सोय नाही. एकदा का हा हल्ला यशस्वी झाला की तुम्हाला ह्या कामगिरीबद्दल निश्चितच मोठं बक्षिस देण्याबद्दल आम्ही सरकारात शिफारस करू. ' मग स्वैपाकघराकडे वळून बघत गॅननं ओरडून विचारलं– ' काय बाई, जेवण झालं का, की उशीर आहे अजून ? '

' झालं झालं. ' बाई आतूनच ओरडल्या.

दुसऱ्याच क्षणी बदकाच्या सागुतीनं भरलेल्या बशा घेऊन बा फीची बायको खोलीत आली. अन्नाचा खमंग वास दरवळला. बा फीच्या तोंडाला पाणी सुटलं. तो चटकन् शेजारच्या खोलीत गेला आणि चार ग्लास आणि दारूची एक बाटली घेऊन बाहेर आला, दातांनीच त्यानं बूच तोडलं आणि तोंडात आलेला बुचाचा भाग तो तिथंच जमिनीवर थुंकला.

वाफा निघणाऱ्या अन्नाचा खमंग वास घेऊन एकदम बा फीच्या नजरेला नजर भिडवीत गॅननं विचारलं– ' बा फी, तुम्ही कधी माणसांचं मांस खाल्लंय का हो ? '

बाटली बाजूच्या फळ्यांच्या पलंगावर ठेवीत बा फीनं मान हलवली. ' नाही साहेब, अजून तरी ते खायची आपली काही छाती झाली नाही हां, ते फार चांगलं लागतं असं ऐकून मात्र आहे. पण मला तरी त्या नुसत्या विचारानं सुद्धा कससंच वाटतं. '



अन्नाचा खमंग वास दरवळला. बा फीच्या तोंडाला पाणी सुटलं.

गॅन हसू लागला. मग थट्टेनं आणि थोडा गंभीरपणाचा आव आणीत त्यानं बा फीला विचारलं–' आणि हेरगिरी करायला नाही का कससंच वाटत ? '

' साहेब, हेरगिरीची काय निराळी गोष्ट आहे. सगळ्या गोष्टी व्यवस्थित केल्या तर त्यांत धोका नसतो. फायदा मात्र चिकार. मी इतक्या सावधपणे सगळ्या गोष्टी करीत असतो की या कानाची त्या कानालासुद्धा गोष्ट कळत नाही. ' मग दोन्ही हातांनी आपलं पोट सांवरीत त्यानं गॅनच्या कानात विचारलं–' साहेब, रागावणार नसाल तर एक गोष्ट विचारू ? '

' काय ? '

' तुम्ही ते खाऊन बघितलंय् का ? '

' काय ? '

' माणसाचं मांस '

' ओह्, माणसाच्या मांसासंबंधी विचारताय होय, मग त्यांत इतक हळू बोलण्यासारखं काय आहे ? मी नाही पण–होई आणि ट्रॉंग यांच्याकडे बोट दाखवीत गॅन म्हणाला, ' ह्या लोकांनी खाल्लंय्. मला खायची संधी मिळाली नाही म्हणून नव्हे, पण मला तुमच्यासारखंच ते आवडत नाही. हां, आपल्याला फक्त माणसाचा कलेजा खायला आवडतो. आणि विशेषतः पित्त दारूत मिसळून प्यावं म्हणतात. टी. बी. वगैरे काही होत नाही. तुम्हाला संधी मिळाली तर तुम्ही घेणार का ? '

बा फी थोडा वेळ थांबून विचार करून म्हणाला–' म्हणजे तसं काही तरीच वाटतं मनाला पण संधी मिळालीच तर एकदा पिऊन बघायला हरकत नाही म्हणतो. इतर जे खातात, ते एवढी स्तुती तरी का करतात हे पहाव, म्हणतो. '

' ठीक आहे. उद्याच एकाद–दोन किलो पाठवून देतो, काय ? उद्या बऱ्याच माणसाना आम्ही कंठस्नान घालू. '

एकदम काही तरी आठवल्या सारखं करीत गॅननं विचारलं–, 'हो एक विचारायचं राहिलंच. तुम्हाला तुमच्या कामात मदत करणारे इतर कोणी–'

'माझ्या कोळधासंबंधी म्हणताय् ?'

'हां–हां'

'नाही. मी कुणालाच नोकरीला ठेवीत नाही. आमची मच्छीमारीची काम आम्ही दोघच करतो. मी आणि माझी बायको.'

झाला तेवढा तमाशा बस झाला असा गॅननं विचार केला, बा फी च्या वागणुकीनं त्याची करमणूक व्हायच्या ऐवजी आता शिसारी येत होती. त्यानं टोई आणि ट्रॅंगला डोळ्यानं खूण केली.

बा फी त्याचे रिकामे ग्लासेस भरीत होता. त्याच्या खांद्यावर हात ठेवीत गॅन म्हणाला–'दोस्त, बस झालं. तुझी दरिद्री दारू इथं कुणाला हव्येय ?' मग गॅन उभा राहिला आणि चढ्या आवाजात म्हणाला–'तमाशा बस झाला. मी काही तुझा आवडता लेफ्टनंट साहेब नाही. स्वातंत्र्यासाठी झगडणारा मीही एक क्रांतिकारक आहे आणि मी तुला अटक करीत आहे. समजलं ?'

गॅनचं बोलणं पुरं व्हायच्या आधीच टोईची स्वयंचलित रायफल बा फीच्या छातीला येऊन भिडलेली होती. तो एकदम घाबरून, गयावया करीत म्हणू लागला, 'साहेब कशाला उगाच गरिबाची थट्टा करताय् ?'

'थट्टा ? आतापर्यंत चालली होती ती थट्टा होती. आता सांगतोय ते सत्य आहे.' म्हणत गॅनने त्याचे हात पाठीमागे बांधून टाकले. स्ट्रॅंगने स्वैपाक घरात जाऊन बा फी च्या बायकोला खेचून बाहेर आणले. आता त्या दोघाना खरा प्रकार ध्यानात आला आणि ते भीतीनं पांढरे फटक पडले. बा फी थरथरू लागला आणि त्याच्या बायकोला चक्कर आली. ◻

ते व्हान टान्हला पोचले तेव्हा बराच उशीर झाला होता. टाननं आपल्या दोघा माणसाबरोबर त्या दोन हेराना हॉन डॅटकडे लावून दिलं होतं. टोई आणि ट्रॅंगनी आपले फसवे पोशाख उतरवले होते. टानबरोबर ते आमराईच्या दिशेनं चालले होते. त्या भागात त्यांची पहिली सरक्षण फळी काम करीत होती. त्याच दिशेनं शत्रू त्याच्या भागात घुसण्याची शक्यता होती.

आमराईच्या तोंडाशीच त्यांना बा रेन भेटला. 'पकडलं का भडव्याना ?' त्यानं विचारलं.

'हां, काम फत्ते. आताच त्यांना हॉन डॅटकडे लावून आलो.' मग त्यानं सगळा किस्सा बा रेनला सुनावला. बा रेन गडगडाटासारखा हसला. त्यांच्या खांद्यावर हात टाकीत चालता चालता तो म्हणाला, 'टाम चान आताच इकडे येऊन गेला. निरनिराळ्या पण जवळ जवळच्या खंदकातून तिघा तिघाच्या गटानं क्रांतिकारिकानी, शस्त्रं घेऊन दबा धरून इकडे बसायचं असा बेत आहे. लढाईला तोंड लागण्यापूर्वीच आपल्या चौक्या उभारल्या गेल्या पाहिजेत अशी त्याची आज्ञा आहे. आपल्या संरक्षणाचा हा पहिला टप्पा आहे.'

'पण टाम चान कुठाय ?'

'तो हाई थेप बरोबर पुन्हा हॉन डॅटला गेला. त्यानं नाम न्हो आणि दिएपला सुद्धां बोलवून घेतलं आहे. एरवी टाम चान तसा फारच साधा आणि मनमिळाऊ आहे. पण लढाई वगैरेची वेळ आली की तो भलताच कडक होतो. आजही त्याचा नूर तसाच होता.'

बा रेनच्या हातात बॅटरी होती. तो पुढे चालत होता. 'माझ्या पावला वर पाऊल टाकून या. चुकू नका. नाही तर आपणच लावलेल्या सापळ्यात सापडाल !'

सापळे कुठे कुठे लावले आहेत हे टानला तोंडपाठ होतं. गॅनचं तसं नव्हतं. म्हणून तो भलताच काळजी घेऊन चालत होता. थंडीचा मोसम होता. झाडावर विविध प्रकारची फळं पिकली होती. त्यांचा मंद मादक सुगंध पसरला होता. मधूनच एकाद अधिक पिकलेलं फळ खाली गळून पडत होतं.

'आपली रसद तोडली गेली तर आपल्याला ही फळं खाऊन राहावं लागेल.'

'आयला–ह्या फळांनी आपलं नाही काम भागायचं. हां, केळी मिळाली तर चालेल. केळ्यानी कशी पोट भरी होते.' टान म्हणाला.

आयला, वेळ कसली आल्येय, आणि तुम्हाला खाण्या पिण्याच्या गोष्टी सुचतायत् ! माझ्या मनात तर दुसरेच विचार चाललेत्. आपल्याला दारू गोळा पुरेल की नाही, गाळा गोळीला केव्हा सुरुवात होईल, आपल्या ग्रेइंग मॅंटिस तोफा नीट काम देतील की नाही वगैरे–'

'तोफांची कसली काळजी करतोस ? त्यांची चाचणी घेतली तेव्हा त्या गडगडाट करीत आग ओकीत होत्या.'

'चाचणीची गोष्ट निराळी. आता खुद्द शत्रू समोर वापरायच्यायत्. तेव्हा–'

'काही चिंता करू नको. तोफा आग ओकणार हे नक्की. हां, रायफलींचं म्हणशील तर आपल्याकडे काडतुसं थोडी कमीच आहेत. शत्रू पुरेसा जवळ आल्याशिवाय रायफलींचा फारसा उपयोग होणार नाही.'

'हाई थेप आणि टामचाननं सांगितलंय्, ही सलामीची चौकी आहे. इथंच शत्रूचं अर्धं कंबरडं मोडलं पाहिजे. यावेळी अगदी तशीच वेळ आल्याशिवाय गुहेत जायचं नाही.'

'अखेरचा मार्ग म्हणूनच केवळ गुहेत जावं हे आपल्याला पटलं–गॅन म्हणाला–पण संरक्षणाच्या दृष्टीनं गुहेसारखी आदर्श जागा नाही, हेही तितकंच खरं आहे. फक्त एक माणूस जरी गुहेच्या




तोंडाशी बसला तरी कुणाची गुहेत घुसायची हिंमत होणार नाही. जो कोणी गुहेच्या तोंडापाशी येईल त्याचं डोकं फोडायचं, बस्स.'

'अरे बाबा, मी याच्यावर आधीच विचार केलाय्' बा रेन म्हणाला, 'मी तुझ्या सूचनेत फक्त एकच सुधारणा सुचवीन. गुहेच्या तोंडावरच्या माणसाच्या हातात हातोड्याऐवजी चांगला धारदार कोयता द्यायचा. म्हणजे त्याला फार श्रमही पडणार नाहीत. एकदा हवेत नुसता वरून खाली हात फिरवला की आत घुसणाऱ्याची मुंडी तुमच्या पायाशी येऊन पडेल !'

झाडीतून दिसणाऱ्या प्रकाशाचा वेध घेत ते पाचजण चालत होते. ते आपल्या ठरलेल्या ठिकाणी पोचले तेव्हा खंदक खणण्याच्या कामात गुंतलेले इतर क्रांतिकारक त्यांना भेटले. आवाज न करता शांतपणे मशीनसारखं काम चाललं होतं. जंगलाच्या कडेला नवे छोटे छोटे खंदक खणले जात होते. झाडांच्या फांद्यांना कंदील बांधलेले होते. त्यांचा प्रकाश बाहेर जाऊ नये म्हणून आडोसा म्हणून त्यांना केळींची पानं बांधलेली होती.

गॅननं सगळे खंदक स्वत: जाऊन बघितले. खंदक खणण्याचा आग्रह धरल्याबद्दल मनातल्या मनात टामचानचे आभार मानले. खंदकांची संरक्षणासाठी तसेच हल्ले करण्यासाठी मोठीच मदत होणार होती. शत्रूपेक्षा त्यांच्याजवळ फारच कमी शस्त्रं होती आणि म्हणून खंदकांचं महत्त्व आणखीनच वाढलं होतं.

खुद्द गॅनसाठीही एक खड्डा खणलेला होता. गॅनचा सहकारी थाम त्याने तो त्याला दाखविला–' गॅन, ही तुझी जागा '

गॅननं खड्ड्यात उडी घेतली आणि खड्ड्याची सर्व बाजूंनी बारकाईनं तपासणी केली. मग टोईकडून मास ३६ रायफल मागवून घेऊन खड्ड्याच्या तोंडापाशी रायफल नीट लावून बघितलं. रायफलच्या नजरेच्या टप्प्यात एका मातीच्या ढिगाऱ्याचा अडथळा येत होता. फावडं घेऊन त्यानं तो ढिगारा काढून टाकला. पुन्हा रायफल ठेवून बघितली. आता रायफक नीट बसली होती. आता त्याचं समाधान झालं. तो खड्ड्याबाहेर आला. आपला कॉम्रेड त्याच्या खड्ड्याची एवढी कसोशीनं पहाणी करतोय हे पाहिल्यावर टोईला आपल्या खड्ड्याची आठवण झाली. त्यानं इतकी काळजी घेतली नव्हती. गॅनच्या उदाहरणानं शहाणा होऊन तो आपल्या खड्ड्याकडे पळाला.

सगळी तयारी पूर्ण झाल्यावर गॅननं आपल्या दोस्तांना सांगितलं, 'पाळतीवर असलेल्या पहारेकऱ्याशिवाय बाकी सगळ्यांना जागायची जरूर नाही. आपापले खड्डे फांद्यांनी झाकून घेऊन इतरांनी आता झोपून जावं हे चांगलं. आधीच खूप उशीर झालाय.'

'आपल्याला हे पटलं. थोडीशी तरी झोप झालीच पाहिजे. का कुणास ठाऊक, हल्ला येणार असला की आपल्याला बुवा झोपच येते.' काळोखात कुणीतरी म्हणाला.

'आपल्याला बुवा म्हणे झोप येते. कोण तो शहाणा ?' बा रेन ओरडला. 'मला स्वत:ला ते भूमिगत काम करायचं असलं तर झोप येते. पण एकदा का लढाईला तोंड लागलं की आपली झोप पार गायब होते. हां, ब ी आठवण झाली. दोस्त हो, उद्या मी आपल्या प्रेइंग मॅंटिस तोफांचं उद्घाटन करणार आहे. ह्राईका ट्रेन आणि मी त्या बरेच दिवस बनवीत होतो.'



गॅगनं फक्त तीन गोळ्या शिल्लक ठेवल्या
आणि बाकीच्या बाहेर काढल्या.

'अहो तोफावाले, पण प्रथम आपले पाय पळायच्या तयारीत ठेवा. तुमच्या तोफांचा पल्ला काही फार मोठा नाही. म्हणजे शत्रू जवळ आला कीच तुम्ही त्या वापरू शकणार आणि एकदा का गोळीबार थांबला की तुम्हाला त्या खांद्यावर घेऊन पळावं लागणार. हे विसरू नका.'

'शत्रू जवळ आला कीच आपल्याला फायरिंग करायला आवडतं.' ह्राई का ट्रेन म्हणाला, 'उगाच आपलं बंदुकीनं इकडं गोळी मार, तिकडं गोळी मार असलं पुचुक पुचुक काम आपल्याला आवडतच नाही. त्यानं शत्रू फार फार जायबंदी होतो. पण आमच्या तोफा उडाल्या की शत्रूचं काम एका फटक्यात तमाम.'

झाड झाडोऱ्यानं आपापले खंदक झाकून टाकून क्रांतिकारकांच्या आपापसांत गप्पा चालू होत्या. उद्या जबर शत्रूला तोंड द्यावं लागणार हे माहीत असूनही त्यांचं मनोधैर्य चांगलं होतं. शत्रूबरोबर झुंज करणं ही त्यांना आता नित्याची बाब झाली होती. वर्षानुवर्षांच्या शत्रूच्या अत्याचाराचं ओझं त्यांच्या मनावर होतं. प्रत्येक लढाई ही त्याचा बदला घेण्याची संधी होती. गारद झालेल्या शत्रूच्या प्रत्येक सैनिकाकडे बघून त्यांच्या मनावरचं हे ओझं थोडं थोडं हलकं होणार होतं. कारण शत्रूनं त्यांच्या असंख्य कॉम्रेडस्‌चा त्यांच्या डोळ्यादेखत जीव घेतला होता. बंडानंतर प्रत्येकाच्या मनात तो राग उफाळून उठला होता. अख्ख्या समाजावर केल्या गेलेल्या अत्याचारांचा सूड घ्यायचा होता. त्यांची शस्त्रं सामान्य दर्जाची होती, तरीही ती शस्त्रं हातात असल्यावर शत्रूची पुन्हा तसले–बंडापूर्वीसारखे–अत्याचार करण्याची छाती होणार नाही हा त्यांचा दृढ विश्वास होता. बंडानंतर ते सर्वजण युद्धशास्त्राचे काही साधे नियम शिकले होते–शत्रूनं हल्ला केला तर प्रतिहल्ला करायचा.

मारीत मारीत मरायचं. जीव भले जाईल पण जीव घेतलाही जाईल. बंडापूर्वी फक्त विएतनामी नागरिकांचेच जीव जात असत. आता दुतर्फा जीव नष्ट होत होते. युद्धात महत्त्वाचे जीव कामास येत होते हे खरं, पण आता जाणाऱ्या प्रत्येक जिवाचं एकंदर स्वातंत्र्य-संग्रामाच्या दृष्टीनं अधिक महत्त्व होतं हेही तितकंच खरं होतं. याशिवाय अत्याचाराला मुकाटपणे मान तुकवण्याच्या दिवसात जितके जीव जात होते त्याहून आता फारच कमी जीव जात होते हे त्याहूनही अधिक खरं आणि महत्त्वाचं होतं. बंडापूर्वीच्या त्या फसव्या शांतताकाळात माणसं मारली जात होतीच की-फक्त एका बाजूची-विएतनामी.

दालचिनीच्या झाडांखाली त्यांनी आपले लव्हाळचाचे नॉप* पसरले होते. ह्राई का ट्रेनची एकीकडे तोंडानं बडबड चालू असली तरी तो आधीच आपल्या नॉपमध्ये घुसला होता. थामने गॅनला आपल्याजवळ झोपायला बोलावलं. नॉपवर मांडी घालून बसत गॅननं आपलं कोल्ट १२ पिस्तुल खोललं क्लिपमध्ये फक्त तीन गोळ्या शिल्लक ठेवून बाकीच्या सगळ्या त्यानं बाहेर काढल्या. शिवाय त्याच्यापाशी शिल्लक असलेल्या इतर क्लिपांमधल्याही गोळ्या बाहेर काढून त्यानं गोळ्यांचा एक छोटासा ढीगच बनवला. ट्रँगला बोलावून त्या ढिगाकडे बोट दाखवीत गॅन म्हणाला-' जा ह्या सगळ्या ज्यांच्याकडे थामसन बंदुका आहेत त्यांना वाटून टाक. माझ्या पिस्तुलापुरेशा तीन मी माझ्याजवळ ठेवल्या आहेत.'

ढीग पाहून ट्रँगचे डोळे चमकले. त्यानं पटकन आपली हॅट काढली आणि उलटी करून त्यात सगळ्या गोळ्या भरून घेतल्या.

मग गॅननं आपली मास रायफल काढली आणि तिच्यातल्याही गोळ्या तपासून पाहिल्या. सगळं ठाकठीक आहे, असं पाहून त्यानं ती आपल्या उशापाशी ठेवून दिली. लढाईच्या वेळी गॅनला मास रायफलच आवडत असे. तो नेहमी म्हणायचा-' त्या फ्रेंच लेबेल रायफली काही चांगल्या नाहीत. पण त्यांचीच ही मास रायफल फर्स्ट क्लास आहे. नेम चुकणं शक्यच नाही.'

मग थामच्या पाठीला पाठ लावून तो चटईवर आडवा झाला. एकमेकांच्या पाठीची ऊब एकमेकांना लागत होती. गॅन थामहून थोडासा मोठा असला तरी थाम त्याला अरेतुरेच करीत असे. थाम मध्यमवर्गातून आला होता. म्हणून त्याचं थोडंफार शिक्षणही झालेलं होतं. शत्रूमध्ये प्रचार करण्यासाठी वाटली जाणारी हस्तपत्रकं तो बनवीत असे. तो मितभाषी होता. बंडाच्या पहिल्या फेरीतच त्याच्या आईवडिलांनी भाग घेतला होता. तह झाल्यावर त्याच्या वडिलांना शत्रूनं ठार मारलं होतं आणि आईला पाउलो काँडरच्या* तुरुंगात हद्दपार केलं होतं. एकदा गॅनशी खाजगीत बोलताना तो म्हणाला होता-' माझी आई फार प्रेमळ होती. ती शिक्षिका होती. मी तिच्या वर्गात असलो तर शिस्त म्हणून ती माझ्याशी इतर मुलांपेक्षा जास्तच कडक वागत असे. माझ्या आईवडिलांना अटक झाली त्या वेळी ती गर्भार होती. चि ह्रो आच्या तुरुंगात ती बाळंत झाली. ते मूल तिथंच वारलं. तिला हद्दपार केल्यानंतर तिच्यासंबंधी मला काहीच कळलं नाही.'

थामला अनेक वेळा रात्री आईच्या आठवणींनी झोप येत नसे. गॅनला वाटलं, थामपेक्षा आपण एका परीनं अधिक सुखी आहोत. कारण गॅनची आई त्याच्या फारच लहानपणी वारली होती.आईच्या आठवणी राहतील एवढा तो त्यावेळी मोठा नव्हता. त्याला फक्त तिची ठिगळे लावलेले कपडे घालून, कपाळावरून घाम गळत असलेली आणि पाठीवर टोपल्या घेऊन वाकत वाकत रोज सकाळी बाजारात जाणारी मूर्ती आठवत असे.

' आज कुएनला भेटलास ?' थामनं मध्येच विचारलं.

' अर्थात ' गॅनला हसू आलं. थोडं थांबून त्यानं मग सांगितलं-' तुझं जाकीट माझ्या अंगावर पाहून कुएन हसायलाच लागली. तिनं विचारलंन् कुणाचं जाकीट पळवलंस म्हणून.'

' तिनं पाठवलेल्या कपड्यांचं काय झालं म्हणून विचारलंन् की नाही ?'

' विचारलंन् ना. मी सांगून टाकलं, देऊन टाकले सगळे दुसऱ्या कॉम्रेड्स्ना. तिला खरं तर इकडे यायचं होतं. पण पार्टीनं तिला दुसरीं कामं दिली आहेत.'

मग थोडा वेळ शांतता पसरली. थाम म्हणाला, ' त्या कोळ्या-कडून समजलंय की, उद्या शत्रूचा हल्ला नक्की येणार. तेव्हा त्यांच्या स्वागताला उद्या आपल्याला तयारीत राहिलं पाहिजे. तेव्हा चला आता झोपू या थोडा वेळ.'

अंगाचं मुटकुळं करून गॅन झोपला. थोड्याच वेळात तो घोरू लागला.

तांबडं फुटायच्या आतच थामनं त्याला उठवलं.

रात्रीच्या खाण्यातलं जे काही उरलं होतं त्यावर सर्वांनी न्याहारी उरकून घेतली. त्यांची न्याहारी संपत्ये न संपत्ये तोच बा रेन धावत पळत आला-' आपापल्या जागा पकडा. टेहेळणी करणाऱ्या लोकांनी बातमी दिल्येय, शत्रू हॉन सॉकपर्यंत येऊन ठेपलाय्.'

[ क्रमशः ]

---

* नॉप लव्हाळ्याच्या चटयांपासून बनविलेल्या पोत्यासारखा असतो. त्याचा अंथरुणासारखा तसेच मच्छरदाणी म्हणूनही उपयोग करता येतो.

* आपल्या अंदमानसारखाच मुख्य भूमीपासून दूरच्या बेटावर हा तुरुंग होता. फ्रेंच हद्दपारीच्या गुन्हेगारांना तिथे पाठवीत. फ्रेंच गेल्यावर गो दिन दिएम सरकारनं तेच सत्र चालू ठेवलं होतं.

# शठम् प्रति शाठ्यम्

अशोक परळीकर, परभणी

पोलीसखाते म्हटल्यास आपली अपेक्षा काय असते ? पोलिसांनी नागरिकांच्या वित्त, प्राण, अब्रू इत्यादींचे रक्षण केले पाहिजे. गुन्हेगारी वाढू न देण्याचा नव्हे गुन्हेगारी निपटून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पोलिसांबद्दल जनतेला विश्वास वाटला पाहिजे. पोलिसांमुळे नागरिकांना अभय मिळाले पाहिजे. पोलिसांनी शांती प्रस्थापित राहील याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. पोलीस नागरिकांचे मित्र बनले पाहिजेत. पोलीस हे शांतिरक्षक, न्यायरक्षक, गुन्हेगारांना कर्दनकाळ वाटावेत अशी सर्वसाधारण आपली अपेक्षा असते. 'लॉ अँड ऑर्डर'चे पालन यथायोग्य होते की नाही हे त्यांनी पाहायचे आणि याच्या उलट चित्र दिसत असल्यास प्राणपणाने, न्यायनिष्ठूर भूमिका पत्करून, ते उपद्व्याप बंद पाडावयाचे, संबंधितांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल करावयाचे, अपराध्याला शासन होईल असे पहावयाचे हे त्यांचे कर्तव्य. पोलीस म्हटल्यास किमान या एवढ्या अपेक्षा आपण करतोच आणि अशी अपेक्षा करणे वावगेही नाही.

१९४७ मध्ये आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार हे निश्चित झाले. इंग्रजांनी या देशावर पाणी सोडताना जास्तीत जास्त समस्या निर्माण करून ठेवल्या. भारतातील तत्कालीन असलेल्या संस्थानांना, राज्यांना स्वतंत्र राहण्याची वा भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याची सूट हा त्यातलाच एक प्रकार. हैदराबादचा निझाम हा महत्त्वाकांक्षी आणि धर्मांध होता. त्याच्या महत्त्वाकांक्षी मनाने उचल खाल्ली आणि हैदराबाद राज्य ठेवावयाचे, एवढेच नव्हे तर ते पाक इस्लामी राज्य बनवायचे असे त्याने ठरविले. नव्हे ते आपले जीवित कार्य मानले. इत्तेहादुल मुसलमीन ही संघटना या ईश्वरीय (!) कार्यासाठी जन्माला आली. 'आम्ही मुसलमान आज शेकडो वर्षे शासक आहोत. हुजूर निझाम आमचा प्रतिनिधी आहे.' ही त्यांची भूमिका. निझामाचा स्वतंत्र रहाण्याचा आणि इस्लामी राज्य स्थापण्याचा डाव राज्यातील बहुसंख्य हिंदूंनी जाणला. निझामाचा हा कुटिल डाव यशस्वी होऊ द्यायचा नाही म्हणून हिंदूंनी विडा उचलला. सामोपचाराने आपला हेतू साध्य झाल्यास ठीक म्हणून हिंदूंनी 'स्टेट काँग्रेस'च्या झेंड्याखाली, पूजनीय स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली, अहिंसक आंदोलन छेडले. सत्याग्रह करावयाचा आणि सरकारला आणि जनतेला आपल्या भावना कळवावयाच्या हा प्रधान हेतू. परंतु निझाम सरकारला हे असह्य झाले. त्याने हिन्दूंचा आवाज, आंदोलन बंद पाडण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब केला. सत्याग्रह्यांवर लाठ्याकाठ्यांचा वर्षाव केला, तुरुंगात त्यांना अतोनात छळले. नाही नाही ते प्रकार अवलंबिले. स्त्रियांनी सत्याग्रहात भाग घ्यावयाचा निर्णय घेतला. हैदराबाद शहरात, हैदराबादच्या इतिहासातील ही एक अभूतपूर्व घटना घडली. सौ. विमलाबाई मेलकोटे यांच्या नेतृत्वाखाली मायभगिनींनी सत्याग्रह केला. महिलांचे धैर्य खच्ची करावे, त्यांचा तेजोभंग करावा म्हणून सत्याग्रह पहाण्यास आलेल्या त्यांच्या मुलास–चि. गोपाळ मेलकोटे यास गर्दीतून ओढून त्याच्या केसांना धरून, फराफरा ओढत आणि शेवटी केसाधारे उचलून पोलिसांनी ट्रकमध्ये कोंबले. पण ती माऊली शांत आणि निश्चल होती. सौ. सीताबाई नांदापूरकर यांच्याकडे मंगळसूत्राची मागणी करण्यात आली. पण त्यांनी ठामपणे नकार दिला आणि 'वंदेमातरम्' अशी घोषणा देऊन त्या गाडीत चढल्या. तेव्हा हिंदूंतील हे धैर्य नाहीसे करण्यासाठी, त्यांना नाउमेद आणि हतबल बनविण्यासाठी रझाकार संघटना विशेषत्वाने कार्यरत झाली. लातूरचा वकील कासिम रझवी हा हिंदूंचा कडवा द्वेष्टा होता. त्याने निझामाचे स्वप्न पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. एवढेच नव्हे तर दिल्लीतील लालकिल्ल्यावर असफिया झेंडा थोड्याच दिवसांत फडकविण्याची शपथही घेतली. निझाम हरखून गेला. दिल्लीश्वर होण्याचे स्वप्नही तो पाहू लागला आणि हे ध्येय साध्य व्हावे म्हणून रझाकारांच्या सालारे आझमास– कासिम रझवीस– मनमानेल तसे वागण्याचा, मुक्त वागण्याचा परवाना दिला आणि त्याच्या रझाकारांना हिंदूंना दडपण्याचे सर्व मार्ग चोखाळण्याचा अधिकार दिला.

पोलीसाकरवीं उपद्रवी (!) हिंदूंना पकडून त्यांना वठणीवर आणण्याचा प्रयत्न जारी झाला होता. एकूण या रझाकारांच्या रूपाने राक्षसांची मुक्त सत्ता हैदराबादेत हैदोस घालत होती. या परिस्थितीत पोलिसांचे कर्तव्य काय ? प्राप्त परिस्थितीत त्यांना रझाकारांविरुद्ध काही करणे शक्य नव्हते परंतु धोक्याची सूचना नागरिकांना देणे त्यांना सुरक्षित ठेवणे या बाबी त्यांना सहज शक्य होत्या. परंतु हे निझामी (मुसलमान) पोलीस रझाकारांना वश. निझामाचे स्थान सुरक्षित रहावे म्हणून इमाने इतबारे हिंदूंचे स्थान नामशेष करण्यासाठी प्रयत्न करणा

असे निजामी पोलिसांचे स्वरूप राहिले. रझाकारांबरोबर ते हिंदूंवर अन्याय, अत्याचार करीत. लूटमार करीत. तेव्हा या पोलिसांना धडा द्यावा, एखाद्या पोलीसठाण्यावर धाडसी हल्ला करून, तेथल्या पोलिसांना बेदम चोपावे, लागतील तेवढी हत्यारे उचलावीत आणि निझाम सरकारला एक जबरदस्त चपराक द्यावी अशी धाडसी इच्छा काही स्वातंत्र्यसैनिकांत निर्माण झाली. पोलीस ठाणे निवडावयाचे ते सुद्धा महत्त्वाचे, 'नाक' असलेले आणि त्यावर हल्ला करून निझामी सत्तेचे नाक कापायचे असा बेत करण्यात आला.

निझामाने स्टेट कॉंग्रेसचे नेते गजाआड केले. धरपकड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. तेव्हा सुरक्षिततेच्या आणि कार्य चालू ठेवण्याच्या उद्देशाने अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. काही नेते हैदराबाद राज्याबाहेर जाऊन भारत सरकारची, भारतातील जनतेची आपल्या कार्यास काही मदत मिळते का हे पाहू लागले. निझामी राज्यात घुसावयाचे, रझाकार आणि अत्याचारी अधिकाऱ्यांना ठोक द्यावयाचा, रझाकार आणि निझामी पोलीस यांनाच उलट दहशत बसवायची असा उद्योग सीमेलगत उभारलेल्या कॅंप्समधील स्वातंत्र्यसैनिकांनी चालविला. हैदराबाद राज्यातील हिंदू नागरिक हतबल होण्याऐवजी बलवान बनले. 'मरण्यापूर्वी मारण्याची' इच्छा बळावली. निझामाला नको होते ते सर्व त्याच्या वाट्याला आले. हिंदू बहुसंख्य आहेत तेव्हा त्यांच्याही भावनेचा विचार केला जावा असा आग्रह हिंदूंनी सुरू केला. हिन्दूच्या या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावताना एका निझाम हितचिंतकाने म्हटले "लोग कहते हैं, हिंदू लोग यहाँ मेजॉरिटोमें हैं और मुसलमीन आखिलियत में (मैनारिटी)। मुसलमानोंको राज करनेका हक नही'। अरे, सरोंकी गिनती करना बनिया ब्रकाल का काम है। अरे, यहाँ तो सर देते हैं और सर लेते हैं। हम अैसी बेबुनियाद गुस्ताखीको कुचल देंगे। शाहे उस्मान जिंदाबाद। आजाद हैदराबाद पाईंदाबाद।" हिंदूंना वठणीवर आणण्यासाठी अत्याचार वाढले. रझाकारांच्या जोडीला निझामी पोलीस आणि निझामी सैन्यही होते. त्यांच्या अत्याचारांना पायबंद घालण्याचा एकमात्र उपाय होता–'शठं प्रति शाठ्यम्.' अत्याचारींना दहशत बसेल असे हल्ले चढविण्यास स्वातंत्र्यसैनिकांनी प्रारंभ केला. शेवटी परिणाम असा झाला की ज्यांना धास्ती बसवावयाची तर उलट त्यांचीच धास्ती बसली.

बार्शीलगत असणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचा आगळगाव कॅंप. निझामी राज्यातील रझाकार आणि पोलीस यांच्या अन्यायाच्या कथा ऐकून स्वातंत्र्यसैनिक अस्वस्थ झालेले आहेत. पोलिसांकडून रझाकारांना मिळत असणारी साथ मोडून काढली पाहिजे, निझामाची पोलीस ठाणी उद्ध्वस्त केली पाहिजेत, तेथील शस्त्रसंपत्ती लुटली पाहिजे, पोलिसांना यथोचित ठोक दिला पाहिजे. थोडक्यात जेणेकरून हिंदू नागरिकांचे मनोबल कायम राहील असे काही तरी धाडस केले पाहिजे असा विचार स्वातंत्र्यसैनिकांच्या मनात यावयास लागला. हल्लाच करावयाचा तर निझामाच्या हद्दीत खूप आत जाऊन करावा म्हणजे निझामाचे आणि त्याच्या सत्तेचे डोळे पांढरे होतील, असा विचार आगळगाव कॅंपमधील बहुसंख्य असलेल्या अंबाजोगाईच्या स्वातंत्र्यसैनिकांनी मांडला. आगळगाव कॅंपमधील सर्वांनाच पराक्रमाची खुमखुमी होती आणि निझामाच्या राज्यात आतपर्यंत जाऊन ठोक देणे म्हणजे अत्यंत धाडसाचे होते, आव्हानाचे होते. हे आव्हान त्यांनी स्वीकारण्याचे ठरविले आणि नुकतेच पानगावजवळ रूळ उखडण्याचे कार्य आटोपलेल्या या कॅंपने आपले लक्ष सर्वानुमते बरदापूरकडे वळविले. प्रत्यक्ष हल्ला करण्यापूर्वी बरदापूर येथील रझाकार आणि पोलीस, त्यांची तयारी आणि अन्य माहिती मिळविण्यासाठी कॅंपमधील श्री. पांडुरंग जोशी यांना पाठविण्यात आले. पांडुरंगराव यांनी आगळगाव सोडल्यापासून, बरदापूर हल्ल्याचे स्वप्न स्वातंत्र्यसैनिक पाहू लागले.

चार-पाच दिवस झाले तरी अजून पांडुरंग जोशी परतला नाही. तेव्हा सैनिक अस्वस्थ झाले. सैनिकांना, पोलिसांना वा रझाकारांना जोशींचा संशय आला की काय? जोशी पकडले गेले की काय? त्यांना ठार करण्यात आले की काय? शत्रू चिंतणार नाही असे अनेक विचार त्यांच्या मनात डोकावून गेले. परंतु यांचे मन उतावीळ झाल्यामुळे यांना हा कालावधी दीर्घ वाटत होता. वस्तुतः जोशींनी पत्करलेले काम जबाबदारीचे आणि अवघड होते. कोणालाही संशय येऊ न देता त्यांना आवश्यक माहिती मिळवावयाची होती. अत्यंत हिकमतीने त्याने आवश्यक माहिती मिळवली. सर्व माहिती मिळवून झाल्यानंतर तो आगळगाव कॅंपकडे निघाला. माहिती मिळवण्यासाठी पांडुरंग जोशीबरोबर हरिश्चंद्र जाधव याचीही रवानगी करण्यात आली होती. दोघेही सुरक्षित आणि माहितीसह परतल्याचे पाहून आगळगाव कॅंप आनंदला.

हरिश्चंद्र जाधव आणि पांडुरंग जोशी यांनी बरदापूर पोलीस ठाण्याचा नकाशा आणि ठाण्यातील इतर सर्व माहिती पुरवली. नियोजित स्थळासंबंधी आवश्यक अशी सर्व माहिती हेरांनी आणली होती. बरदापूर हे ठिकाण अंबाजोगाईपासून १२ मैलांवर आहे. अंबाजोगाई हे निझाम सरकारच्या सैनिकांचे केंद्र होते. तेथे निझामी फौजेचा कायम तळ होता. त्यांनी त्या टिकाणी तळ देऊन आजूबाजूच्या भागात व्यवस्था ठेवावयाची. कोठे गडबड झाल्यास धावून जावयाचे आणि हल्ला झाल्यास तो परतून लावावयाचा असा कार्यक्रम त्यांचा असावयाचा. त्यांच्या दिमतीला ५–६ शे घोडेस्वार सैनिकही होते. त्यामुळे संकटाच्या ठिकाणी तत्परतेने जाणे त्यांना शक्य होते. बरदापूर पोलीस ठाण्यात ३५ पोलीस व्यवस्थेला होते. हे ठाणे गावापासून अलग, १ ते १॥ फर्लांगावर आहे. बरदापूरची लोकसंख्या साधारणतः सहा हजार होती. या लोकसंख्येच्या १/३ मुसलमान होते. याशिवाय बाहेरचे अनेक रझाकार त्या गावात ठाण माडून होते. परिसरातील हिंदूंना धाक बसावा म्हणून हे रझाकार सशस्त्र मिरवणूक मधून मधून काढीत. आजूबाजूच्या गावातून कर वसूल करणे, गावकऱ्यांची छेड काढणे, त्यांना बेदम मारणे या रझाकारी कर्तृत्वाने बिचारे हिंदू अत्यंत त्रस्त आणि भयग्रस्त झाले होते. तेव्हा हिंदूंना दिलासा मिळावा, त्यांचे मनोबल कायम रहावे यासाठी प्रयत्न होणे अत्यावश्यक होते. शिवाय हे पोलीस आणि भाडोत्री रझाकार स्वसंरक्षणही करू शकत नाहीत हे हिंदूंच्या निदर्शनास आणून दिल्यास त्यांना हायसे वाटणे शक्य होते. तेव्हा

निझामाच्या डोळ्यात क्षणक्षणीत अंजन घालण्यासाठी, निझामी सत्तेला हादरा देण्यासाठी, अंबाजोगाईसारख्या निझामी फौजेचा तळ असलेल्या ठिकाणाहून केवळ १२ मैल अंतरावर वसलेल्या, रझाकार आणि पोलीस भरपूर असलेल्या आणि कॅम्पपासून शंभरएक मैल अंतरावर असलेल्या बरदापूर या गावाची निवड हल्ल्यासाठी करण्यात आली. बरदापूरला जाणे म्हणजे सिंहाच्या गुहेत शिरणे आहे याची स्वातंत्र्यसैनिकांना कल्पना होती. परंतु असा धोका पत्करल्याशिवाय निझामी पोलीस, निझामी सेना आणि रझाकार यांच्या कर्तबगारीचे वस्त्रहरण होणे शक्य नव्हते.तेव्हा बरदापूर पोलीस ठाण्यावर हल्ला करून, लाल किल्ल्यावर आसफिया झेंडा फडकविण्याची उद्दाम भाषा वापरणाऱ्या सालारे आझम कासिम रझवीची आणि त्याच्या पराक्रमी (!) सेनेची हुबेलवंडी उडविण्याची, फजिती करण्याची त्याची इच्छा होती.

या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी निधड्या छातीच्या, पराक्रमी, कर्तबगार सैनिकांची निवड होणे आवश्यक होते. पूर्ण विचारांती पुढील सैनिकांची निवड या आव्हानात्मक कामगिरीसाठी करण्यात आली. (१) श्रीनिवास खोत, (२) प्रभाकर खेडकर, (३) काशीनाथ मुकदम, (४) अण्णा पाटील, (५) सुखदेव घुले, (६) पांडुरंग, (७) भीमा, (८) दगडू, (९) भागवत मास्तर, (१०) हरिश्चंद्र जाधव, (११) राजाभाऊ मांग, (१२) भगवान घुले, (१३) भानुदास, (१४) विश्वनाथ लिंबगावकर. या चौदा सैनिकांशिवाय टाकळी सांगवीचा शेपराव यास सोबत घेतले होते. शेपरावकडे चिखल दिला होता. त्याने चिखल काळजीपूर्वक वाहून आणावा असे त्याला बजावून सांगण्यात आहे.

आगळगाव कॅम्पमधील सैनिक बरदापूर ॲक्शनसाठी तयार झाले. त्यांचा पल्ला मोठा होता, झेप मोठी होती, जवळजवळ १०० मैलांचा प्रवास त्यांना करावयाचा होता. सुरुवातीचा प्रवास अर्थातच रेल्वेगाडीने केला गेला. 'तडोळा' या स्थानकावर सैनिक उतरले. भारतीय हद्दीतील हे शेवटचे स्थानक. आतापर्यंतचा प्रवास निर्धोक झाला होता. आता निझामाच्या हद्दीत प्रवेश करावयाचा होता. सावध असणे आता आवश्यक होते. सैनिक पायी निघाले. त्यांनी पहिला मुक्काम सरहद्दीपासून सुमारे १२ मैल आत पिंपरी या गावी केला. तेथून एक मैलावर शिराढोण पोलीसठाणे होते. मुक्काम केला परंतु काळजी आणि धाकधूक होतीच. परंतु कोणतेही संकट चालून आले नाही. तेथून सैनिक दुसऱ्या दिवशी निघाले. २० मैलाचे अंतर पायी चालून ते टाकळी सांगवी येथे आले. इतके अंतर चालून आल्यामुळे सर्वजण अतिशय थकले. पाय दुखत होते. परंतु पुढील मुक्काम गाठण्याची ईर्षा होती. वेळापत्रकाप्रमाणे त्यांचा कार्यक्रम होत होता. टाकळी सांगवी येथे त्यांच्या मुक्कामाची चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. सैनिकांनी पोटभर जेवण केले. रात्री बराच वेळपर्यंत गप्पा मारता मारता ते निद्रादेवीच्या आधीन झाले. मुक्कामाच्या ठिकाणापासून बरदापूर ठाणे १२ मैल अंतरावर होते.

सकाळ झाली. टाकळी सांगवी ते बरदापूर ठाणे हे अंतर पाहण्यास, सोईस्कर मार्ग पाहण्यास श्री. हरिश्चंद्र जाधव आणि राजाभाऊ यांना सांगण्यात आले. ते टाकळी सांगवीहून निघाले. त्यांनी नीट पाहणी करून कोणता मार्ग सोईस्कर होईल हे पाहिले. मार्ग निश्चित केला. आपण योग्य मार्गाची निवड केली या आनंदात ते दोघेही परतले. सैनिकांना ३२ मैलांच्या पायी प्रवासाने शीण झाला होता. सर्वांनी २ दिवस विश्रांती घेतली. अर्थात विश्रांतीच्या वेळातही आखणीची कामे चालूच होती. बरदापूर येथे असणारी रझाकार मंडळी शस्त्रसज्ज. शिवाय त्यांची संख्या ४०० च्या आसपास. पोलीस पथकात ३५ पोलीस. त्यांच्याकडेही शस्त्रसाठा भरपूर. तुलनेत मनुष्यबळ फारच कमी आणि शस्त्रास्त्रेही तोकडी अशी स्वातंत्र्यसैनिकांची अवस्था. काहीजणांनी यशाबद्दल साशंकता व्यक्त केली. अर्थात नाउमेद करण्यासाठी नव्हे तर तयारीचे आणि परिणामाचे यथोचित मूल्यमापन व्हावे म्हणून. सैनिक चौदा होते परंतु एकेक सैनिक दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर शंभर शत्रूंना भारी होता. सैनिक आपल्या



सर्वजण एका मोठ्या वृक्षाखाली जमा झाले

तुटपुंज्या शस्त्रास्त्रावर पूर्ण विश्वासून होते. आपली शस्त्रे यशदात्री आहेत अशी त्यांची श्रद्धा होती.

दोन दिवसाच्या विश्रांतीने सैनिकांना तरतरी आली. दिवस मावळला तशी तयारी सुरू झाली. पृथ्वीवर अंधार हळूहळू पडत होता. आठ वाजले. बरेच अंतर चालावयाचे होते. सांगवी ते बरदापूर या दरम्यान जी गावे होती त्यांना फेरा मारून प्रवास करावयाचा होता. रझाकारांच्या भीतीने गावकरी रात्ररात्र जागून काढीत, पहारा देत. अनोळखी माणसाला रात्री प्रवेश दिला जात नसे. त्यामुळे अशा गावांना वळसा घालून जाणे सैनिकांना क्रमप्राप्त होते. अंधारी रात्र असल्यासारखे भासत होते. रस्ता सैनिकांच्या आणि मार्गदर्शकांच्या पायाखालचा नव्हता. चालण्याचालण्यात अंधारात रस्ता चुकला आणि हे सर्वजण बरदापूरच्या शोधात पहाटे ३ पर्यंत भटकले. शेवटी निराशाच पदरात पडली. बराच वेळ झाला होता. सर्वांनी वेळ न घालविता ताबडतोब परतायचे ठरविले. रात्र वाया गेली याचे दुःख सर्वांना झाले. परंतु तीव्रतेने जाणीव झाली ती हरिश्चंद्र आणि राजाभाऊला. बरदापूरला, इच्छित स्थळापर्यंत नेण्याची जबाबदारी त्यांची होती. मार्गदर्शकच मार्ग चुकला. त्यांनी खालच्या स्वरात दुसऱ्या दिवशी रस्ता न चुकण्याची हमी दिली.

दुसऱ्या दिवशी हरिश्चंद्र आणि राजाभाऊ मार्ग नीट ध्यानात ठेवण्यासाठी, मनाशी काही खाणाखुणा लक्षात घेण्यासाठी बरदापूरपर्यंत जाऊन आले. कालच्या बेरंग परतण्यास आपण कारणीभूत आहोत याचे शल्य दोघांनाही होते. आज त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक रस्त्याची पाहणी केली, काही खुणा लक्षात ठेवल्या आणि ते सांगवीला परतले.

'काय? रस्ता नीट पाहिला ना? नाहीतर आजची फेरीही वाया जायची.' एका सैनिकाने म्हटले.

'आज मार्ग सापडणारच. काळजी नको. आज दोघांनी रस्ता लक्षात ठेवला असणार' दुसऱ्याने म्हटले. पण हे दोघेही गप्प होते. बोलून दाखविण्यात अर्थ नव्हता. सर्वजण दिवस मावळण्याची वाट पाहू लागले. उत्सुकतेमुळे दिवस फारच लांबला असे त्यांना वाटू लागले.

सूर्यनारायण विश्रांतीसाठी विश्रांती कक्षाकडे वळले तसे सैनिकांनी बाहेर पडण्याची तयारी चालविली. शस्त्रास्त्रे बरोबर घेतली. 'काय राजाभाऊ, हरिश्चंद्र, आजचा विचार काय? रस्ता नीट बघितला ना? हो नाहीतर अकारणच पायपीट व्हायची.' काहीजणांनी त्या दोघांना डिवचले—गमतीने—ठरलेल्या वेळी सैनिक सांगवीबाहेर पडले. समोर मार्गदर्शक हरिश्चंद्र आणि राजाभाऊ चालत होते आणि मागे अन्य सैनिक. गावागावांना वळसे देत देत सर्वजण साधारणतः १०–३० सुमारास बरदापूर ठाण्याजवळ आले. हरिश्चंद्र आणि राजाभाऊ यांना समाधान वाटले. 'काय आणले की नाही बरोबर?' त्यांना आता कुठे वाचा फुटली. सर्वजण एका मोठ्या वृक्षाखाली जमा झाले. तेथून बरदापूर ठाणे दिसत होते.

पुन्हा एकदा सूचना दिल्या गेल्या. असलेले सैनिक विभागण्यात आले. अण्णा पाटील यांच्या नेतृत्वाखाली चार सैनिक देण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत गावाकडून येणारी रझाकार वा जनता कुमक रोखावयाची ही जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. कामगिरी अवघड होती. पण सैनिकांचे मनोबल जबरदस्त होते. त्यांनी ही 'खिंड' लढविण्याचे—प्राणपणाने लढविण्याचे ठरविले. त्यांनी सूचनेनुसार आपापल्या जागा घेतल्या.

श्रीनिवास खोत आणि प्रभाकर खेडकर यांच्या तुकडीवर पोलीस ठाण्यावर हल्ला करणे आणि ताब्यात घेणे ही कामगिरी सोपवली होती. त्यांनी आपल्या साथीदारांसह ठाण्याकडे मोर्चा वळविला. इतके सैनिक ठाण्याजवळ आले पण ठाण्यातील पोलिसांना पुसटशी कल्पनाही नव्हती. निझामाच्या राज्यात हबकलेली हिंदू जनता ठाण्यावर हल्ला करण्याचे धाडस करील अशी शंका त्यांना स्वप्नातही आली नाही. ते निर्धास्त होते, निश्चिंत होते.

एप्रिल महिना. वातावरणात कमालीचा उकाडा जाणवत होता. वारा स्थिर राहून सैनिकांची कर्तबगारी डोळे भरून पाहू इच्छित होता. वाऱ्याचे नाव नसल्यामुळे ठाण्यातील सैनिकांनी आपले बिस्तरे बाहेर आणले होते. बिस्तरे पसरून ते आता झोपण्याच्या तयारीत होते. मृत्यू जवळच दबा धरून बसला आहे याची त्यांना कल्पना नव्हती.

संकेतानुसार काशीनाथ मुकदमाने ग्रेनेड फेकला. प्रचंड आवाज झाला. पहारेकरी खाली कोसळला. ठाण्यात एकच गोंधळ सुरू झाला. कोणीकडे पळावे हेच त्या पोलिसांना कळेना. पहारेकऱ्याची रायफल सैनिकांनी ताब्यात घेतली. ठाण्यातील पोलिसांनी गावाच्या दिशेने पळण्याचा प्रयत्न केला. चारजण कामी आले. सातजण जखमी झाले. स्वातंत्र्यसैनिक ठाण्यात घुसले. सगळीकडे कसे शांत शांत होतं. आजूबाजूच्या खोल्यांतून कोणाचीही हालचाल नव्हती. सैनिक इन्स्पेक्टरच्या कार्यालयात घुसले. तेथे रक्तच रक्त 'सांडलेले' होते. जखमी पोलीस इकडून गोदामामार्गे निसटण्यात यशस्वी झाले होते. सैनिकांनी शस्त्रास्त्रांच्या खोलीचा ताबा घेतला. अम्युनिशन पेटी ताब्यात घेतली. पोलिसांजवळ एवढा शस्त्रास्त्रांचा साठा होता. भ्याड. पळाले. प्रतिकारही केला नाही. सैनिकांनी चौफेर नजर टाकली. गावातील हिंदू जनतेची जप्त केलेली हत्यारे कोपऱ्यात जमा करून ठेवलेली होती. १५ टवेल्व्ह बोर आणि शेकडो भरमार बंदुका ताब्यात घेण्यात आल्या. पण एवढे सर्व साहित्य इतके सर्व अंतर चालून कसे नेणार? आपापसात खल केला गेला आणि निवडक हत्यारेच न्यावी असे ठरविण्यात आले. योग्य हत्यारे बाजूला काढण्याचे काम काही सैनिकांवर सोपविण्यात आले.

अन्य सैनिक तिजोरी उघडण्याच्या प्रयत्नाला लागले. जिलेटीन लावून तिजोरी उघडण्यात आली. मोठ्या अपेक्षेने सैनिकांनी तिजोरीत शोध घेतला. त्यांची घोर निराशा झाली. एक मंगळसूत्र आणि काही पैसे हाताला लागले. सैनिक गोदामात शिरले. गोदामात शेंगांची पोती होती. एखाद्या हिंदू शेतकऱ्याचा माल जप्त केला असावा. त्याच खोलीत एक पेटीही मिळाली. तिच्यात अनेक उंची शेरवान्या आणि सरकारी ड्रेस होते. इन्स्पेक्टरची खाजगी पेटी होती ती. शिवाय दोनशे पन्नास रुपयेही मिळाले. पलीकडे ठेवलेला रॉकेलचा डबा काशीनाथ मुकदमने शेंगाच्या पोत्यावर उपडा केला

आणि काडी लावली. शेंगाच्या पोत्यांनी पेट घेताच त्या ठिकाणी लपून बसलेला मनुष्य हात जोडून समोर आला. तो हातापाया पडू लागला, गयावया करू लागला. ठाण्याची दिवाबत्ती करणारा तो न्हावी होता. त्याला दोन सैनिकांच्या स्वाधीन करून शेरखान्या 'अग्नीला अर्पण' करण्याचा कार्यक्रम आटोपण्यात आला. पुढे एखाद्या ॲक्शनमध्ये उपयोगी पडतील म्हणून पोलीसचे ८ ड्रेस, पट्टे, बॅज आणि इन्स्पेक्टरचे सरकारी ड्रेस इत्यादि साहित्यही बरोबर घेण्याचे ठरविण्यात आले सैनिकांनी घड्याळात पाहिले. बापरे ! तीन वाजले होते. बाहेर अण्णा पाटील आणि त्यांचे साथीदार गावाच्या दिशेने फायरिंग करीत होते. त्यांच्या अचूक फायरिंगमुळे तिकडून येण्याचे धाडस कोणालाही करवले नाही. ठाण्यातील सर्व काम आटोपले होते. ताब्यात घेतलेले सर्व साहित्य ठाण्याबाहेर आणण्यात आले. आता वेळ घालविणे धोक्याचे होते. अंबाजोगाईकडे सांगावा गेला असेल. निझामी फौज-पथक येईपर्यंत येथून निसटणे आणि पुढील सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वांची दिशाभूल होण्यासारखे करणे अत्यावश्यक होते. अरेच्चा, एक काम राहिलेच की ! दूर उभ्या असणाऱ्या शेषरावला जवळ बोलाविण्यात आले. ठाण्याची इमारत उडवून द्यावी आणि मग पुढे जावे असा बेत होता. 'हं शेषराव, द्या तुमच्याकडील चिखल.' खोतांनी त्याला म्हटले. शेषरावाला चिखलाचे महत्त्व कळले नव्हते. ओझे कमी व्हावे म्हणून वाटेत थोडा थोडा करीत सर्व चिखल फेकून दिला होता. शेवटी तेथील माती आणि रांजणातील पाणी घेऊन चिखल बनविण्यात आला. परंतु तेथील माती बर्डी असल्याने चिखल मनाजोगा झाला नाही. परंतु आता इलाज नव्हता. इमारत उद्ध्वस्त करण्याचे साहित्य इमारतीस लावण्यात आले. चिखलाचा थर देण्यात आला. बत्ती पेटविण्यात आली. कानठाळ्या बसविणारा आवाज झाला. ठाण्याची संपूर्ण इमारत हादरली, परंतु कोसळली नाही. चिखलाने घात केला होता. परंतु आता बोटे मोडून काय उपयोग ? इमारतीला दोन मोठे चिरे पडले. बस्स ! यावरच समाधान मानणे आता क्रमप्राप्त होते.

सर्व काम आटोपले. योजना यशस्वी झाली होतीच. परतायची घाई सुरू झाली. सैनिकांच्या ताब्यातील न्हाव्याला अभय देण्यात आले. त्याने पढविलेले सांगावे अन्यथा मरण्यास सिद्ध रहावे असे त्यास बजाविण्यात आले.

ठाण्यातील जास्तीत जास्त साहित्य घेऊन सर्व सैनिक विजयाच्या आनंदात निघाले. अरेरे ! घाईघाईत वॉटरबॅग विसरली. ती वॉटरबॅग अत्यंत महत्त्वाची होती. त्या वॉटरबॅगेत बरदापूर ठाण्याचा एक नकाशा आणि सैनिकांच्या जाण्यायेण्याचा मार्ग दाखविला होता. सैनिकांना आपल्या ॲक्शनचा आनंद झाला होता. ते उत्साहाने सांगवी मार्गाला लागले.

अंधाराचा पडदा विरळ होत चालला होता. सहस्ररश्मी सैनिकांवर गुलाल उधळत होता. सैनिकांना उत्साही वाटावे म्हणून वारासुद्धा वहात होता. सारे वातावरण प्रसन्नसे होते. सैनिक यशश्री प्राप्त करून परतत असल्यामुळे स्वाभाविकपणेच प्रसन्न होते. आपल्या कॅंपपासून शंभरएक मैल आत येऊन, अपुऱ्या सैनिकांनिशी आणि तोकड्या शस्त्रास्त्रांनिशी अशी अवघड कामगिरी बजावणे—पार पाडणे सोपे नव्हते. सकाळी ९ च्या सुमारास सांगवी गावाजवळील वांजरा नदीजवळ हे सैनिक पोचले. तेथून यशस्वी झाल्याचा निरोप, त्यांनी गावात पाठविला. कामगिरी आटोपली होती. आता श्रम जाणवत होते. भूकही कडाडून लागलेली होती.

निरोप कळताच सांगवीचे लोक खाण्याचे पदार्थ घेऊन आले. खाता खाता परतण्यासंबंधी विचारविनिमय सुरू झाला. एवढा मोठा बोजा घेऊन ३२ मैलांचे अंतर कापावयाचे होते. पाठलागाची भीती होतीच. दुर्दैवाने वॉटरबॅग विसरल्याचे कोणाच्याही लक्षात आले नाही. गावातून एक बैलगाडी घ्यावी आणि श्रीनिवास खोतांनी बैलगाडीतून निवडक सैनिकांसह जावे आणि अन्य सर्वांनी अण्णा पाटलांसोबत आपल्या ठरलेल्या मार्गांनी जावे असे ठरले. गाडीची किंमत चुकविण्यात आली—देण्यात आली. सामान भरण्यात आले आणि सैनिक आपापल्या मार्गाला लागले. ◻

साधारणतः दुपारी १२ वाजता निझामी फौजेचे पथक बरदापूर ठाण्याजवळ आले. प्रमुखाने पाहिले तर सर्वत्र सामसूम—त्याने ठाण्यात प्रवेश केला. त्याला पहाताच न्हावी समोर झाला आणि त्याने गळा काढला.




प्रमुखाने त्याला गप्प केले आणि काय घडले ते सांगण्यास सांगितले. 'साब, देडसो लोग थे। हत्यारबंद। बमभी साथ थे। मुसलसील फायरिंग करते रहे। हरामजादोने अपने चार सिपाही मारे। बहुतसे जखमी हुवे है।' 'उनकी कुछ बातचीत तुमने सुनी?' प्रमुखाने विचारले. 'जी हां, वह सब नांदेड मीटर गेजसे जानेवाले है।' न्हाव्याने सांगितले. प्रमुखाने ठाण्यात शोधक नजर टाकली. त्याच्या दृष्टीस वॉटरबॅग पडली. त्याने ती उचलली आणि सहज म्हणून उघडली. अरेरे, घात झाला. प्रमुखाला शंका आली. त्याने आत पाहिले आणि आतील कागद बाहेर काढला. कागदावरील नकाशा आणि जाण्यायेण्याची इत्थंभूत माहिती पाहून त्याला खूप आनंद झाला. 'कंबख्त, अब कहाँ जाएंगे? उन गद्दारोंको हम मजा चखाएंगे।' प्रमुखाने सैनिकांना इशारा केला आणि ते सर्व ठाण्याबाहेर पडले आणि नकाशात दर्शविलेल्या मार्गाकडे वळले. ¤

गाडीसोबतचे स्वातंत्र्यसैनिक संध्याकाळी ७ वाजता पिंपरी मुक्कामी पोचले. रस्त्यात जोड जवळ्याशिवाय अन्य गाव नव्हते. त्यामुळे हा रस्ता रहदारीचा नव्हता. या सैनिकांना आता पाठलागाचे भय नव्हते. सरहद्द केवळ १२ मैलांवर होती.

निझामी घोडदलाने सापडलेल्या नकाशाधारे सैनिकांचा पाठलाग सुरू केला. एक तास-दोन तास. समोर पहात, दातओठ खात दौडत आहेत. शत्रूचा घोट घेण्यास अत्यंत उत्सुक झालेले हे घोडदळ निराश झाले. 'कंबख्त कहाँ गायब हुवे? मिल जाए तो चकनाचूर कर दूंगा।' लाल पडलेल्या प्रमुखाने म्हटले. शेवटी हात हलवीत, फजित होऊन त्याला परतावे लागले.

'वॉटरबॅग' हे खास प्रकरण होते. छत्रपती शिवरायांचे आपण वारस. त्यांचा वारसा आपण चालवावा म्हणून या स्वातंत्र्यसैनिकांनी एक शक्कल काढली. त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील शाहिस्तेखान प्रकरणाचा नीट अभ्यास केला. अशा जोखमीच्या कामगिरीत पाठलागाचे भय असतेच. पाठलाग होणारच हे नेहमी गृहीत धरावयाचे असते आणि संभाव्य पाठलाग चुकीच्या मार्गाला लावून आपणास सुरक्षितता कशी लाभेल हे पहाणे प्रत्येक योजकाला अत्यंत आवश्यक असते. योजनेत हा सावधपणा अत्यंत महत्त्वाचा असतो. तेव्हा निझामी पोलीस, रझाकार वा फौज पाठलागाला निघालीच तर त्यांची दिशाभूल करता यावी म्हणून त्या निर्जीव वॉटरबॅगचा उपयोग करण्यात आला. स्वातंत्र्य सैनिकांचा डाव यशस्वी झाला. निझामी फौजेने नको त्या दिशेला घोडदौड केली, शोधाशोध केली. बिचारे! शेवटी हात हालवीत निराशहोत्साते परतले. सैनिकांचा डाव यशस्वी झाला. वॉटरबॅगने निझामी फौजेच्या डोळ्यात चांगलीच धूळ फेकली. ¤

पिंपरी येथे ७-८ तास विश्रांती घेऊन सैनिक झपाट्याने सरहद्दीकड निघाले. त्यांचे मन आता आगळगाव कँपकडे ओढ घेत होते. आपल्या सहकाऱ्यांना आपल्या या योजनेची-मोहिमेची हकीकत केव्हा एकदा सांगतो असे त्यांना झाले होते. सोबत मार्ग दाखविण्यासाठी पिंपरीचे दोन माहीतगार होते. अंतर झटापट कापले जात होते. या सैनिकांना ढोकी ते यरमाळा यांच्यामधून सरहद्दीबाहेर जावयाचे होते. दोन्ही केंद्रांवर निझामी सैनिकांचा पहारा होता. शिवाय मिलिटरी पेट्रोलिंगच्या गाड्या सतत त्या मार्गावरून जात-येत. एवढी एक सडक ओलांडली की धोका संपणार होता. अत्यंत सावधपणे स्वातंत्र्यसैनिकांनी ती सडक ओलांडली. झाले! ते संकटमुक्त झाले. आता त्यांना कोणताही धोका नव्हता. सूर्योदयापूर्वीच त्यांनी निझामी हद्द सोडून भारतात प्रवेश केला होता. आता ते राजे होते. भारतीय हद्दीत पोचताच सैनिकांनी सुटकेचा श्वास सोडला. सर्व सैनिकांनी सुरक्षितपणे भारतात प्रवेश केला होता. झपाझप पावले उचलीत सैनिक तासाभरात तडोळ्याला आले. तेथून रेल्वेने ते बार्शीला आले. सर्व सुखरूपपणे पार पडले. श्रींची इच्छा. पायी चालण्याचे व इतर कामाचे भरपूर श्रम झाले होते. परंतु मोहिमेत यश मिळाले त्याचा आनंद कितीतरी पटीने जास्त होता. श्री. अण्णा पाटील आणि त्यांचे साथीदार सैनिक सांगवी ते लातूर बारा मैल पायी प्रवास करून पुढे लातूर-बार्शी प्रवास रेल्वेगाडीने केला होता. मोहिमेसाठी गेलेले सर्व सैनिक सुरक्षित होते. सिंहाच्या गुहेत शिरून सिंहाची आयाळ कुरतडून आणावी तसे या सैनिकांनी निझामी हद्दीत 'खोल' शिरून, पोलीसठाण्यावर हल्ला करून, अमाप शस्त्रसाठा आणला होता. शिवाय शत्रूचे चार पोलीस मारले होते. आठ पोलीस जखमी झाले होते.

या हल्ल्याची तीव्र प्रतिक्रिया झाली. रझाकार हादरले, फौजी लोग भयंकर संतापले, निझामी पोलीस घाबरले. निझाम सरकारची झोप उडाली. असफिया झेंडा लाल किल्ल्यावर लावणे दूर, आपल्या ठाण्यांचे आपणास संरक्षण करता येत नाही याची जाणीव होऊन निझामाला धक्का बसला. मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरू झाली. निष्पाप लोकांना मारझोड करण्यात आली. मोहिमेचे धागेदोरे मिळावेत म्हणून फार प्रयत्न केले गेले. परंतु सर्व व्यर्थ गेले. स्वातंत्र्यसैनिक कधीचेच आपल्या कँपला परतून दुसऱ्या मोहिमेच्या तयारीला लागले होते.

**मुक्तिलढ्यातिल लढवय्या रे**
**स्फूर्तिप्रद हो तव गाथा**
**तुझ्या यशाते श्रवता-कथिता**
**विनम्र होतो माथा!!**

□ □



# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

---

'मार्टिनियर' जहाजावरून सर्व गुन्हेगार फ्रेंच गियानामधील 'मारोनी' नावाच्या खेड्यात जाऊन पोचले. दोनच दिवसात पॅपिलॉन आणि देगा आजारपणाच्या सबबीवर रुग्णालयात दाखल होण्यात यशस्वी झाले. तिथे सुटकेच्या योजनेवर विचारविनियय झाला. जोन्स आणि मॅच्युरेट या दोन साथीदारांसह एका होडीतून पॅपिलॉन रात्रीच्या वेळी पसार झाला. या कटात त्यांना ज्या माणसाची मदत झाली, त्याच्या सल्ल्यानुसार एका निनावी छोट्या बेटावर आश्रय घेण्यास ते निघाले....

---

## प्रकरण चार
## महारोग्यांच्या वस्तीत दाखल

अंधार हळूहळू कमी होत गेला. आम्ही कुठ जमीन दिसते का ते पाहात होतो, जी फक्त जीझसलाच माहीत होती. जेव्हा ती प्रत्यक्ष दिसू लागली तेव्हा पहाटेचे चार वाजून गेले होते. आम्ही जवळ जवळ झाडीतच शिरलो. पाण्यातील छोट्या छोट्या वनस्पती होडी जाऊ लागताच खाली वाकत आणि आम्ही पुढे गेल्यावर पुन्हा उभ्या होत. त्यांच्यामुळे एक प्रकारचा संरक्षक पडदाच उभा राहिला होता. होडी जाऊ शकेल इतकं पाणी आहे किंवा नाही हे पाहाण्याची दक्षता घेणं जरूर होतं. पुढे दलदल असावी. वाटेत येणाऱ्या फांद्या बाजूला सारत आम्ही मार्गक्रमण करत होतो. हा प्रकार जवळ जवळ एक तासभर चालू राहिला. एकदम एक पट्टा दिसू लागला आणि आम्ही थांबलो—आमचं मुक्कामाचं ठिकाण आलं होतं. किनाऱ्यावर स्वच्छ गवत पसरलं होतं. सहा वाजायला आले होते तरीही मोठमोठ्या वृक्षांच्या पानांमधून प्रकाश खाली

शिरकाव करू शकत नव्हता. त्या आकर्षक छताखाली आम्ही पाय पसरून बसलो. शेकडो प्राण्यांचे निरनिराळे आवाज ऐकू येत होते पण आम्हाला ते पूर्णपणे अपरिचित होते. जीझस म्हणाला, 'मी म्हणत होतो ते हेच ठिकाण. इथे तुम्हाला एक आठवडा काढायचा आहे. मी बरोबर सातव्या दिवशी परत येईन. येताना अन्नसामुग्री घेऊन येईन.' त्या दाट वनस्पतींमधून त्यानं एक छोटा पडाव ओढून काढला–अंदाजे सहा फूट लांब. त्यावर दोन वल्ही होती. अशा पडावावरून तो भरतीच्या वेळी सेंट-लॉरेंटकडे परतणार होता.

आता आम्ही जोन्सकडे लक्ष पुरवलं. तो किनाऱ्यावर आडवा पडला होता. अद्याप तो त्याच्या जुन्या कपडयातच होता, तसेच पाय अनवाणी. आम्ही कुऱ्हाडीने चांगल्या कोरडया फांद्यांचे सारखे सारखे तुकडे केले. जीझसच्या जोडीदाराने जोन्सच्या पायाला सरळ खालपासून वरपर्यंत मालिश करायला सुरुवात केली; बिचाऱ्याच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. एका विवक्षित ठिकाणी तो एकदम ओरडला, 'थांब, थांब. या स्थितीमध्ये जरा बरं वाटतंय, म्हणजे हाड जागच्या जागीच नीट असावं.' त्याच्या पायाला मधाचचे फांदीचे छोटे छोटे तुकडे आम्ही पिंजऱ्यासारखे बांधले. त्यामुळे त्याला बराच आराम वाटू लागला. जीझसनं चार विजारी, चार सदरे आणि चार जाकिटं आणली होती. जोन्स आणि मॅच्युरेटन ते कपडे अंगावर चढवले. मी मात्र अरबाचे चढवलेले कपडे तसेच ठेवले. नंतर आम्ही थोडी थोडी रम घेतली. निघाल्यापासूनची ही दुसरी बाटली; त्यानं अंगात जरा उष्णता निर्माण झाली, आणि त्याची आवश्यकताच होती. डास आम्हाला क्षणभर स्वस्थता लाभू देत नव्हते; त्यासाठी एक तंबाखूचं पाकिट वाया घालवावं लागलं. तंबाखू ओली करून ती आम्ही आमच्या तोंडावर, हातावर आणि पायावर चोळली. जाकिटं अप्रतिम होती. त्या कडाक्याच्या थंडीतही आम्हाला खूप ऊब मिळत होती.

'ठीक आहे, आम्ही आता निघतो. पण इथून आठ दिवस अजिबात हलू नका.' जीझसनं बजावलं, 'आम्ही सातव्या दिवशी परत येऊ. मग आठव्या दिवशी तुम्ही समुद्राच्या दिशेनं निघू शकता. तोवर शीड आणि डोलकाठी तयार करा; होडीकडे लक्ष द्या. पॅपिलॉनला सर्व काही माहीत आहेच. आम्ही दहा दिवसात जर इकडे परत आलो नाही, तर आम्हाला खेडयात अटक झाली आहे असं निश्चित समजा. तुम्ही वॉर्डरवर हल्ला केल्यामुळे सुटकेचं प्रकरण अधिक गंभीर झालेलं आहे. तिकडे तुरुंगात काय घडत असेल देव जाणे.'

मी एका झुडुपाआड गेलो आणि परत येताना हजार फ्रँकची एक कोरी करकरीत नोट घेऊन आलो. करारात ठरलेलं नसताना मी ती जीझसला देऊन टाकली.

आम्ही आमच्या बंदुका तुरुंगाच्या आवारातच टाकून दिल्या होत्या. जीझसच्या म्हणण्याप्रमाणे ते फार चांगलं झालं होतं. कारण आता आमचा शोध घेण्यासाठी कोणी आलंच तर त्यांच्या जवळ छोटं पिस्तुल आणि छोटा चाकू असणार होता. आम्ही सशस्त्र आहोत अशी शंका त्यांना आली असती तर तेही तयारीनिशी निघाले असते वगैरे.

अच्छा, अच्छा. आम्ही जर त्यांना सापडण्याची शक्यता निर्माण झाली आणि होडी टाकून पळत जावं लागलं तर झाडीमधून लपत-छपत जायचं आणि पुढे दिशायंत्राच्या साहाय्यानं उत्तरेकडे दोन-तीन दिवस चालत राहायचं. नंतर 'चार्विन' नावाची एक 'मृत्यू-छावणी' लागेल. तिथे कोणाला तरी पैसे चारून जीझसकडे निरोप पाठवायचा की आम्ही अमुक अमुक ठिकाणी आहोत. बस्! हा कार्यक्रम ठरला.

त्या दोघांनी पडाव पाण्यात ढकलला. काही क्षणातच तो दिसेनासा झाला आणि नंतर आम्हाला काही दिसलं नाही की ऐकू आलं नाही.

झाडीवर सूर्यप्रकाश अगदी खास पद्धतीने पडलेला दिसतो. तुम्हाला असं वाटेल की आपण एखाद्या मंडपाखाली बसलो आहोत आणि त्याच्या छतावर उन्हं अडलेली आहेत–अगदी एका किरणालाही खाली प्रवेश नाही. हवा चांगलीच तापू लागली होती. मी, मॅच्युरेट आणि जोन्स अगदीच एकाकी पडलो होतो. आमची पहिली प्रतिक्रीया काय झाली असेल तर. आम्ही मोठमोठ्याने हसायलाच लागलो–सगळं कसं अगदी हलकं हलकं वाटू लागलं. त्यातल्या त्यात खटकणारी एकच गोष्ट होती–जोन्सचा दुखावलेला पाय. अर्थात त्याच्या म्हणण्याप्रमाणे पायाला खूपच आराम पडला होता. आम्ही झटपट कॉफी तयार केली. प्रत्येकानं एकेक मोठा मग भरून ती काळी कॉफी घेतली. साखर भरपूर घातल्यामुळे एकदम मजा आली. संध्याकाळपर्यंत आम्ही आमच्याच सरवराईमध्ये इतके दंग झालो होतो की आम्हाला होडी आणि त्यातील सामान यांच्याकडे लक्ष द्यायला वेळच झाला नाही. ते काय नंतरही पाहाता येईल. आम्ही आता अगदी स्वतंत्र, स्वतंत्र. मी 'गियाना'ला पोचल्या पासून बरोबर सदतीस दिवस झाले होते. हे पलायन जर यशस्वी ठरले तर मला काही जास्त शिक्षा भोगावी लागली नाही. मी मोठ्याने म्हणालो, 'न्यायाधीश महाराज, फ्रान्समध्ये जन्मठेप किती वर्षांची असते?'–आणि खदखदा हसू लागलो. मॅच्युरेटनं तेच केलं. पण लगेच जोन्स म्हणाला, 'हे पाहा, आतापासूनच उडया मारू नका. कोलंबिया इथून खूप दूर आहे, आणि आपली ही जी तकलादू होडी आहे ना, तिचा मला अजिबात भरवसा वाटत नाही. आपल्याला भर समुद्रातून प्रवास करायचा आहे!'

याचं म्हणणं खरंच होतं. त्या छोटया होडक्याचा आम्हाला खरोखरच काही उपयोग नव्हता. माझी मूळ कल्पना अशी होती की या होडीतून आपल्याला जीझस समुद्र प्रवासाला उपयुक्त अशा होडीपर्यंत घेऊन जाणार आहे. पण ती चूकच ठरली होती. तरीही माझ्या मित्रांची निराशा होऊ नये म्हणून आत्तापर्यंत ती गोष्ट मी मी काढलीच नव्हती. असो.

पहिला संपूर्ण दिवस आम्ही गप्पागोष्टीत आणि जवळपासच्या झाडीचं निरीक्षण करण्यात घालवला–जी आम्हाला अगदीच नवीन होती. खारी आणि माकडं हे प्राणी झाडांवरून आश्चर्यकारक उडया मारत होते. नंतर एक जंगली डुकरांचा कळप पाणी पिण्यासाठी आला–तो कळप जवळ जवळ दोन हजारांचा होता. एकाएकी कुठून देव जाणे पण एक सुसर तेथे उगवली आणि तिने आपल्या

**आम्ही स्वतंत्र स्वतंत्र. मी गियानाला पोचल्यापासून सदतीस दिवस झाले होते.**

जबड्यात एक डुकराचं पिलू पकडलं. त्याबरोबर ते वाफेच्या इंजिनासारखं केकाटू लागलं. त्याचा आवाज ऐकल्यावर शेकडो डुकरं सुसरीवर तुटून पडली; तिच्या जबड्याला चावा घेण्याचा प्रयत्न करू लागली. सुसरीच्या शेपटीच्या प्रत्येक फटकाऱ्याबरोबर एक एक डुक्कर हवेत उडत होतं—एकदा उजवीकडे, एकदा डावीकडे. त्या गोंधळात एक बिचारं मरून गेलं आणि पोट वर होऊन तरंगू लागलं. त्याबरोबर त्याच्या साथीदारांनी त्याचा फडशा पाडला. रक्तामुळे तिथे पाणी लाल दिसू लागलं. हे नाटक वीस मिनिटे चाललं आणि सुसरबाईंनी पाण्याखाली पळ काढला. त्यानंतर पुन्हा ती आम्हाला दिसली नाही.

रात्री आम्हाला छान झोप लागली. सकाळी उठल्यावर आम्ही कॉफी करून घेतली. माझ्या चाकूचा उपयोग करून मॅच्युरेटनं माझी आणि जोन्सची जमेल तशी दाढी केली. त्याला स्वतःला दाढी नव्हतीच. नंतर आम्ही होडीतून एकूण एक सामान बाहेर काढलं— पाण्याच्या पिपासह. ते पाणी बरंच जांभळट दिसत होतं. पाणी टिकावं म्हणून जीझसनं त्यात भरपूर परमँगनेट टाकलं असणार. होकायंत्र अगदी शाळकरी मुलाला उपयोगी पडेल असं होतं. त्यात फक्त चारी दिशा दाखवल्या होत्या, त्या व्यतिरिक्त सारख्या खुणा पाडलेल्या नव्हत्या. आठ फूट लांबीच्या कापडापासून आम्ही शिवून शीड तयार केलं, आणि ते उभारण्यासाठी कडेला दोर बांधला. होडी स्थिर राहण्यासाठी उपयुक्त होईल असं दुसरं एक त्रिकोणी शीडही शिवून ठेवलं.

आम्ही नंतर होडीची तपासणी सुरू केली. होडीचा तळ फारसा सुरक्षित नव्हता. डोलकाठी अडकवण्याची फट पार खलास झाली होती. तो पाजी जीझस आम्हाला मृत्यूकडेच रवाना करीत होता. मी हे सत्य माझ्या मित्रांना सांगून टाकलं. त्यांच्यापासून ही गोष्ट लपवून ठेवणं अयोग्य होतं, आता त्यावर काय उपाय होता? फक्त एकच मार्ग होता— जीझस आल्यावर त्याला एखादी भक्कम होडी आणायला सांगणे. त्याच्या जवळची हत्यारं काढून घेऊन आणि जवळ चाकू-कुऱ्हाड बाळगून त्याच्याबरोबर मी खेड्यात जावं, आणि दुसरी होडी पहावी. तसं करण्यात धोका मोठाच होता; पण त्या पहिल्या होडीतून नव्हे शवपेटीतून— समुद्रात शिरण्याएवढा तो मोठा तर निश्चितच नव्हता. बाकी पदार्थ मात्र भरपूर होते. खाद्यपदार्थांच्या साठ्यावर आम्ही कित्येक दिवस काढू शकणार होतो.

त्या दिवशी सकाळी एक चमत्कारिक युद्ध आम्हाला बघायला मिळाले. करड्या रंगाचा आणि काळ्या रंगाचा चेहरा असलेल्या दोन माकडांच्या टोळ्यांमध्ये ते जुंपलं होतं.

आता इथे येऊन आम्हाला पाच दिवस आणि चार रात्री झाल्या होत्या. काल रात्री पाऊस मुसळधार पडला होता. आम्ही जंगली केळीच्या पानाखाली आसरा घेतला. पानांच्या कडावरून पाणी बाजूला ओघळत होतं, परंतु आम्ही अजिबात भिजलो नाही, फक्त पायच काय ते ओलेचिंब झाले. आज सकाळी कॉफी घेताना मी जीझसच्या दुष्टपणाबद्दल विचार करू लागलो. आमच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यानं तसली कुजकी होडी आमच्या गळ्यात मारली होती. केवळ पाचशे किंवा फारतर हजार रुपये वाचविण्यासाठी तो आम्हा तिघांना मृत्यूकडे हमखास पाठवत होता. त्याच्याकडून दुसरी होडी बळजबरीनं मिळवल्यावर त्याला ठार का मारू नये याचा विचारच केला पाहिजे.

अचानक आमच्या कानावर किंचाळण्याचा विचित्र आवाज पडला. आम्ही एकदम दचकलो. मॅच्युरेटला बरोबर घेऊन चाकू हातात धरून आवाजाच्या दिशेला मी गेलो. पाहातो तर कोंबडीसारखा एक प्राणी सापळ्यात अडकला होता. त्याचं ओरडणं ऐकवत नव्हतं. मी एका फटक्यासरशी त्याचं डोकं उडवलं. त्याचं वजन १० पौंड तरी असणार! आम्ही त्याला खाण्याचा निर्णय घेतला. पण त्या सापळ्यामुळे आमच्या मनात नाना शंका कुशंका येऊ लागल्या. इथे जवळपास कोणीतरी नक्कीच असणार! आता दिवसा विस्तव पेटवण्यात अर्थ नाही. निदान रात्रीच्या वेळी तरी शिकारी लोक येण्याची शक्यता नाही. आम्ही पाळीपाळीनं पहारा करायचं ठरवलं. होडी फांद्याखाली लपवली आणि पदार्थांचा साठा झाडीत लपवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजायच्या सुमारास माझी पहाऱ्याची पाळी आली. आदल्या रात्री आम्ही जेवताना त्या कोंबडीचा किंवा जो कोणता प्राणी होता त्याचा फन्ना केला. त्याच्या सूपमुळे आम्हाला खूपच हुशारी वाटली आणि मांस जरी फक्त उकळून घेतलं होतं तरी स्वादिष्ट लागलं होतं. तर मी पहाऱ्यावर हजर होतो. पण एक मोठ्या काळ्या मुंग्यांची रांग पहाण्यात इतका गुंग होऊन गेलो की माझं काम मी पार विसरून गेलो. पानाचे लहान तुकडे घेऊन त्या मुंग्यांची शिस्तबद्ध ये-जा चालू होती. जवळच त्यांचं वारूळ होतं. मुंग्यांची लांबी जवळ जवळ एक इंच होती आणि त्या पायावर उंच उभ्या राहिलेल्या दिसत होत्या. त्यांच्या कुवतीच्या मानानं त्या पानाचा खूपच मोठा तुकडा उचलून घेऊन जात होत्या. रांगेबरोबर मी वनस्पतीपर्यंत गेलो, जिथून त्या पानं कुरतडत होत्या. त्यांची प्रत्येक हालचाल सघटित आणि पूर्णपणे योजनापूर्वक होती.

प्रथम पानं तोडणाऱ्या मुंग्या; त्यांनी फक्त पानांचे तुकडे तयार करायचे, त्याखेरीज इतर काहीही नाही. एका लांबलचक पानावर त्यांची ती कामगिरी चालू होती आणि अगदी थोड्या अवधीत त्या कौशल्याने सारख्या आकाराचे तुकडे खाली जमिनीवर टाकत होत्या. खाली साधारण तशाच स्वरुपाच्या मुंग्या होत्या— फरक फक्त इतकाच की त्यांच्या तोंडाजवळ राखी रंगाचा लहानसा पट्टा दिसत होता. त्या अर्धवर्तुळात उभ्या होत्या, पानं वाहून नेणाऱ्या मुंग्यावर त्या लक्ष पुरवत होत्या. उजवीकडून पानांचे तुकडे उचलल्यावर त्या डावीकडे वळून आपल्या प्रचंड वारुळाकडे कूच करीत. पण पानांचे तुकडे उचलायच्या धांदलीमध्ये काही काही वेळा तिथे गर्दी होई आणि क्रम चुके; की लगेच बाजूच्या लक्ष देणाऱ्या पोलिस मुंग्या हस्तक्षेप करीत आणि काम पुन्हा सुरळीत सुरू होई. त्यातल्या एका मुंगीचा काय अपराध झाला कुणास ठाऊक; पण तिला रांगेबाहेर काढण्यात आलं, एका पोलिस मुंगीनं तिच्या डोक्याला कडकडून चावा घेतला आणि दुसरीनं तिचे मधोमध दोन तुकडे केले.

## हे पलायन जर यशस्वी ठरले तर.....



'त्यातला पॅपिलॉन कोण ?'
'मीच तो.'

त्या पोलिस मुंग्यांनी ओळीतल्या दोन कामगारांना थांबवलं, दोघींनी आपल्या डोक्यावरचं ओझं बाजूला ठेवून एक लहानसा खड्डा तयार केला; अपराधी मुंगीचे तीनही भाग त्यात पुरून टाकले— डोकं, छाती व तळाचा तुकडा— आणि वर माती लोटली.

## पिजन बेट

या सगळ्या दृष्यामुळे मी अगदी थक्क होऊन गेलो. त्या पोलिस-मुंग्यांची दादागिरी पाहात पाहात वारुळाच्या तोंडापर्यंत चालत गेलो. एकाएकी माझ्या कानावर आवाज पडल्यामुळे मी चकित झालो अन् दचकलो, 'अजिबात हालचाल करू नकोस, नाहीतर मेलास म्हणून समज. मागे वळ.' एक खाकी चड्डी आणि लाल चामड्याचे बूट घातलेला माणूस मला दिसला. तो वर उघडाबंब होता. त्याच्या हातात दोन बारांची बंदूक होती. मध्यम देहयष्टी आणि काळवंडलेला चेहेरा. डोक्यावर टक्कल आणि तोंडावर भडक निळ्या रंगाचे पट्टे गोंदलेले होते. कपाळाचे मध्यभागी काळ्या रंगात फुलपाखरू गोंदलेलं होतं.

'तुझ्याजवळ शस्त्र आहे ?'
'नाही.'
'एकटाच आहेस ?'
'नाही.'
'मग तुम्ही कितीजण आहात ?'
'तीन.'
'मला तुझ्या मित्रांकडे घेऊन चल.'
'तसं करणं मला योग्य वाटत नाही. एकाजवळ बंदूक आहे, आणि तुझा काय विचार आहे हे समजल्याखेरीज तू ठार व्हावं हे सुद्धा बरोबर नाही.'
'असं ? मग तू एक इंचभरही हलू नकोस, फक्त शांतपणे बोलत राहा. हॉस्पिटलमधून पळ काढलेले ते तुम्हीच तिघं आहात का ?'
'होय.'
'त्यातला पॅपिलॉन कोण ?'
'मीच तो.'
'मग ठीकच झालं. आता मी तुला सांगतो की तुमच्या पळून जाण्यामुळे तिकडे खेड्यात खूपच खळबळ माजली आहे. शिक्षा भोगून सुटलेल्या जवळजवळ निम्म्या लोकांना अटक झालेली आहे.' तो माझ्याजवळ आला, बंदूक खाली केली, आणि आपला हात माझ्या दिशेनं पुढे केला. 'माझं नाव ब्रेटन,' तो म्हणाला, 'तू माझ्याबद्दल काही ऐकलं आहेस का ?'
'नाही, पण इतकं समजतय् की तू काही मागं काढणारा नाहीस.'
'तुझं बरोबर आहे. मी इथे होक्को प्राण्यांना पकडण्यासाठी सापळे लावून जातो. कोणीतरी माझा एक प्राणी पळवलेला दिसतो आहे. का ते तुम्हीच आहात ?'
'हो. आम्हीच त्याला मारलं.'
'बरं ! तुला थोडी कॉफी पाहिजे का ?' त्याच्याजवळ एक थर्मास होता : मला थोडी कॉफी देऊन त्यानं स्वत: देखील घेतली. मी म्हणालो, 'चल, माझ्या मित्रांना भेटू या. तो तिकडे आला आणि आमच्याजवळ खाली बसला. माझी बंदुकीची थाप समजल्यावर त्याला खूपच मौज वाटली. तो म्हणाला, 'मला शंका नाही आली, कारण सगळ्यांची अशीच कल्पना आहे की तुम्ही एक बंदूक घेऊन पळाला आहात. त्यामुळे तुमच्यामागे इथपर्यंत कोणीही येण्याच्या भानगडीत पडणार नाही.'

तो येथे वीस वर्षे राहात होता. त्यातील पंधरा वर्ष शिक्षा भोगली आणि पाच वर्ष सुटून झाली. फ्रान्सला न जाता तो येथेच स्थायिक झाला. येथील झाडं झुडपं हेच त्याचे देव बनले होते आणि त्यावरच तो आपला उदरनिर्वाह करीत असे. सापांची कात आणि प्राण्यांची कातडी, रंगीबेरंगी फुलपाखरं गोळा करणे आणि विकणे; सर्वात महत्त्वाचं काम म्हणजे 'होक्को' प्राणी जिवंत पकडणे, ज्याचा आम्ही नुकताच फडशा पाडला होता. त्या एकाचे त्याला दोन अडीचशे फ्रँक्स् सहज मिळत असत. मी त्याला पैसे देऊ केले पण त्यानं घेण्याचं साफ नाकारलं. त्याच्या सांगण्यावरून तो प्राणी किती बहुमोल होता ते आम्हाला समजलं. खेड्यात त्याला खूपच मागणी होती कारण तो कोंबड्यांचं उत्तम रक्षण करतो. चुकलेल्या कोंबड्या बरोबर हुडकून आणतो. उंदीर, साप, टोळ, गोम इत्यादी प्राण्यांना मारून टाकतो वगैरे वगैरे—आणि या कमालीच्या उपयुक्त प्राण्याला आम्ही एखाद्या सामान्य कोंबडीप्रमाणे खाऊन टाकलं होतं.

ब्रेटननं आम्हाला सांगितलं की जीझस आणि इतर तीस लोकांना अटक झाली होती. त्यांना सेंट-लॉरेंटवर डांबून ठेवलं होतं. त्यांच्यापैकी कोणी अलीकडे हॉस्पिटलच्या आसपास घुटमळताना दिसत होता काय याची चौकशी चालू होती. त्या अरबाला तर अंधार कोठडी दाखवण्यात आली होती. आम्हाला मदत केल्याच्या आरोपावरून त्याला एकांतवास दिला होता. आम्ही त्याला मारलेल्या दोन फटक्यांचा मागमूसही राहिला नव्हता, पण पहारेकऱ्यांच्या डोक्यावर मात्र खूपच सूज आलेली होती. ब्रेटन सुटकेची योजना आखू शकेल असा संशय कोणालाही न आल्यामुळे तो पकडला गेला नव्हता.

त्यानं सांगितलं की जीझस अत्यंत हलकट आहे. मी त्याला होडीविषयी सांगितल्यावर त्यानं ती पाहाण्याची इच्छा व्यक्त केली. त्याला होडी समोर नुसती दिसली आणि लगेच तो ओरडला, ' अरेच्या, तो पाजी माणूस तुम्हाला मृत्युमुखीच टाकणार होता ! ही जीव नसलेली होडी समुद्रात तासभरही टिकणार नाही. पहिल्याच लाटेनं याचे दोन तुकडे होतील. यातून तुम्ही मुळीच जाऊ नका बरं ! –ती आत्म हत्याच ठरेल. '

' मग आम्ही काय करावं ?'

' जवळ काही पैसे आहेत ?'

' होय. '

' मग मी सांगतो काय करायचं ते : फार कशाला, मी तुम्हालाच मदत करीन. तुमची तेवढी नक्कीच लायकी आहे. तुम्ही आता खेड्याच्या जवळपास कोणत्याही परिस्थितीत फिरकू नका. एक उत्कृष्ट होडी पैदा करण्यासाठी तुम्हाला ' पिजन ' बेटावर जावं लागेल. तिथे जवळ जवळ दोनशे महारोगी राहातात. वॉर्डर एकही नाही आणि कोणताही सुदृढ माणूस तिथे जाण्यास धजत नाही, अगदी डॉक्टरही तिथे जात नाही. सकाळी आठ वाजता एका होडीतून त्यांना चोविस तास पुरेल इतका शिधा पोचवला जातो, अर्थातच न शिजवलेला. दवाखान्यातील एक सेवक औषधांची पेटी दोघा परिचारकांच्या ताब्यात देतो, जे स्वत: महारोगी आहेतच तेच बेटावरच्या रुग्णांना औषधोपचार करतात. त्या बेटावर धर्मोपदेशक सुद्धा पाऊल टाकीत नाही. महारोगी स्वतःच बनवलेल्या गवताच्या झोपड्यात निवास करतात.

' एका मुख्य इमारतीमध्ये ते एकमेकांना भेटतात. सर्वजण कोंबड्या आणि बदकं पाळतात, त्यामुळे त्यांना अन्नाला पुरवठा येतो. कायद्यानुसार त्यांना त्यांच्या बेटाबाहेर काहीही विकता येत नाही, म्हणून ते सेंट–लॉरेंट, सेंट–जीन इ० बेटांवरोबर चोरटा व्यापार करतात. ते लोक भयानक खुनशी आहेत. म्हणजे अगदी सर्रास खून करीत नाहीत म्हणा, पण जेव्हा ते गुपचुप बेटाबाहेर पडतात तेव्हा खूपच दुष्कृत्ये करतात. पुन्हा परत जाऊन आपल्या बेटाचा आश्रय घेतात. त्यांच्याजवळ अशाच काही चोरलेल्या होड्या आहेत. त्यांनी जवळ होडी बाळगणं हा अक्षम्य गुन्हा आहे. पहारेकरी पिजन बेटाकडं जाणारी किंवा तिथून गुपचुप येणारी प्रत्येक होडी जाळून टाकतात. म्हणून ते चतुर महारोगी मोठमोठे दगड घालून आपल्या होड्या पाण्यात बुडवून ठेवतात. जेव्हा जरुरी असते तेव्हा पाण्यात बुडी मारुन आणि दगड बाजूला काढून होडी वर आणतात. तिथे सर्व प्रकारचे लोक आहेत, प्रत्येक रंगाचे आणि देशाचे, शिवाय फ्रान्सच्या सर्व भागातील.

' तर काय लक्षात आलं ?–ही तुमची होडी फक्त मारोनी नदी–पुरती उपयोगी आहे, शिवाय त्यात जास्त सामान ठेवता येणार नाहीच. समुद्रात शिरायचं तर दुसरी भक्कम होडी मिळवायलाच हवी आणि त्याकरता उत्तम जागा म्हणजे एकच–पिजन बेट. '

' आम्हाला तिकडे कोणत्या मार्गानं जाता येईल ? '

' सांगतो. ते बेट दिसेपर्यंत नदीतून मी तुमच्याबरोबर येईनच. तुम्हाला ते सापडणार नाही, नुसतं ऐकून तुम्ही नक्कीच भरकटाल. ते नदीच्या मुखापासून साधारण शंभर मैलांवर आहे. म्हणजे तुम्हाला वरच्या बाजूला पुन्हा जावं लागेल. सेंट–लॉरेंटपासून ते अवघ्यां तीस मैलांवर आहे. मला शक्य आहे तिथपर्यंत मी येऊन नंतर माझ्या होडीत मी बसेन. तोवर ती तुमच्या होडीला बांधून ठेवू. एकदा त्या बेटावर तुम्ही पोचलात की पुढची सर्व जबाबदारी तुमची. '

' तू का त्या बेटावर येत नाहीस ?'

' बापरे ! ' तो म्हणाला, मी एकदाच ते धाडस केलं होतं. अगदी भर दिवसा मी त्या बेटाच्या किनाऱ्यावर गेलो होतो; आणि तिथे जे पाहिलं तेवढं पुरेसं आहे. छे, पॅपिलॉन, पुन्हा आयुष्यात मी त्या बेटावर पाऊल टाकणार नाही. त्यांच्याजवळ गेल्यास कितीही प्रयत्न करून मी माझी घृणा लपवू शकणार नाही, मग बोलणं तर दूरच राहिलं. त्यातून व्यवहार करणं केवळ अशक्यच. मी तुमच्याबरोबर तिथे गेलो तर फायदा होण्यापेक्षा तुमचं काम फिसकटण्याची शक्यताच जास्त. '

' आपण केव्हा निघायचं ? '

' रात्र पडल्यावर. '

' आत्ता किती वाजलेत ब्रेटन ? '

' तीन '

' ठीक. मग मी थोडीशी झोप घेतो. '

' नको, तुम्हाला आपल्या सर्व सामानाची बांधाबांध करावी लागेल. '

' त्याची काही जरूरी नाही. मी रिकामी होडी घेऊन जाईन आणि पुन्हा जोन्ससाठी इथे परत येईन. तो इथे आमच्या वस्तूजवळ राहील. '

' अशक्य. तुला ही जागा परत सापडणं शक्यच नाही, अगदी दिवसा उजेडी सुद्धा. शिवाय तुम्ही नदीत दिसताही कामा नये. तुमच्यासाठी चाललेला शोध अजून संपलेला नाही. म्हणून भलता काही विचार करू नका. नदी असुरक्षित आहे. '

संध्याकाळ झाली. त्यानं त्याची होडी आणली आणि ती आमच्या होडीमागे आम्ही बांधली. ब्रेटनच्या अलीकडे जोन्स बसला. मग मॅच्यूरेट आणि मी पुढे बसलो. मी आणि ब्रेटन–दोघांनी वल्हवण्याचं ठरवलं. दलदलीतून हळुहळू वाट काढून नदीत पोचेपर्यंत रात्र पडण्याची वेळ झाली. क्षितिजावर सूर्य मोठ्या आकारात दिसत होता. त्याच्या लालबुंद प्रकाशामुळे दूरवर समुद्राची दिशा उजळून निघाली होती. निरनिराळे दाट रंगांचे पट्टे एकमेकात बेमालूमपणे मिसळून गेले होते. सुमारे दहा मैल गेल्यावर त्या सुंदर नदीतून समुद्रात परतणाऱ्या ओहोटीच्या लाटा–चंदेरी आणि चमकत्या गुलाबी रंगाच्या लाटा–आम्हाला स्पष्ट दिसत होत्या.

ब्रेटन म्हणाला, ' आता ओहोटीची वेळ संपत आली आहे. तासाभरात आपण वेगवान प्रवाहाला लागू. त्याचा फायदा घेऊन आपल्याला मारोनीमधून वर जाता येईल. फारसा प्रयत्न न करता प्रवाह आपल्याला पुढे नेईल, आणि आपण खूपच लवकर बेटाजवळ पोचू. ' नंतर एकाएकी अंधार खाली उतरला.

' भराभर हात मारा, ' तो म्हणाला, ' वल्ही जोरात मारा म्हणजे आपण प्रवाहाच्या मध्यभागी जाऊ. ' आम्ही जोरजोरात वल्ही मारली आणि होडी जलद मार्ग आक्रमू लागली. मी आणि ब्रेटन

होडी खरोखरच सुंदर चालवीत होतो. मॅच्युरेट त्याच्या परीने प्रयत्न करीत होता. नदीच्या मध्यावर जाऊ लागताच प्रवाहाची जबरदस्त ओढ आमच्या ध्यानात आली. आम्ही वेगात जाऊ लागलो आणि दर अर्ध्या तासाने आम्हाला वेगातील वाढता फरक प्रकर्षाने जाणवू लागला. सहा तासानंतर आम्ही बेटाच्या अगदी जवळ जाऊन पोचलो. नदीच्या मध्यापासून थोडा उजव्या बाजूला एक मोठा काळा पट्टा दिसू लागला. 'तेच ते' हळू आवाजात ब्रेटन उद्गारला. रात्र फार काळोखी नसली तरी नदीवर पसरलेल्या धुक्यामुळे आम्ही कोणाच्या दृष्टीस पडणं अगदी अशक्य होतं. आम्ही आणखी जवळ गेलो. जेव्हा समोर खडकांच्या रेषा स्पष्ट दिसू लागल्या तेव्हा ब्रेटन आपल्या होडीत जाऊन बसला आणि आमच्यापासून दूर जाता जाता पुटपुटला, 'बराय मंडळी, शुभेच्छा'

'धन्यवाद, मनःपूर्वक धन्यवाद.'

'त्याची काहीही जरूरी नाही.'

ब्रेटन दिसेनासा झाल्यावर आम्ही सरळ बेटाच्या दिशेनं जायला सुरवात केली. त्यासाठी होडी थोडी वळवावी लागली. मी तिला सावरण्याचा प्रयत्न करीत होतो, पण सगळलाच गोंधळ होऊन होडी प्रवाहाच्या वेगामुळे पाण्यावर तरंगणाऱ्या वनस्पतींमध्ये जाऊन घुसली. माझा प्रयत्न व्यर्थ गेला. वनस्पती ऐवजी होडी जर दगडावर आदळली असती तर तिचा पार चक्काचूरच झाला असता, इतका प्रवाहाचा अफाट वेग होता. तसं झालं असतं तर आमचा सर्व साठाच नष्ट झाला असता. मॅच्युरेटने खाली पाण्यात उडी मारली आणि होडीला हात लावला. झुडुपांमधून आम्ही हळूहळू सरकू लागलो. तो जीव खाऊन जोर देत होता. मग आम्ही थांबलो, एका फांदीला होडी बांधून ठेवली. आम्ही तिघांनी थोडी थोडी रम् घेतली. मी एकटाच किनाऱ्यावर चढलो. दोन्ही मित्र होडीतच राहिले.

मी वाटेतल्या फांद्या तोडीत, दूर करीत चालू लागलो. दूरवर अंधुक प्रकाश दिसू लागला. बाकी सर्वत्र अंधारच होता आणि एकदम मला तीन झोपड्या दिसल्या. काही आवाजही कानावर पडले. मी पुढे गेलो. मी तिथे हजर झालो आहे हे त्यांना कसं कळावं याचाच विचार पडला होता. आपण स्वतःच सापडावं झालं! मी सिगारेट पेटवली. काडी ओढल्याबरोबर एक लहान कुत्रं धावलं आणि उडी मारून माझ्या पायाला चावा घेण्याचा प्रयत्न करू लागलं. 'ओ गॉड, मला वाटतं त्याला तरी महारोग झाला नसावा.' मी विचार केला, 'मूर्खासारखी कल्पना करू नकोस. कुत्र्यांना का कधी महारोग होतो.'

'तिकडे कोण आहे तो? मार्सेल, तूच ना?

'मी बाहेरून पळून आलो आहे.'

'तुझं इथे काय काम आहे? काहीतरी पळवायचा विचार आहे का? तुला काय वाटलं आमच्या इथे काही मिळण्याची शक्यता आहे?'

'नाही, मला फक्त मदत पहिजे.'

'पळून जाण्यात का पैशाची?'

'तू आपलं थोबाड बंद कर पाहू, ला चाऊएट' चार सावल्या झोपडीतून बाहेर पडल्या. 'हळूहळू पुढे ये, बंधो. मी पैज लावून सांगतो की तू बंदूक घेऊन पळालेली व्यक्तीच आहेस. आता जर ती तुझ्याजवळ असेल तर आपली बाजूला ठेव: इथे तुला भिण्याचं काही एक कारण नाही.'

'होय, मी तोच आहे. पण माझ्याजवळ बंदूक मात्र नाही.' मी पुढे चालू लागलो. त्यांच्याजवळ गेलो; अंधारामुळे त्यांच्यापैकी एकाचाही चेहरा मात्र मला दिसला नाही. मी मूर्खासारखा हात पुढे केला. कोणीही हस्तांदोलन केलं नाही. खूप उशिरा माझ्या लक्षात आलं की, त्या ठिकाणी तसली प्रथा पाळणं चुकीचं होतं—त्यांना मला संसर्ग होऊ द्यायचा नव्हता.

'आपण झोपडीत जाऊ या.' ला चाऊएट म्हणाला. टेबलावर ठेवलेल्या तेलाच्या दिव्यामुळे खोलीत मंद प्रकाश पडला होता. 'बैस.'

मी एका पाठ नसलेल्या वेताच्या खुर्चीवर बसलो. ला चाऊएटनं आणखी तीन दिवे पेटवले आणि एक अगदी माझ्यासमोर टेबलावर ठेवला. त्याच्या धुराला खोबरेल तेलाचा विचित्र वास येत होता. अजूनही मला त्यांचे चेहरे दिसले नव्हते, माझा चेहरा मात्र त्यांना प्रकाशात स्पष्ट दिसत होता आणि त्यांना तेच हवं होतं. ला चाऊएटला गप्प करणारा आवाज म्हणाला, 'ला अँजुली, तिकडे इमारतीत जा आणि त्यांना विचारून ये की याला तिथे आणू का. उत्तर घेऊन ताबडतोब परत ये. विशेष करून ताऊझंट हो म्हणाला तर. मित्रा, आम्ही तुला इथे प्यायला काहीच देऊ शकत नाही, फक्त काही नासकी अंडी आहेत.' त्यानं अंड्यांनी भरलेली एक टोपली माझ्याकडे ढकलली.

'नको, थँक्स्.'

माझ्या उजव्या बाजूला अगदी जवळच त्यांच्यापैकी एकजण खाली बसला होता आणि त्यावेळी मला त्या पहिल्या महारोग्याचा चेहरा दिसला. तो अत्यंत हिडिस दिसत होता, पण मला त्याच्याविषयी काय वाटलं हे न दाखवण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. त्याचं नाक, मांस आणि हाडं हे संपूर्णपणे झडून गेलं होतं. चेहऱ्याच्या मध्यभागी एक भोक होतं. मला एकच भोक म्हणायचं होतं, दोन नाही. फक्त एकच लहानसर गोल भोक. उजव्या बाजूला त्याचा खालचा ओठही नष्ट झाला होता. सुरकुतलेल्या हिरड्यांमधून तीन लांब पिवळे दात बाहेर डोकावत होते. वरच्या जबड्याच्या उघड्या हाडामध्ये घुसलेले ते स्पष्ट दिसत होते. कान फक्त एकच शिल्लक होता. बँडेज बांधलेला उजवा हात त्यानं टेबलावर ठेवला होता. दुसऱ्या हाताच्या शिल्लक राहिलेल्या दोन बोटांमध्ये त्यानं लांब आणि लठ्ठ सिगार पकडला होता. तो त्यानं स्वतःच पानांपासून बनवलेला असणार. कारण तो हिरवटसर दिसत होता. डाव्या डोळ्यावर फक्त पापणी दिसत होती, उजव्यावर नव्हतीच. डोळ्यापासून पार वर करड्या दाट केसांपर्यंत एक मोठी जखमेची खूण दिसत होती. तो घोगऱ्या आवाजात म्हणाला, 'आम्ही तुला मदत करू, मित्रा. माझं आत्ता जे झालं आहे तसं तुझं होऊ नये. गियानात जास्त राहू नकोस. मला ते योग्य वाटत नाही.'

'आभार.'

'मला जीन सॅन्स पियर म्हणतात. मी पॅरिसचा आहे. खरं तर मी पूर्वी बरा दिसत होतो, तुझ्याहून सुदृढ आणि सशक्त होतो—जेव्हा मी जन्मठेपेसाठी इथे आलो होतो. दहा वर्षे झाली आणि आता माझ्याकडे पहातोच आहेस.'

'ते तुमच्यावर काही उपचार करीत नाहीत?'



**' जे माझं झालं ते तुझं होऊ नये, मित्रा ! तू गियानात जास्त दिवस राहू नकोस ' पियर म्हणाला.**

' करतात ना. मी चाऊल मूग्रा तेलाची इंजेक्शन्स घेऊ लागल्यापासून खूपच बरा आहे, हे बघ. ' त्यानं डोकं वळवलं आणि डावी बाजू मला दाखवली. ' इथे आता सुकू लागलं आहे. '

मला त्याची अतिशय कीव आली आणि माझी सहानुभूती त्याला कळावी म्हणून डावा हात त्याच्या गालावर ठेवण्यासाठी मी वर उचलला. तो एकदम मागे सरकून म्हणाला, ' मला स्पर्श करण्याची तुझी भावना समजली, पण या रोगानं पछाडलेल्या कोणाही माणसाला तू कदापी स्पर्श करू नकोस आणि त्याच्या भांड्यातून काहीही खाऊ-पिऊ नकोस. '

—आणि हा तर पहिला महारोगी होता, ज्याचा चेहरा मला दिसू शकला होता; ज्याच्यात माझं त्याच्याकडं बघणं सहन करायचं मनोधैर्य होतं.

दारात एका बुटक्या माणसाची सावली पडली, ' ताऊझंट आणि इतरांनी त्याला तिकडेच घेऊन यायला सांगितलं आहे. त्याला घेऊन या. ' ती व्यक्ती म्हणाली.

जीन पियर उठला आणि म्हणाला, ' माझ्या मागोमाग ये. ' आम्ही सर्वजण अंधारात बाहेर पडलो. चार–पाचजण पुढे, मी आणि जीन मधे, उरलेले मागे. तीन मिनिटातच आम्ही चौरसाकृती उघड्या पण विस्तृत जागेत जाऊन पोचलो. तिथे दिव्याचा थोडाबहुत प्रकाश होता. हा बेटावरचा सर्वात उंच भाग होता. मध्यभागी एक घर होतं. त्याच्या दोन खिडक्यांमधून प्रकाश बाहेर पडला होता. दारासमोर अंदाजे वीस लोक आमची वाट पहात बसले होते. त्यांच्याजवळ आम्ही गेलो. आम्ही तिथे पोचताच त्या लोकांनी बाजूला होऊन वाट करून दिली. ती खोली साधारण तीस फूट लांब होती आणि बारा फूट रुंद होती. चार मोठ्या पण सारख्या दगडांनी बनवलेल्या एक प्रकारच्या भट्टीमध्ये उष्णतेसाठी लाकडं जळत होती. दोन धगधगत्या ज्योतींच्या दिव्यामुळे खोलीत बराच प्रकाश पडला होता. एका स्टुलावर एक गोऱ्या चेहऱ्याचा माणूस बसला होता. त्याच्या वयाचा अंदाज लागत नव्हता. त्याच्यामागे बाकावर पाच–सहा लोक बसले होते. तो काळ्या डोळ्यांचा मनुष्य मला म्हणाला, ' माझं नाव ताऊझंट. मी कॉर्सिकन आहे. तू पॅपिलॉनच असणार. '

' होय. '

' इथे बातम्या वेगाने पसरतात; तू जितक्या वेगाने जाशील तितक्या त्वरित. पण तू बंदूक कुठे ठेवली आहेस ?'

' आम्ही ती पाण्यात फेकली. '

' कुठे ?'

' हॉस्पिटलच्या भिंतीसमोर, आम्ही जिथे उडी मारली तिथेच. '

' मग ती परत सापडू शकेल का ?'

' मला वाटतं, सापडेल; तिथे पाणी फार खोल नाही. '

' तुला ते कसं काय समजलं ?'

' एका जखमी मित्राला आमच्या होडीत उचलून घेण्यासाठी आम्ही पाण्यात उतरलो होतो. '

' त्याला काय झालं आहे ?'

' पाय मोडलाय्. '

' मग त्यासाठी तुम्ही काय केलंत ?'

' त्याच्या पायाभोवती लाकडाचा छोटासा पिंजरा बांधून ठेवला आहे. '

' पाय बराच दुखावलाय का ?'

' हो. '

' आत्ता तो कुठे आहे ?'

' होडीमध्ये. '

' तू म्हणालास की तुम्हाला मदत हवीय्. तुमची काय अपेक्षा आहे ?'

' एक चांगली होडी. '

' आम्ही तुला एक होडी द्यावी असं तुझं म्हणणं आहे ?'

' हो. त्यासाठी माझी पैसे देण्याची तयारी आहे. '

' मग ठीक आहे. मी माझी होडी तुला विकत देईन. ती खरंच सुंदर होडी आहे. अगदी नवीनच–गेल्या आठवड्यातच मी ती ' अल्बानिया 'मधून चोरून आणली. खरं म्हणजे ती छोटीशी बोटच आहे. कोळी वापरतात ना तशी नौका. त्यात फक्त एकाच गोष्टीची उणीव आहे आणि ती म्हणजे बोटीच्या खालचा कणा. तो मात्र तिला नाही. पण आम्ही तो तुझ्यासाठी दोन तासात तयार करून देऊ. बाकी त्यात सर्व काही आहे–सुकाणू, त्याचा दांडा, तेरा फुटी लाकूड–लोखंडाची डोलकाठी आणि एक नव कोरं कॅनव्हॉसचं शीड. पण तू मला त्याबद्दल किती पैसे देशील. '

' तूच किंमत सांग. त्या वस्तूंच्या इथे किती किंमती आहेत याची मला कल्पना नाही. '

' तीन हजार फ्रँक्स्; बघ तुला शक्य आहे का नाही. जर नसेल तर उद्या रात्री ती बंदूक पैदा करून ये; आपण ती बंदूक आणि माझी बोट यांची देवाण–घेवाण करू. '

'नको, त्यापेक्षा मी पैसेच देईन.'

'मग उत्तमच. हा सौदा पक्का. ला प्यूस, आपण आता जरा कॉफी घेऊ या.'

ला प्यूसनं विस्तवावर उकळत असलेली कॉफी जवळच असलेल्या निरनिराळ्या भांड्यांमध्ये ओतली. ताऊझंटनं मागच्या सर्वांना एकेक भांडं दिलं. आणि शेवटी मला एक स्वच्छ चकचकीत भांडं दिलं. तो म्हणाला, 'ही कॉफी प्यायला अजिबात भिऊ नकोस. ते फक्त पाहुण्यांसाठीच राखून ठेवलेलं भांडं आहे. कोणीही आजारी मनुष्य ते वापरत नाही.'

मी कॉफी पिऊ लागलो. मध्ये ते भांडं माझ्या गुडघ्यावर ठेवून दिलं. माझ्या एकदम लक्षात आलं की त्या भांड्याला एक बोट चिकटलेलं आहे. तो काय प्रकार आहे याचा मी विचार करण्यापूर्वीच ला प्यूस म्हणाला, 'च्यायला, माझं दुसरं बोट गळून पडलं. ते सालं आता कुठे पडलं असेल कोण जाणे.'

'हे पहा इथे आहे?' मी ते भांडं दाखवून त्याला म्हणालो. त्यानं आपलं बोट उचललं आणि विस्तवात फेकून दिलं. नंतर भांडं परत माझ्या हातात दिलं.'

'तुला कॉफी घ्यायला हरकत नाही,' तो म्हणाला, 'कारण मला फक्त कोरडा रोग आहे. माझा एक एक अवयव गळून पडतोय, पण मी सडलेलो नाही– तुला लागण होणार नाही.'

मला मांस जळाल्याचा वास आला. ते त्याचं बोटच असणार.

ताऊझंट म्हणाला, 'तुम्हाला संध्याकाळच्या ओहोटीपर्यंतचा संपूर्ण दिवस इथे काढावा लागेल. तू आता जाऊन तुझ्या मित्रांना भेट आणि त्यांना झोपडीत घेऊन ये, जखमी मित्राला जरा आराम करू दे. होडीतील सर्व सामान काढून घे म्हणजे ती पाण्यात बुडवून टाकता येईल. इथे तुला कोणाचीच मदत होणार नाही– का ते तुला अर्थातच माहित आहेच.'

मी तावडतोब मित्राकडे गेलो. त्यांना थोडक्यात सर्व वृत्तांत सांगितला. दोघांनी जोन्सला उचललं आणि झोपडीत परत आलो. एक तासात होडीबाहेर सर्व काही काढून जमिनीवर काळजीपूर्वक रचून ठेवलं. ला प्यूसनं आमची होडी भेट म्हणून मागितली. मी ती त्याला देऊन टाकली. त्याबरोबर वल्हही दिलं. तो खुष झाला आणि त्याला माहीत असलेल्या एका ठिकाणी ती बुडवून टाकण्यासाठी घेऊन गेला. रात्र लगेच संपलीच. आम्ही तिघंही झोपडीत पडून राहिलो होतो. ताऊझंटनं पाठविलेल्या नवीन पांघरूणाची उब छान होती. जाड कागदांच्या आवरणातून ती आमच्याकडे आली. होडीच्या व्यवहाराविषयी मी जोन्स आणि मॅच्युरेटला सांगितले. नंतर काहीही विचार न करता जोन्स क्लाऊझियर एकदम म्हणाला, 'म्हणजे ही सुटका साडेसहा हजारात पडली पॅपिलॉन, मी तुला त्यातली निम्मी रक्कम देईन– मला माझ्याजवळचे तीन हजार फ्रॅंक्स् म्हणायचं आहे.'

'आपल्याला बॅंकेतल्या कारकुनासारखी आकडेमोड करत बसायचं नाही. जोपर्यंत माझ्याजवळ पैसे आहेत तोपर्यंत मी खर्च करीन. त्यानंतर– पुढे काय ते बघू!'

तोपर्यंत एकही महारोगी आमच्या झोपडीत आला नाही. दिवस चांगलाच वर आला. आणि ताऊझंट तिथे हजर झाला, 'नमस्कार. आता तुम्ही मुळीच काळजी न करता बाहेर जाऊ शकता. इथे या बेटावर अचानक तुमच्यामागे कोणी येणार नाही. एक मनुष्य एका नारळाच्या झाडावरून कायम टेहळणी करत आहे. अजून तरी पहारेकऱ्यांच्या बोटी दिसत नाहीत. जोवर तिथे पांढरं कापड दिसत राहील तोपर्यंत काहीही धोका नाही असं समज. त्याला काही दिसलं तर लगेच खाली उतरून तो तुम्हाला सांगेल.'

मी म्हणालो, 'ताऊझंट, बोटीच्या कण्याचं काय?'

'आपण दोन लाकडाच्या ओंडक्यापासून तो लगेच तयार करू शकू. रात्रीचा फायदा घेऊन बोट पाण्यावर काढता येईल. चल आणि पाहा.' आम्ही गेलो. ती सोळा फुटी सुरेख नौका होती, अगदी नवीन; दोन्ही कडेला बसण्याची उत्तम सोय. त्यातल्या एका बाजूला डोलकाठीसाठी भोक होतं. ती इतकी जड होती की मला आणि मॅच्युरेटला ती पालथी करण्याचा एक मोठा उद्योगच झाला. शीड आणि डोलकाठी या वस्तूही नवीनच होत्या. आतल्या बाजूला कड्या होत्या. आम्ही कामाला लागलो. दुपारपर्यंत नौकेच्या तळाशी भक्कम लाकडी कणा ठोकण्यात आला.

गोल करून उभे राहिलेले सर्व महारोगी आमचं हे काम गुपचूप पहात होते. कामाचे बाबतीत ताऊझंट योग्य त्या सूचना देत होता. त्याचा चेहेरा ठीक होता, काहीही नष्ट झालेलं नव्हतं. पण तो जेव्हा बोलायचा तेव्हा लक्षात येई की त्याच्या चेहेऱ्याचा फक्त डावा भागच हालचाल करीत होता. त्यानं मला त्याचं कारण सांगितलं. त्यालाही कोरडाच रोग होता. छाती व उजवा दंड हे अवयव सुद्धा अर्धांगाने लुळे पडले होते. उजवा पाय त्याच मार्गावर होता. त्याचा उजवा डोळा असा काही दिसत होता की जणू काचेचाच आहे. त्यानं दिसत असे पण त्याची हालचाल होत नव्हती. मी बाकी कोणाही महारोग्यांची नावं सांगणार नाही. त्यांना ओळखणाऱ्या किंवा त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींना ते किती भयानक प्रकारे सडत होते याची कल्पना नसेल.

काम चालू असताना मी ताऊझंटबरोबर बोलत होतो. बाकी कोणीही एक शब्दसुद्धा काढला नाही. मध्येच ताऊझंट एकाला उद्देशून म्हणाला, 'अरे तू अनेक वेळा पळून गेला आहेस, तर पॅपिलॉनला सांग की काय करायला हवं ते. कारण या तिघांचा हा पहिलाच अनुभव आहे.'

### आणि महारोगी सांगू लागला.

त्या महारोग्यानं एकदम सांगायलाच सुरुवात केली, 'आता लवकरच ओहोटीला सुरुवात होईल. तीन वाजता पाण्याचा प्रवाह फिरेल. रात्र पडायला लागली की– म्हणजे साधारण सहाच्या सुमारास– तुमच्या प्रवासाला पाण्याच्या ओढीमुळे विलक्षण गती

## जिव्हाळा वाटत होता. आम्ही पळून जाण्यात यशस्वी व्हावं हीच त्यांची इच्छा होती....

येईल. तीन तासांच्या आत नदीच्या मुखापासून साठ मैल तुम्ही सहज जाल. अंदाजे नऊच्या सुमारास तुम्हाला थांबावं लागेल. पुराच्या पुढील सहा तासात तुम्हाला तुमची नौका एखाद्या झाडाच्या फांदीला घट्ट बांधून ठेवावी लागेल. तोपर्यंत पहाटेचे तीन वाजतील. तरीही तुम्ही लगेच निघू नका, कारण ओहोटीला त्यावेळी म्हणावा तितका वेग नसतो. साधारण साडेचारच्या सुमारास पुन्हा सुरुवात करा. सकाळी ६ वाजता, जेव्हा सूर्य उगवलेला असेल, तुम्ही समुद्रात प्रवेश केलेला असायला हवा. मग तुम्ही पहारेकऱ्यांच्या दृष्टीला पडलात तरी हरकत नाही, तोपर्यंत नदीच्या मुखाशी पाण्याचा प्रचंड जोर असेल; त्यातून ते पुढे येऊ शकणार नाहीत. तुम्ही धोक्याची रेषा केव्हाच ओलांडली असेल. पण तुमच्यामध्ये कमीत कमी अर्ध्या मैलाचं अंतर पाहिजे, कारण हा जीवन मरणाचा प्रश्न आहे. इथे फक्त एकच शीड आहे. तुमच्या होडीवर काय होतं ?'

'एक शीड आणि डोलकाठी.'

'ही जरा जड नौका आहे. त्याच्यावर दोन शिडांची जरुरी आहे. वेळी–अवेळी उपयोगी पडेल. तुम्ही जय्यद तयारीनिशीच नदीत शिरा. त्या मुखापाशी समुद्र नेहमीच खवळलेला असतो, त्यातून तुम्हाला पार व्हायचं आहे. वारा आणि समुद्र जर तुम्हाला आपोआप ओढून नेत असेल तर काहीही हरकत नाही; शीड वाऱ्यानं पूर्ण भरू दे, जशी जाईल तशी नौका जाऊ दे. एकदा तुम्ही निळ्या पाण्यात शिरलात की योग्य दिशेला ती वळवण्यास भरपूर अवधी असेल. तुमचा मार्ग तुम्हाला ठाऊक आहे ना ?'

'नाही. मला फक्त इतकंच माहीत आहे की व्हेनेझुएला आणि कोलंबिया वायव्येकडे आहे.'

'बरोबर; पुन्हा मागे किनाऱ्याला न लागण्याची दक्षता घ्या. नदीच्या पलीकडे असलेल्या डच गियानातील लोक पळून जाणाऱ्यांना परत ताब्यात देतात; अलीकडच्या ब्रिटिश गियानात तीच परिस्थिती आहे. त्रिनिदादमध्ये तसं होत नाही, पण पंधरा दिवसांच्या वर तिथं मुक्काम करू देत नाहीत. व्हेनेझुएलाची तऱ्हा वेगळीच आहे. तुम्हाला एक-दोन वर्षे रस्त्याच्या कामाला लावून पुन्हा ते फ्रान्सच्या ताब्यात देतात.'

मी त्याचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होतो. तो अनेक वेळा यशस्वीरीत्या पळाला होता, पण महारोगी असल्यामुळे सगळीकडून त्याला लगेच हाकलून देत. ब्रिटिश गियानातील जॉर्जटाऊनच्या पुढे मात्र तो जाऊ शकला नव्हता. त्याचा रोग फक्त पायातच कळत होता. सर्व बोटं नष्ट झाली होती, त्यामुळे तो अनवाणीच राहात असे. त्यानं मला दिलेली सर्व माहिती ताऊझंटनं माझ्याकडून पुन्हा ऐकून घेतली. मी ती बिनचूक सांगितली. यावेळी जीन पियरनं विचारलं, 'यांना समुद्रात किती दिवस राहावं लागेल ?'

मी आधी उत्तरलो, 'मी उत्तर-ईशान्येला तीन दिवस जाईन. नंतर वाऱ्याच्या दिशेचा अंदाज घेऊन उत्तर दिशा समजेल. चौथ्या दिवशी वायव्येकडे वळल्यावर आम्ही खऱ्या पश्चिमेला जाऊ.'

'अगदी बरोबर,' तो महारोगी म्हणाला, 'गेल्या खेपेस सुरुवातीला मी दोनच दिवस जाऊन वळल्यामुळे ब्रिटिश गियानाला लागलो. तीन दिवस नौका मारल्यावर तुम्ही त्रिनिदाद किंवा बार्बाडॉस मागे टाकाल. व्हेनेझुएलाच्या जवळून जाऊन क्युरॅकाओ किंवा कोलंबियाच्या किनाऱ्याला तुम्हाला लागता येईल.'

जीन पियर म्हणाला, 'ताऊझंट, तू तुझी होडी केवढ्याला विकणार आहेस ?'

'तीन हजार. का ? ते जरा जास्त वाटतात ?'

'नाही, त्यासाठी नाही मी विचारलं. केवळ उत्सुकता म्हणूनच विचारलं. पॅपिलॉन, तुझी तेवढी ऐपत आहे ना ?'

'होय.'

'पण नंतर तुझ्याजवळ काही शिल्लक राहतील ना ?'

'नाही. आमच्याजवळ फक्त तेवढेच पैसे शिल्लक आहेत–तेही माझ्या मित्राजवळ.

'ताऊझंट,' जीन पियर म्हणाला, 'मी तुला माझं पिस्तूल देतो. त्याचे तू मला किती पैसे देशील ? माझी या लोकांना मदत करायची इच्छा आहे.'

'एक हजार फ्रॅंक्स्.' ताऊझंट म्हणाला. 'माझीही मदत करायची तयारी आहेच.'

'या सर्व गोष्टीबद्दल मनःपूर्वक आभार.' मॅच्युरेट जीन पियरकडे पाहात म्हणाला.

'धन्यवाद.' जोन्स उद्गारला.

आता मला खोटं बोलल्याची लाज वाटू लागली. मी म्हणालो, 'छे छे; मी ते घेऊ शकणार नाही. तुम्ही आम्हाला काहीही द्यायचं कारणच नाही.'

माझ्याकडे पाहून तो म्हणाला, 'आहे, कारण आहे. तीन हजार ही थोडी-थोडकी रक्कम नाही; तरीही ताऊझंटनं मुळात दोन हजार फ्रॅंक्स् कमी किंमत सांगितली आहे. ती नौका आहेच त्या लायकीची. पण आम्ही तुमच्यासाठी काहीच करू नये असंही नाही.'

आणि नंतर अगदी हृदय हेलावून टाकणारी घटना घडली. ला चाऊएट जमिनीवर हॅट उलटी टाकून बसला आणि सर्व महारोगी त्यात नोटा किंवा नाणी टाकून जाऊ लागले. सगळीकडून ते आले. प्रत्येकानं काही ना काही पैसे दिलेच. मी अगदी शरमून गेलो. पण आता हे सांगणं तर कठीण होऊन बसलं होतं की आमच्याजवळ आणखी पैसे आहेत : परमेश्वरा, आता मी काय करू ? इथे आम्हाला मनाचा मोठेपणा अनुभवण्यास मिळाला आणि मी अगदी नालायकासारखं वागलो होतो. मी म्हणालो, 'कृपा करा, पण इतकं सारं करण्याची खरंच जरूरी नाही.' एक काळाकुट्ट निग्रो–ज्याची बोटं आणि इतर काही अवयव झडून गेले होते–म्हणाला, 'आम्हाला इथे चरितार्थासाठी पैसे वापरावे लागत नाहीत. तुम्ही ते घ्यायला अजिबात संकोच करू नका. आम्ही ते जुगारासाठी तरी वापरतो

किंवा आमच्या या बेटावर अल्बायनाहून वरचेवर येणाऱ्या महारोगी स्त्रियांवर तरी उधळतो.' त्याच्या या वक्तव्यामुळे मला जरा धीर आला आणि माझ्याजवळ आणखी पैसे आहेत हे सांगण्याची वेळ झाली नाही.

त्या दिवशी महारोग्यांनी दोनशे अंडी उकडली. एका लाकडी पेटीतून ती त्यांनी आणली. पेटीवर रेडक्रॉसची खूण होती. सकाळी त्यात रोजची औषधे आली होती. शिवाय त्यांनी दोन जिवंत कासवं पकडून आणली होती; प्रत्येकाचं वजन निदान पन्नास पौंड तरी असेल. त्यांना काळजीपूर्वक पाठीवर टाकण्यात आलं. त्याशिवाय तंबाखूची पानं, काड्यापेट्या, एक तांदळाचं शंभर पौंडी पोतं, दोन कोळशाच्या पिशव्या, पॅराफिनच्या बाटल्या आणि स्टोव्ह इत्यादी सामुग्रीही गोळा केली. त्या सर्व अत्यंत दुःखी आणि दुर्दैवी लोकांना आमच्याबद्दल जिव्हाळा वाटत होता; आम्ही यशस्वी व्हावं हीच त्यांची इच्छा होती. कोणालाही असंच वाटलं असतं की ही आमच्या नाही तर त्यांच्याच सुटकेची तयारी चालू होती.

जिथे आम्ही उतरलो होतो तिथपर्यंत आम्ही नौका ओढीत नेली. त्यांनी हॅटमध्ये जमा झालेली रक्कम मोजली : आठशे दहा फ्रँक्स्. मला ताऊझंटला आता फक्त बाराशेच द्यावे लागणार होते. जोन्सनं त्याची चार्जर माझ्याजवळ दिली. मी ती सर्वांच्या समोर उघडली. त्यात एक हजाराची एक आणि पाचशेच्या चार नोटा होत्या. मी ताऊझंटला त्यातले पंधराशे दिले. त्यानं मला सुटे तीनशे परत केले आणि नंतर म्हणाला, 'हे बघ, हे पिस्तूल भेट म्हणून घे. तुम्ही तुमचं सर्वस्व पणाला लावलेलं आहे. ते आता शेवटच्या क्षणी शस्त्रा-अभावी वाया जाता कामा नये. ते वापरायची वेळ तुमच्यावर येणार नाही अशी आशा मी व्यक्त करतो.'

त्यांचे सर्वांचे आभार कसे मानावेत हेच मला समजेना. प्रथम ताऊझंटचे आणि नंतर सर्वांचे. त्यांच्या प्रेमामुळे आम्ही अगदी गुदमरून गेलो होतो. वैद्यकीय मदतनिसानं एक डबा नौकेत ठेवला त्यात कापूस, अस्पिरिन, अल्कोहोल, बँडेज, आयोडिन, कात्री आणि चिकटपट्टी होती. या नव्या भेटीमुळे आम्हाला जोन्सच्या पायाचा पिंजरा काढून व्यवस्थित बँडेज बांधता आलं. इतरही सर्व वस्तू नौकेवर चढवल्या.

संध्याकाळी पाच वाजता पाऊस पडू लागला. जीन पियर म्हणाला, 'तुम्ही नशिबवान आहात. तुम्ही दिसण्याची शक्यताच आता नाही, त्यामुळे तुम्ही आता सरळ निघू शकता. तुम्हाला अर्ध्या तासाचा फायदा निश्चित मिळेल. तुम्हाला निर्विघ्नपणे नदीच्या मुखाजवळ पोचता येईल.'

मला वेळेचा अंदाज कसा येईल ?'

'भरती-ओहोटीच्या लाटाच तुम्हाला वेळ सांगतील.'

आम्ही नौका पाण्यात लोटली. ती आधीच्या होडीसारखी अजिबात नव्हती. आम्ही तिघं आणि सर्व चीजवस्तू त्यात असूनही तिच्या काठाखाली साधारण अठरा इंच पाणी पोचत होतं. शीड गुंडाळूनच ठेवलं होतं कारण जवळजवळ नदीबाहेर पडेपर्यंत ते उभारण्याची जरूरी नव्हती. मी सुकाणू ताब्यात घेतलं, माझ्या बैठकीची व्यवस्था केली. मध्यभागी ब्लँकेटचा वापर करून जोन्स-साठी आरामशीर जागा तयार केली होती. तो माझ्या पायाजवळ आडवा पडला. त्याच्या पलीकडे पाण्याचं पीप होतं. मॅच्युरेटही मध्येच पण थोडा पलीकडे बसला होता. मला एकदम सुरक्षिततेची आणि निर्विघ्न प्रवासाची खात्रीच वाटू लागली, जी आधीच्या होडीत कधीच जाणवली नव्हती.

पाऊस अजूनही पडत होता. मला नदीच्या मधोमध थोडं डावी-कडे जायचं होतं, म्हणजे डच गियानाच्या बाजूला. जीन पियर म्हणाला, 'गुडबाय, आता लवकर निघणं बरं.'

'शुभेच्छा.' ताऊझंट म्हणाला आणि आपल्या पायानं नौकेला त्यानं जोरदार धक्का दिला.

'धन्यवाद, ताऊझंट. धन्यवाद, जीन, सर्वांना शतशः धन्यवाद !' असं म्हणत मोठ्या वेगाने आम्ही दिसेनासे झालो. दोन-अडीच तासापूर्वीच सुरू झालेल्या ओहोटीच्या ओढीमुळे आमची नौका प्रचंड अशा वेगाने निघाली.

पाऊस तर सारखा चालूच होता. आमच्या पुढील दहा यार्डा-वरचं देखील दिसत नव्हतं. जवळपास दोन बेटं होती, त्यामुळे मॅच्युरेट कडेला वाकून कुठे खडक दिसताहेत का ते पाहात होता. नौका खडकावर आदळली तर नसती पंचाईत व्हायची. रात्र पडली. आमच्याबरोबर वाहात येणाऱ्या एका झाडातच आमची नौका अडकली, पण सुदैवाने लवकरच त्यातून ती आम्ही सोडवली. प्रवासाचा वेग ताशी वीस मैल असावा. आम्ही धूम्रपान केलं, थोडी रम घेतली. महारोग्यांविषयी आमच्यात खूप बोलणं झालं. त्यांचा चांगुलपणा, औदार्य, सरळ स्वभाव. आमची ब्रेटनची गाठ पडली हा केवळ योगायोगच म्हणायचा; त्यानंच आम्हाला पिजन बेट दाखवलं.

पाऊस वाढू लागला आणि मी पार भिजून गेलो. परंतु आमची लोकरीची जाकिटं इतकी अप्रतिम होती की ती भिजूनही आम्हाला ऊब मिळतच होती. आम्ही गारठून अजिबात गेलो नाही. फक्त माझा सुकाणूवरचा हात–तो मात्र पावसामुळे लाकडासारखा ताठ झाला होता.

'आपण आता तासाला वीस मैलांच्या वर जात आहोत,' मॅचुरेट म्हणाला, 'आपण किती अंतर काटलं असावं ?'

'मी सांगतो,' जोन्स म्हणाला, 'थोडं थांब, आपण निघून सव्वा तीन तास झालेत.'

'तू काय वेडाबिडा आहेस काय, गृहस्था ? तुला नक्की वेळ कशी कळली ?

'आपण निघाल्यापासून मी केवळ मोजतोय. प्रत्येक तीनशे सेकंदानंतर मी एक कार्डबोर्डचा तुकडा मोडून बाजूला टाकतो आहे. आतापर्यंत एकोणचाळीस तुकडे जमले आहेत. पाच मिनिटाला एक, म्हणजेच सव्वा तीन तास नाही का होत ? मी जर चुकत नसेन तर येत्या पंधरा-वीस मिनिटात आपण पुढे न जाता निघालो तिकडेच जाऊ असं मला वाटतं.'

मी सुकाणूचा दांडा माझ्या उजव्या बाजूला ढकलला. मला प्रवाहातून डच किनाऱ्याच्या बाजूला वळायचं होतं. किनाऱ्यावर पोचण्यापूर्वीच नौकेची गती थांबली होती. आम्ही खालीही जात नव्हतो की वरही सरकत नव्हतो. पाऊस थांबण्याचंही लक्षण दिसत नव्हतं. आम्ही धूम्रपान बंद केलं. अगदी बोलणं सुद्धा बंद केलं– फक्त हळू आवाजात कुजबुजलो, 'वल्हं घे आणि मार.' मी सुद्धा



वल्हं मारतच होतो. सुकाणू माझ्या उजव्या पायानं घट्ट धरून ठेवलं होतं. सावकाशपणे आम्ही एका झुडुपापाशी आलो. आम्ही त्याच्या फांद्या पकडून ओढल्या, आणि त्याखाली आसरा घेतला. त्या वनस्पतीखाली आम्ही अंधारात थांबण्याचा निर्णय घेतला. नदी करड्या रंगाची दिसत होती, त्यावर दाट धुकं पसरलं होतं. भरती-ओहोटीच्या लाटांवर अवलंबून राहाण्याखेरीज गत्यंतरच नव्हतं, कारण त्याशिवाय समुद्र कुणीकडे आहे आणि जमिनीकडे जाणारी नदी कोणती आहे हे सांगता येणंच अशक्य होतं.

[ क्रमशः ]

---

भर समुद्रात ते जहाज हळुहळू आमच्याजवळ आलं. त्याचा कॅप्टन आम्हाला म्हणाला, 'तुम्ही कोणीकडून येत आहात?'

'फ्रेंच गियाना.'

'इतक्या दूरवर तुम्ही काय करीत आहात ?'

'वारा नेईल त्या दिशेला आम्ही जात आहोत.'

'आमच्याबरोबर चला. तुमची होडी आम्ही डेकवर ठेवू.'

'धन्यवाद; पण आम्ही आमच्या नौकेतच अगदी सुखी आहोत.'

## पॅपिलॉनचा चित्तथरारक समुद्रप्रवास : माणूस पुढील अंकी

'रूपवेध'चा नवा प्रयोग

# उध्वस्त धर्मशाळा

वि. भा. देशपांडे

एक साम्यवादी विचारसरणीचा प्राध्यापक, विद्यापीठात रसायनशास्त्र विभागाचा प्रमुख, संत कवितेपासून दास कॅपिटलचे वाचन केलेला. त्या संस्कारात व्यक्तित्व घडवलेला. अतिशय प्रामाणिकपणाने एक राजकीय विचारधारा मांडीत आलेला. लेख-नाटके-भाषणे यांच्या द्वारा आपले विचार प्रकट करणारा, त्यासाठी आयुष्याचे मोल देणाऱ्या श्रीधर विष्णु कुलकर्णी नामक प्राध्यापकाची विद्यापीठ स्तरावर चौकशी चालू आहे. ती चौकशी हाच नाटकाचा वर्शनी विषय.

या प्राध्यापकाची स्वतःची अशी एक भूमिका आहे, विचार प्रणाली आहे. 'बंड हे माणसाच्या स्वभावात असावे लागते. नुसत्या घोषणा म्हणजे विचार नव्हे, घोपणेला नुसता आवाज पुरतो; विचाराला आत्मबळ लागते' ते आपल्यापाशी नाही याची त्याला मनोमन जाण आहे. आपल्या पराभूतपणाचे ते एक महत्त्वाचे कारण आहे असे तो मानतो. त्याला हिंसेची भीती आहे. त्याने रक्त जवळून पाहिलेले नाही याची कबुली दिली आहे. पण त्याचबरोबर ह्या देशाला कार्यप्रवण-कोणतेही कार्य, हिंसक काय, अहिंसक काय-करायला फार थोर प्रतिभेचा माणूस पाहिजे आणि तो आपण नाही, हे त्याल उमगले आहे. त्याचप्रमाणे वाणीने आणि लेखणीने या देशाला जागवता येत नाही, हेही त्याच्या लक्षात आले आहे.

असा हा पराभूत असलेला गरूडझेपेचा माणूस अवतीभवतीच्या कावळ्यांना आकर्षून घेणारा आहे. या गरुडाचे पतन कावळ्यांना सुखवणारे आहे. या उदास गरुडाचे खाली झेपावणे हा नाटकाचा प्रवास आहे. 'ही माणसे पराभूत का होतात, हा या नाटकाचा शोध-प्रवास आहे.' नाटककाराने हा एक यशस्वी नाटच प्रवास घडविलेला आहे यात शंका नाही. केवळ यशस्वी ह्याहीतर नवा कलात्मक प्रवास आहे असे मला वाटते. कारण एका प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाने राजकीय चळवळीद्वारा, कलाक्षेत्राद्वारा घेतलेला जीवन शोध इतक्या ताकदीने मराठी नाटकात नव्यानेच येतो आहे. एवढ्या पुरतेच या व्यक्तिरेखेचे वेगळेपण आहे असे नव्हे, तर या व्यक्तिरेखेला विविध परिमाणे लाभलेली आहेत. केवळ विविष्ट राजकीय पक्षाचे तत्त्वज्ञान अंगिकारलेला आणि त्यातच झाकोळलेला हा माणूस नाही. श्रीधर कवीच्या पांडव-प्रतापाशी त्याची जवळीक आहे, नाटकाच्या निमित्ताने कलाजीवनाशी तो बद्ध आहे, वडलांशी तीव्र मतभेद असूनही त्यांच्याविषयी आत्मीयता आहे. म्हणजेच राजकीय धकाधकीच्या मामल्यात त्याची संवेदन क्षमता गमावलेली नाही. तो 'करतलाम लकवत' जग पाहू शकतो. जीवनातले असे काही मानसिक, भावनिक, वैचारिक ताण हेच त्याचे भावबळ आहे. या विचित्र ताणांनी त्याला गुंतवून ठेवलेले आहे. आणि पराभूतही केले आहे. एका अर्थी ही विविध परिमाणे या माणसाच्या प्रतिभेचा आणि कल्पकतेचा आविष्कार आहेत असेही आपल्या ध्यानी येते. तिथेच या व्यक्तिरेखेची पृथगात्म जाण आपल्याला येते.

अशा या उदास गरुडाची चौकशी काही कावळ्यांनी केली आणि तिला अपरिहार्यपणे चौकशी-नाटयाचा एक आकृतिबंध लाभला. ज्यावेळी ती चौकशी सार्वजनिक जीवनाच्या कक्षा ओलांडून खाजगी जीवनाच्या ओरखड्यानी रक्तबंबाळ होऊ लागली तेव्हा 'फ्लॅश बॅक' पद्धतीने काही प्रसंग आविष्कृत झाले. अर्थात त्यामुळे चौकशीचे एकसुरीपण कमी झाले. तरीही चौकशीचा प्रसंग आणि इतर प्रसंग असे नाटयाकृतीचे सरळ सरळ दोन भाग पडलेले आहेत असे जाणवले. आविष्काराची ती मर्यादा झाली. पण या नाटकाच्या बाबतीत आकृतिबंधापेक्षा किंवा नाटय रचनेच्या सौष्ठवापेक्षा आशयघनतेला अधिक महत्त्व आहे. तसेच तो आशय आपल्यापर्यंत किती आणि कसा पोहोचला याला अधिक मोल आहे. नाटकाचे शीर्षक अर्थपूर्ण आहे. पण त्यासाठी बालकवींच्या ओळींचा वापर करायलाच हवा असे नाही, त्या ओळींनी नाटय-परिणाम कदाचित साधलेही पण नावातील सूचकता आणि प्रेक्षकाच्या कल्पकतेचे आव्हान कमी झाल्याचे जाणवले.

नाटयाशय पोहोचविण्याची यशस्वी कामगिरी डॉ. श्रीराम लागूंनी आपल्या समर्थ अभिनयाने केली. त्यांच्या आवाजातील घन गंभीरता, शब्दाचे वजन पेलण्याची ताकद, शब्दांतील ध्वन्यर्थ प्रकट करण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिभा ह्या साऱ्या गोष्टी आज तरी मराठी रंगभूमीवर दुर्मीळ आहेत याची साक्ष या प्रयोगात सातत्याने येत होती. नाटय संवादातील गद्याला एक लय असू शकते, अंतःसत्व असते ते शोधून परिणामकारकतेने व्यक्त करण्याचे कसब फारच थोड्या कलावंतांकडे असते. या प्रगटी-करणात एकसुरीपणाचा, ठरीवपणाचा धोका असतो. मध्यंतरी डॉक्टरांच्या शब्दोच्चाराबद्दल-वाक्य-फेकीबद्दल अशी काहीशी तक्रार होती. त्यांचे नवे नाटक पाहाताना शब्दोच्चाराच्या पद्धतीमुळे जुन्या भूमिकांच्या शब्दांचे-वाक्यांचे स्मरण व्हायचे. पण या नाटकात तसे घडले नाही. रंगभूमीवरचा त्यांचा शब्द जिवाचा कान करून ऐकावासा वाटतो. कारण आस्वादकाच्या दृष्टीने तो आनंदाचा क्षण असतो. या नाटकात याची प्रचीती सतत येत होती. केवळ शब्द, आवाज एवढ्या पुरतेच त्यांच्या भूमिकेचे वैशिष्टय नव्हते तर अभिनय दर्शनासाठी अंग प्रत्यंगाचा वापर त्यांनी सूचकतेने, संयतपणे केलेला होता. खुर्चीवर बसल्यावर पायाची विशिष्ट हालचाल, मनातली अगतिक, गोंधळलेली, त्रस्त अवस्था व्यक्तविण्यासाठी हाताच्या बोटांची अर्थपूर्ण हालचाल विशेष लक्षवेधी होती. याच्या साथीला व्यक्त केलेले मुद्राभाव, अशा विविध तपशिलातल्या गोष्टीमुळे डॉक्टरांनी सादर केलेली भूमिका स्मरणीय वाटली. ती भूमिका पाहाणे हा एक 'कलात्मक अनुभव' आहे, हेच खरे!

डॉक्टरांच्या व्यतिरिक्त या नाटकात एकनाथ हट्टंगडी, अनंत वर्तक, दीपा लागू, रेखा सबनीस, अच्युत देशिंगकर, कुमार आपटे, मस्तकार इत्यादी कलावंत होते. अनंत वर्तक आणि हट्टंगडी या दोघांव्यतिरिक्त उरलेल्या कलावंतांनी अभिनयदृष्टया समाधान दिले नाही. ती मंडळी कलात्मक

ताकदीत उणी पडली. विशेषतः डॉक्टरांच्या बरोबरच्या दोन प्रसंगात रेखा सबनीस, अच्युत देशिंगकर कमी वाटले. नुसतेच कमी नाही तर नाट्यपरिणाम पुसण्यास कारणी झाले. यातून एक–दोन प्रश्न उभे राहतात. एक म्हणजे या कलावंतांनी अतिशय प्रामाणिकपणे, गांभीर्याने, सर्वस्वाने अभिनय केला असेल पण डॉक्टरांच्या सुजाण अभिनयामुळे ते उणे वाटले असतील का? दुसरे म्हणजे ही उणीव भरून काढण्याच्या दृष्टीने दिग्दर्शक म्हणून डॉ. लागूंनी केलेले प्रयत्न अपुरे होते का? प्रत्येक नाटकाला सर्वच अभिनेते एकाच तोलामोलाचे मिळतील असे अपेक्षिणे कितपत रास्त आहे असा प्रश्न विचारला जाईल. व्यावसायिक नाटकांमध्ये ते अनेक कारणांनी अशक्य आहे याची मला कल्पना आहे. पण हौशी किंवा प्रायोगिक स्वरुपाच्या संस्थांमधून कलावंतांच्या निवडीची ही चोखंदळ आणि दक्ष दृष्टी निश्चितपणाने अपेक्षित आहे. त्यातूनही उपलब्ध कलावंताशिवाय पर्याय नाही असे जर असेल तर त्या मध्यम दर्जाच्या कलावंतांकडून चोखपणाने काम करवून घेण्याची जबाबदारी दिग्दर्शकाची आहे. प्रमुख भूमिका आणि दिग्दर्शन यांचा समतोल राखणे अवघड आहे. तरीही डॉक्टरांसारख्या जाणत्या कलावंताने या गोष्टीचा विचार गांभीर्याने करण्याची वेळ निश्चितच आली आहे असे वाटते. याबाबतीत 'राव जगदेवराव मार्तंड' आणि 'हिमालयाची सावली' या नाटकांबाबतचे अनुभव पुरेसे बोलके आहेत.

प्रकाश-योजना राम शितूत यांची होती. प्रकाशयोजनेने रंगमंचाचे दोन विभाग स्पष्ट केले जात होते. आवश्यक तो परिणाम साधला जात होता. नेपथ्याबाबत एक गोष्ट खटकली ती म्हणजे, एक खुर्ची आणि दोन स्टूलवजा लाकडी ठोकळे यांनी जर घर सूचित होते तर कुलगुरूंच्या खोलीत मोठे टेबल, दाराची चौकट, तिला सरकते दार एवढ्या वास्तवदर्शी वस्तू मांडण्याचे प्रयोजन कोणते? त्यातल्या त्यात चौकट आणि दार तर विशेष खटकले.

अशा काही कमीअधिक गोष्टी दुर्लक्षित करून प्रयोगाचा आस्वाद जो मिळाला तो महत्त्वाचा आहे. एक स्मरणीय प्रयोग असे वर्णन करावे असा योग क्वचित येतो. राजकीय विषयाशी संबंधित असलेले, कला–राजकारण याच्याशी लिप्त असूनही संवेदनक्षम असलेली एक व्यामिश्र व्यक्तिरेखा, तसेच एक आशयघन नाट्याकृती सादर केल्याबद्दल गोविंद देशपांडे यांचे मराठी रसिकाने मोठ्या प्रमाणात स्वागत केले पाहिजे. त्यांनी नाटकात मांडलेली वैचारिक भूमिका, घेतलेला पराभूताचा शोध अंतर्मुख करणारा आहे, प्रक्षोभक स्वरुपाचा आहे. मराठी नाटकाला वेगळी दिशा देणारा आहे. त्यांनी मांडलेली साम्यवादाची वैचारिक भूमिका ही कदाचित वादग्रस्त असेलही! विविध राजकीय पक्षांची विचारप्रणाली अभ्यासणारी मंडळी त्यातले कच्चे दुवे दाखवू शकतील. तो माझा अभ्यास-विषय नव्हे, म्हणून त्याबाबत मी अधिकाराने काही सांगू शकत नाही. पण मला वाटते की, त्या वादांच्या अरण्यात शिरून नाट्याकृतीचा आस्वाद गमावला जाणार नाहीना याचेही भान ठेवायला हवे. संहितेत शब्दरूपाने असलेले आणि रंगमंचावर प्रयोगरूपाने सादर झालेले जे नाट्य आहे ते कितपत तर्कसंगत आहे याचा शोध घ्यावा. कारण तो कलात्मक पातळीवरचा शोध होईल. माझ्या दृष्टीने तोच महत्त्वाचा!

या नाटकाला लाभलेला किंवा लाभणारा प्रेक्षकवर्ग हा किमान बौद्धिकदृष्टचा प्रौढ असायला हवा. रंजनाच्या पलीकडे जाऊन नाटक या माध्यमाचा विचार करणारा, ते समजावून घेण्यासाठी कलाकृतीला निर्मळ मनाने सामोरा जाणारा असा हवा. अन्यथा त्याला हे नाटक शब्दबंबाळ वाटेल. पण सुदैवाने या नाटकाला लाभणारा 'प्रौढ प्रेक्षक' मराठीत निश्चितच आहे. संख्येने तो कमी असेल पण तो आहे हे सुचिन्ह आहे. गोविंद देशपांडे या नाटककाराने आणि डॉ. श्रीराम लागूंनी तो या नाटकाच्या निमित्ताने निश्चित केला. आता अशा प्रकारची न्याय्यधारा सतत चालू ठेवण्याची जबाबदारी अन्य नाटककारांची, दिग्दर्शकांची आहे. त्यांना ते एक आव्हान आहे.

व्यावसायिक रंगभूमीवर हेवा करण्याजोगी यश-कीर्ती मिळूनही प्रायोगिकतेची वांछा झाकोळू न देणे ही अपूर्व गोष्ट आज डॉ. लागूंच्याबाबत घडत आहे. एका अर्थी ते रंगभूमीतल्या नव्या वाटा निश्चित करीत आहेत. इतिहास घडवीत आहेत. प्रायोगिकतेतही केवळ हिंसाचारी आणि लिंगपिसाट विषयावरचीच वादग्रस्त नाटके ते सादर करतात असा त्यांच्यावरचा आक्षेप 'उध्वस्त धर्मशाळे'ने उधळून लावला आहे. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, या कलाकृतीच्या निमित्ताने नाट्यलेखन आणि अभिनय याचे एक महत्त्वपूर्ण वळण मराठी रंगभूमीत स्थापित होऊ पाहते आहे. तिचे साक्षी होण्यात कोणाही 'प्रौढ प्रेक्षका'ला अभिमानच वाटेल! □


पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## १५–२–७५ ते २१–२–७५

### संसदेचे अधिवेशन वादळी ठरणार

संसदेचे अर्थ संकल्पी अधिवेशन यावेळी सुरू झालेले आहे. हे अधिवेशन हिवाळी अधिवेशनापेक्षा गाजणार असून त्याचे यजमानपण विरोधकच करतील. अर्थसंकल्पात गरिबांनी अगर सामान्य लोकांनी घास्ती घ्यावी असे कर बसण्याची शक्यता फारच कमी आहे. अर्थमंत्री सुब्रम्हण्यम्, शेती मंत्री बाबू जगजीवनराम यांना विरोधकांकडून व सर्व सामान्य जनतेकडून शिव्याशाप फारसे मिळणार नाहीत. सरकारी धोरण बरेच उजवीकडे झुकेल. परवाना पद्धती व नियंत्रणे बरीच शिथिल होण्याची शक्यता आहे. शेख अबदुल्ला काश्मीरचे मुख्य मंत्री बनण्याची शक्यता असली तरी राजकीय गोटांत सावधगिरी बाळगली जाईल. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींना संस्मरणीय अशी सत्ता वा राजकारणात माघार घ्यावी लागणार आहे. महाराष्ट्रांत बॅ. अंतुले व यशवंतराव मोहिते याना महत्त्व यावे. बॅ. अंतुले यांच्याबद्दल दिल्लीत महत्त्वाची चर्चा होण्याची शक्यता आहे.

**मेष :** मंगळाची कृपा

तुमच्या राशीचा स्वामी मंगळ आहे व तो उद्याच अकरावा होत आहे. ही घटना तुमच्या व्यावसायिक जीवनाला अभिमानाची ठरावी. रवी अकरावा आहे. यावेळी तुम्ही पैशाची अजिबात काळजी करू नका. जे जे हातीं घ्याल त्याचे त्याचे सोने होईल. लॉटरीचे तिकीट तुम्ही काढीत नसाल तर ते यावेळी अवश्य काढा. सोमवारी नोकरीत मतभेद होतील. पण ते मिटतील. मंगळवार ते गुरुवार हातून धर्मकार्य घडेल. मंगल कार्यात भाग घेण्याची संधी मिळेल. वक्तृत्व स्पर्धेत यश मिळेल. कोणत्याही चालू धंद्यांतील समस्या सुटून पैशाचे सहकार्य मिळेल. तरुण तरुणींनी प्रेमाच्या भानगडीत न पडणें श्रेयस्कर. महिलांनी संशय वृत्ति धरू नये. शुभांक ४–७–९.

**वृषभ :** नव्या धंद्याची सुरुवात

अकरावा गुरू आर्थिक क्षेत्रांत आगळे स्थित्यंतर घडवील तर दहावा रवी तुमचा एकादा नवा उद्योग सुरू करायला अनुकूल सहाय्य मिळवून देईल. प्रामुख्याने मुद्रण, खते व औषधी उद्योग सुरू करा. यश व पैसा मिळू शकेल. चालू उद्योगांतील मंदी व मरगळ दूर होऊन त्याच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होईल. नोकरीची स्थिती स्मरणात राहील इतकी सुधारेल. वाणिज्य पदवीधरांना नोकरी मिळवण्यात किंवा धंदा उभा करण्यांत बरेच परिश्रम घ्यावे लागतील. या उलट कृषी पदवीधरांना कोणत्याही त्रासाशिवाय नोकरी मिळेल. शेतीचा व्यवसाय अवश्य करावा. चालू नोकरीत–प्रमोशनचा योग आहे, विवाहेच्छूंनी हा आठवडा विवाहा संबंधीचा विचार बाजूला ठेवावा. महिलाना उद्योग क्षेत्रांत संधी व पैसा मिळेल शुभांक ५–६–११

**मिथुन :** महत्त्वपूर्ण घटना

या आठवड्यांतील दि. १७ च्या गुरु–शुक्र युतीपासूनच तुमचे व्यावसायिक जीवन प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा गाठणार आहे. सातवा मंगळ या आठवड्याच्या शेवटी राशीमधील शनीबरोबर षडाष्टक करणार असला तरी तो तुमचे काही अनहित करणार नाही. कारण मंगळ मकर राशीत उच्चीचा असतो. त्यामुळे झाला तर फायदाच होईल. यावेळी खरे म्हणजे तुमच्या भाग्याची सारी सूत्रें रवीच्या हाती आहेत. तो कर्तुमकर्तुम् शक्ती व कर्तृत्व तुम्हाला बहाल करणार आहे, नोकरीत हुकलेल्या संधी पुन्हा येणार असून त्याचा तुम्ही स्वीकार करावा. पैसा कमी पडणार नाही. साहित्य–वाङ्मय–कला या क्षेत्रात अंगभूत गुण दाखवता येतील. पैसा व कीर्ति मिळेल. वाणिज्य पदवीधर व वकील यांना उत्तम काळ आहे. सोमवार, गुरुवार व शनिवार नोंदून ठेवा. महिलाना सिनेक्षेत्रीय प्रसिद्धी मिळेल. शुभांक १–३–६

**कर्क :** विवाहेच्छूंना शुभवार्ता

गुरूचे मीन राशीत पदार्पण ही एकच गोष्ट तुमच्या बाबतीत प्रगतीचे युग सुरू झाल्याची नांदी ठरावी. भाग्यस्थानी स्वगृहीचा गुरू म्हणजे एक अद्वितीय यशोपर्व होय. अपयश आणि अनिश्चितता याचा निरास करणारा हा काळ तुमच्या जीवनात सुरू होत आहे. आता नैराश्य नाही, माघार नाही. भाग्यस्थ गुरू म्हणजे आध्यात्मिक सामर्थ्याचा प्रत्यय, आत्मसाक्षात्काराची पर्वणी, मनोरथ पूर्ण होण्याची प्रसाद–चिन्हेच होत. तुमच्यापैकी जे कुणी उपासनामार्गी असतील त्यांच्या अंतःकरणात परमेश्वराचे रूप दिसल्याखेरीज राहाणार नाही. रविवार ते मंगळवार एखादा चमत्काराचा अनुभव येईल. गुरुवार शुक्रवार विवाहेच्छू व्यक्तीच्या विवाह समस्येला चालना मिळेल. नोकरी धंद्यांत प्रगतीकारक घटना घडू लागतील. महिलानी कुलदेवतेची आराधना करावी. यश मिळेल. शुभांक २–३–११

**सिंह :** स्थानांतराची शक्यता

आठवा गुरू तब्येतीला वाईट नाही. उगीचच बाऊ करण्यात अर्थ नाही. जुना आजार विरघळून जाईल. अशक्तपणाची मानसिक व शारिरिक व्यथा आता शिल्लक उरणार नाही. उलट शक्ति व उत्साह याचा प्रत्यय येऊ लागेल. आठवा गुरू तुम्हाला प्रवासाचा मोठा योग आणून देणार आहे. तुमच्यापैकी जे कुणी राजकारणी वा सत्ताधारी असतील त्यांना अचानक विदेशी प्रवास घडून भावी काळाला उपयुक्त अशा काही ओळखी होतील. रविवार मित्रमंडळींबरोबर सहल घडेल. मंगळवार ते शुक्रवार नोकरीत स्थानांतराची शक्यता. प्रमोशन–बढतीच्या निमित्ताने हे स्थलांतर घडावे. बेकारांना नोकरी धंद्याचा दिलासा मिळेल. त्यांचे इंटरव्ह्यू यशस्वी होतील. आठवड्याच्या उत्तरार्धात पैशाचा प्रश्न सुटेल. महिलांना नोकरीत अधिकाराचा योग आहे. शुभांक ४–८–९

**कन्या :** संसार सुखाचा अनुभव

सतरा तारखेच्या गुरू–शुक्र युतीपासूनच तुमच्या भावी योजनांना व कल्पनेला योग्य प्रतिसाद मिळू लागेल. गेले तेरा महिने या ना त्या मार्गाने छळणारा सहावा गुरू आता सातवा होऊन अनुकूल झाला आहे. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह ठरत नव्हते किंवा अडचणी येत होत्या त्यांचे नवे गुलाबी संसार या आठवड्यात सुरू होतील. नवरावायकोच्या

भांडणाने गेल्या वर्षी तुमच्या संसारात हैदोस घातला होता. पण या वेळी पती–पत्नीतील दुरावा व भांडण संपून संसारात प्रसन्नतेचे नवे वातावरण सुरू होईल. सोमवार ते बुधवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्रायदायक ठिकाणाहून अनुकूल जागी बदली होईल. बेकारांना काही सूचक अशा बातम्या कळतील. एखादी मागणी मान्य होईल. महिलांना राजकीय सन्मानाचा योग आहे. शुभांक ७–१०–११.

**तूळ** : कलाक्षेत्रात यश

गुरूचा कृपाशीर्वाद आता तुम्हाला मिळणार नाही. कारण त्याने पाचवे स्थान सोडले आहे. मात्र तिसरा मंगळ अजून तुमच्यासाठी काही तरी करू इच्छितो. त्याचप्रमाणे रवी देखील तुमच्या आशा आकांक्षाना चालना देणार आहे. नोकरीत सोमवार ते बुधवार या दिवशी तुमच्या मागणीप्रमाणे–प्रामुख्याने बरेच दिवस रेंगाळत पडलेली मागणी–काही तरी अनुकूल घडावे. बढती बदलीचा योग संभवतो. बेकार व्यक्तींना नुसती आश्वासने मिळतील. काम मात्र विलंबाने होईल. या वेळी कोणतेही करार मदार करूं नका. हा आठवडा कलावंत व्यक्तींना जास्त फायद्याचा आहे. सिनेनट, नाटयकलावंत, यांना प्रसिद्धीचा व पैसा मिळण्याचा योग आहे. गायक कलाकारांच्या मैफली गाजतील. महिलांच्या बाबतीत त्यांचे महत्त्व वाढवणाऱ्या घटना घडतील. शुभांक ६–॰–१०

**वृश्चिक** : प्रगतीकडे वाटचाल

अधिकाराची ईर्षा बाळगणारे बरेच लोक वृश्चिक राशीचे असतात. दुसरा मंगळ तुमचा राशीस्वामी असल्यामुळे तुमचा दर्जा वाढवणार आहे. नोकरीत प्रतिष्ठा व अधिकाराची जागा मिळणार आहे. त्याचप्रमाणे पैशाची प्राप्तीदेखील चांगली होणार आहे. जमीन व शेती यासंबंधीत खते, बी–बियाणे, अवजारे याच्या व्यापारात चांगला नफा मिळेल. जमिनीची खरेदी करा. मनोकामना पुरी होईल. प्लॅस्टिक, अल्युमिनियम धंद्यातील मालक व कामगार यांचा धंद्याच्या दृष्टीने लाभ होणार आहे. तुमचे जुने येणे वसूल होईल. पैशाची कामे होतील. नोकरीत काही तरी चांगले घडेल. नोकरी कायम नसल्यास ती कायम होईल. महिलांना उद्योगात भागीदारी मिळेल. शुभांक २–४–६

**धनू** : सुख गवसेल

बाराव्या राहूने तुमची कोंडी केली आहे व सातवा शनी संसार जीवनात काही ना काही भांडणे–उणीवा निर्माण करीत आहे. पण त्यामुळे निराश होण्याचे कारण नाही, व खचून जाण्याचे कारण नाही. राशी स्वामी गुरू चौथा मीन राशीत आला आहे. तो तुमच्या साऱ्या अडचणी दूर सारून तुम्हाला सुखाचा लाभ होणार आहे. मनःस्वास्थ्य मिळू शकेल. घरातील भाऊबंदकी संपुष्टात येईल व नवे वातावरण निर्माण होईल. तुमच्यापैकी कुणी जागेच्या शोधात असेल तर त्याची वणवण संपणार आहे. त्याला सोईची जागा मिळेल. बंगल्यात राहाण्याची इच्छा पुरी होईल. स्थावराचा तंटा तडजोडीने मिटेल. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा अनुकूल वा प्रतिकूल असा नाही. नोकरीबद्दल निराशेची भावना मनात निर्माण होऊ शकेल. सोमवार, बुधवार महत्त्वाचे. महिलांना मानसिक स्वास्थ्य मिळेल. शुभांक १–७–९

**मकर** : कर्तबगारीला नवी संधी

मंगळाच्या प्रतिकूलतेचे एवढे स्तोम माजवू नका. तो तुमचे काहीही वाकडे करू शकणार नाही. नाही म्हणायला अनावश्यक खर्चाचा तुम्हाला मोह होण्याची शक्यता आहे. पण त्याबाबतीत तुम्ही संयम पाळला तर तुमचे काही नुकसान होणार नाही. रवी व तिसरा गुरू तुमच्या कर्तबगारीला नवे दालन खुले करून देणार आहे. यावेळी नोकरीत तुमची उपेक्षा संपून एखादी नवी जागा तुम्हाला मिळू शकेल. तुमच्यावर डंख धरणारे अधिकारी बदलून जाऊन तुमच्याबद्दल सहानुभूती बाळगणारा अधिकारी बदलून येईल. व्यापारी क्षेत्रात तुम्ही यावेळी नवे धाडस करू नका. बेकायशीर असे काही मुळीच करू नका. एखादा आरोप येऊ शकेल. पैशाची परिस्थिती सर्वसामान्य राहील. महिलांनी मोठेपणाचा हव्यास धरू नये. शुभांक ८–९–११

**कुंभ** : राजकारणात महत्त्व

तुमच्या राशीतून आता गुरू गेला आहे. आता मीन राशीत त्याचे प्रस्थान राहील. हा दुसरा गुरू घरात संतती सुखाचा गोड आनंद निर्माण करील. दीर्घ कालानंतर एखाद्या कुंभ व्यक्तीला पुत्रजन्माचा आगळा आनंद मिळू शकेल. दुसरा गुरू स्वगृही आहे. त्यामुळे धनस्थिती सुधारेल. मध्यंतरी अगदी हातातोंडाची गाठ पडताना पंचाईत व्हायची असा प्रसंग यापुढे येणार नाही. पैशाची आवक सुरू होईल. थांबलेला धंदा सुरू होईल. रोजच्या रोज काहीतरी पैसे मिळत जातील. गरज भागेल. आणखी काही दिवस नवा उद्योग सुरू करण्याची घाई करूं नका. प्रवास सुखाचा होईल. तुम्ही राजकारणात प्रत्यक्ष भाग घेत असाल तर तुमचे भलतेच महत्त्व वाढणार आहे. नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय होतील. प्रमोशन मिळेल. बदलीचा योग आहे. बुधवारी महत्त्वाची घटना घडेल. महिलांना चांगल्या दर्जाची नोकरी मिळेल. शुभांक ७–३–९

**मीन** : आत्मसामर्थ्य वाढेल

ज्या वेळेची तुम्ही आतुरतेने वाट पाहात होता तो अध्यात्मिक सामर्थ्याचा तेजस्वी ग्रह गुरू तुमच्या राशीत आला आहे. आता तुम्हाला आणखी काय हवे ? आता तुम्हाला दिव्य तेजाचा साक्षात्कार होऊ शकेल. इतके दिवस देवधर्मात, उपासनेत अडथळे येत होते. आता ते येणार नाहीत. तुमच्या मनीची इच्छा सहजगत्या पुरी होईल. साधुसंताचा दिव्य आशीर्वाद मिळेल. पारमार्थीक जीवन ज्याप्रमाणे आनंदाने बहरून येईल त्याचप्रमाणे ऐहिक व्यवहारातदेखील अनुकूल अनुभव येऊ लागेल. नोकरीच्या क्षेत्रात तुमच्या सल्ल्याला महत्त्व प्राप्त होईल. वरिष्ठांना तुमच्या मताविरुद्ध जाणे शक्य होणार नाही. शैक्षणिक क्षेत्राशी संबंधीत असा व्यापार व व्यवसाय प्रगतीचा नवा टप्पा गाठील. पैशाची कामे पार पडतील. शनिवार, गुरूवार व शुक्रवार महत्त्वाचे. महिलांना तीर्थयात्रा व सहल घडेल. शुभांक ५–९–११ ☐


बॉंबे डाइंग
एकमेव वितरक
परागं
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत खरेदी करा !
मिलच्या दुकानांत खरेदी करा !!
सुपर ऑफर

" बँकांनी या सर्व मोठ्या उद्योगांना क्रेडिट स्क्वीज लावला.
या साऱ्या मोठ्या उद्योगांनी तो लघुउद्योगाकडे सोपवला.
म्हणजे कशी साखळी तयार झाली पाहा.
आमच्या पुढाऱ्यांच्या घोडचुकांमुळे चलनवाढ झाली. ती कमी करण्यासाठी
इलाज केला मोठ्या उद्योगांवर आणि तो उतला आमच्या अंगावर.
सहा-सहा महिने ते बिलंच देत नाहीत. वर म्हणतात, ' व्याज लावा. '
खरं तर या डावपेचांना तोंड देण्यातच सारा वेळ जातो.
म्हणूनच सर्व विचार करून धंदा बंद करून oil fields मधे अर्ज
करायचा सपाटा लावला आहे. नोकरी मिळेल हो. पण वाईट एवढंच
वाटतं, की आमचं सरकार इतिहासावरून काहीच शिकत नाही.
वर्षापूर्वी मुद्रणव्यवसायावर सरकारने एक कुऱ्हाड मारली व तो उद्योग
पूर्ण रसातळाला घालवला. तेथील कामगार अजून रस्त्यावर वणवण
भटकतोय. त्या जखमा पूर्ण बऱ्या व्हायच्या आतच दुसरी कुऱ्हाड
आमच्या लघुउद्योगांवर. "

# कोंडीत सापडलेला लघुउद्योग

प्रत्यक्ष मुलाखतींच्या आधारे तयार केलेला सविस्तर लेख

**माणूस पुढील अंकी**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**